स. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
९८२३

REFBK-0002333
REFBK-0002333

ચાંપુ: ૬૪૭

महाराष्ट्र-ग्रंथमाला-पुष्प पांचवें

# बालकवींची समग्र कविता

REFBK-0002333

## भाग १

संपादक- **एकनाथ यादव निफाडकर**

( शिवसाम्राज्य या महाकाव्याचा कर्ता )

धुळें

आवृत्ति पहिली.

हें पुस्तक विश्वनाथ गणेश जावडेकर यांनीं आत्माराम छापखान्यांत गल्ली नं. १ घर नं ५ मध्यें छापिलें व एकनाथ यादव निफाडकर यांनीं तेथेंच प्रसिद्ध केलें.

शके १८४५ } किंमत सव्वा रुपया { सन १९२३

# सोनपत-पानपत

हें ‘ **कमला** ’ काव्याच्याच कथानकाचें आणि त्याच काव्याच्या आकाराचें खंडकाव्य **लोकमान्य** मासिकाचे संपादक रा. ए. या. निफाडकर यांच्या लेखणींतून उतरलें आहे. पूर्वजांच्या पराक्रमाचीं राष्ट्रीय शब्दचित्रें इतकीं सरस अशीं कोणत्याच काव्यांत उमटलेलीं नाहींत. किंमत फक्त चार आणे; पण १ रुपयास पांच पुस्तकें. ट. ख. वेगळा.

व्यवस्थापक—**लोकमान्य कार्यालय**, धुळें.

# अनुक्रमणिका


पृ.

१ अनुक्रमणिका अ-ई

२ संपादकाचे दोन शब्द अ-ल

३ प्रस्तावना अ-ल


## मधुगीतें

### सृष्टिवर्णन विषयक १—२८


१ मंगलमय प्रेमकवन १

२ अरुण १

३ संध्यारजनी ६

४ निर्झरास ९

५ फुलराणी १२

६ तारकांचे गाणें १४

७ संध्यातारक १६

८ शुक्रोदय १७

९ मधुयामिनी १८

१० अष्टदिशांचा गोफ १८

११ मेघांचा कापूस २१

१२ शारदीय सौंदर्यदेवता २१

१३ काव्यदेवतेस २२

१४ ताराराणी २४

१५ मूढ मालती २५

१६ औदुंबर २६

१७ सृष्टि २७

१८ तडाग असतों तर २७

## प्रेमविषयक ३०—४०

१९ गाण्याची चढली कमान ३०
२० तेजोवीणेची रागदारी ३०
२१ सुकांत चंद्रानना पातली ३१
२२ प्रेमलेख ३२
२३ आनंदी-आनंद ३२
२४ भारद्वाजास ३५
२५ निःश्वास ( १ ) ३५
२६ निःश्वास ( २ ) ३७
२७ निःश्वास ( ३ ) ३८
२८ भटकणें ३९
२९ प्रेमाचा पहिला भास ३९

## विषण्णतेविषयीं—४२—५८

३० खेड्यांतिल रात्र ४२
३१ दुबळी भूल ४२
३२ थडग्यांतिल रमणी ४४
३३ उदासीनता ४६
३४ रजनीस आव्हान ४७
३५ भरलें घर ओकें ओकें ४९
३६ आशा ५०
३७ शून्य मनाचा घुमट ५१
३८ तापल्या जिवाला कोण देइना ताप ? ५१
३९ काळास ५२
४० नीति व अनीति ५३
४१ संशय ( १ ) ५४

४२ निराशा ५४
४३ ला ५५
४४ पारवा ५५
४५ संशय ( २ ) ५७
४६ काल आणि जीवित ५७
४७ हृदयाची गुंतागुंत ५८

## विचारात्मक—६१—६६

४८ कवीचा विचार ६१
४९ सौंदर्याचा अभ्यास कर ६१
५० दोष व प्रीति ६२
५१ प्रीति व कर्तव्य ६२
५२ शारदेस ६३
५३ कवीचें अंतरंग ६४
५४ काव्याची कल्पना ६५
५५ कवीची इच्छा ६५

## तत्त्वज्ञानात्मक—६८—७७

५६ बाळें तीं खेळत होतीं ६८
५७ कविबाळें ०७
५८ वैष्णव धर्म ७३
५० आवाहन ७४
६० अतृप्ति ७५
६१ जिज्ञासु ७५
६२ विश्वाचा प्रवास ७६
६३ जादुगारीण ७७

## वात्सल्य ७९—८३


६४ निजलेल्या मुलास ७९
६५ घोडा घोडा ८०
६६ माझा भाऊ ८०
६७ पाळणा ८१
६९ बहिणी करितां गाणीं—( १ ) ८१
७० ,, ,, ( २ ) ८२
७१ बीज ८२
८० वत्सलता ८३


## ऐतिहासिक—८५—९८


८१ माझा भारत ८५
८२ वीरगडी ८५
८३ शाहीर ८७
८४ प्रतापसिंह ८८
८५ दौलतरावांची मंजुळा ८९
८६ जीर्ण दुर्ग ९२
८७ वीर मराठा ९३
८८ राष्ट्रसेवा ९५
८९ माझा महाराष्ट्र ९६
९० आर्यांची अवनति ९६
९१ राष्ट्रगायित्री ९७
९२ रणघोष ९७


## नानाविध—१००—१११


९३ चैतन्याचे ध्वनि १००
९४ श्रीमानवता १०२
९५ कवीची इच्छा १०३
९६ धर्मवीर १०५
पत्रें, १३६

# संपादकाचे दोन शब्द

( १ ) भगवान् श्रीकृष्ण परमात्म्याच्या कृपेनें महाराष्ट्र-ग्रंथ-मालेचें हें पांचवें पुष्प रसिकवृंदास सादर करण्याचा सुमंगल प्रसंग आला याबद्दल प्रथम त्याचीच स्तुति केली पाहिजे.

( २ ) नंतर या पूर्वीच्या चार पुष्पांची वाचकांस पुनरपि ओळख करून दिली पाहिजे. कारण सिंहिणीला नवें पोर झालें म्हणजे तें कसा पराक्रम करील याची कल्पना तिच्या पहिल्या पोरांवरून बरीच रास्त करतां येते.

( ३ ) पहिलें पुष्प जें " **टिळकांचें चरित्र** " व दुसरें जें " **राष्ट्रीय शिक्षणाचीं गोड फळें** " त्यांचे पराक्रम न सांगणें हें च आह्मांस उचित. तथापि पहिल्या पुष्पाची द्वितीयावृत्ति लवकरच निघून, टिळक--चरित्राचा दुसरा भाग हि त्या बरोबरच निघेल; त्याचप्रमाणें राष्ट्रास गोड वाटलेलीं फळें सरकारास जरी विषतुल्य झालींत, व त्यानें तीं जरी जमीनदोस्त केलींत, तरी तीं योग्यकालीं प्रचंड राष्ट्रोद्धाराचे वटवृक्ष निर्माण करतील यांत शंकाच नाहीं. निर्माण करित आहेत हें आह्मांस माहित आहे;इतकें सांगण्यास हरकत नसावी.

( ४ ) तिसरें पुष्प ह्मणजे आमचे जिवलग स्नेही रा. केशवराव सोनाळकर यांचे " **अमृत-तुषार** " होत. मराठी भाषेंतील फारच थोडक्या पुस्तकांना इंग्रजी भाषांतराचा बहुमान मिळाला आहे.तो मान या पुष्पास मिळत आहे, व तें भाषांतर लवकरच लोकनिदर्शनास येईल.

( ५ ) चवथें पुष्प " **सोनपत–पानपत अथवा सोक्षमोक्ष.** " हें या पांचव्या पुष्पाबरोबरच उमललें असून त्याविषयीं इतक्यांतच बोलतां येणार नाहीं.

( ६ ) आतां हें पांचवें पुष्प.या " **मधुगीतां** " विषयीं, बालकवींच्या अत्यंत जीवलग मित्रांपैकीं एक, असे रा. केशवराव सोनाळकर, यांनीं आपल्या प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे. आह्मांला, या मधुगीतांमुळें मराठी भाषेंत, विचारांत व रसिकतेंत केवढी क्रान्ति होणार आहे, हें सांगावयाचें आहे; पण तें " मधुगीतें " भाग २, या पुष्पांतच सांगूं. बालकवींचें चरित्र त्यांचे जेष्ठ बंधु रा. अमृतराव ठोंबरे हे लिहिणार होते. परंतु ते मुळ-शीच्या सत्याग्रहांत सरकारी कारागृहांत गेल्यामुळें चरित्राचें कार्य पुढील भागावर टाकणें प्राप्त झालें. शिवाय अमृतरावांना बालकवींच्या ज्या कविता तोंडपाठ येतात, पण ज्या कोठेंहि लिखाणांत सांपडत नाहींत, अशा कविताहि त्याच कारणामुळें पुढील भागांत ग्रथित केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. दुसऱ्या भागाची अवश्यकता आणखी एका कारणामुळें उत्पन्न झाली आहे. तें कारण म्हणजे, आमची भयंकर सामाजिक हेळसांड ! एक काळ असा होता कीं, केवळ भीडेखातर कांहीं सामाजिक व्यंगें झांकून टाकावीं लागत. पण एकतर तसा काळ आतां उरला नाहीं; व दुसरी गोष्ट, खुद्द आमचा मानसिक पिंडच, प्रसंग पडला असतां,

कठोर सत्यहि सांगण्याचा आहे. शिवाय बालकवींच्या कवितांचा, मानसिक पिंडाचा, नव्हे काव्यात्माचा ज्याला थोडा तरी पराक्रम कळेल, त्याला त्या थोर विभूतीलाहि अस्खल प्रेमाच्या अचल सत्याची केवढी सूक्ष्म परीक्षा आवडत असे हें कळून येईल. अशा तिहेरी आधारांवर उभे राहून आम्ही सांगतों कीं ज्यांच्यापासून आम्ही माहितीची व श्रमांची अपेक्षा केली होती त्यांच्याकडून आह्मांला कांहींसुद्धां मदत झाली नाहीं ! असा एक बालकवि–स्नेही नाहीं कीं ज्याला आह्मी स्वतः किंवा मध्यस्ती घालून, प्रेमानें, गोड वाणीनें, आमच्या कार्याच्या महत्त्वाचें व पावित्र्याचें कथन केलें नाहीं. बेंजामिन फ्रॅंकलिननें अमेरिकन युद्धाच्या अगोदर तासांचे, मिनिटांचे व सेकंदाचे वीर टिपून काढिले होते, त्याप्रमाणें आह्मी बालकवींचे स्नेही, आप्त, सगेसोयरे, वगैरे शोधून काढून, प्रत्येकापासून आह्मांला किती व कशा तऱ्हेची अपेक्षा आहे, व त्याप्रमाणें एक ओळ, एक साधार आठवण, एक खरें पत्र, अहो फार कशाला, एक प्रेसकॉपी जरी लिहून दिली तर आम्ही आभारी होऊं अशी हात जोडून विनंति केली. पण कोणी मत्सरामुळें ( कोणाच्या हरि जाणें ? ), कोणी द्रव्यलालसेमुळें, कोणी अज्ञानामुळें, व बहुतेकांनीं केवळ हेळसांडीमुळें आपापली फुलाची पाकळीदेखील आम्हांस पाठविली नाहीं नमूद करून ठेवावयास तीव्र वेदना होतात--पण नको! बालकविच म्हणतात–

( ५ ) चवथें पुष्प " **सोनपत–पानपत अथवा सोक्षमोक्ष.** " हें या पांचव्या पुष्पाबरोबरच उमललें असून त्याविषयीं इतक्यांतच बोलतां येणार नाहीं.

( ६ ) आतां हें पांचवें पुष्प.या " **मधुगीतां** " विषयीं, बालकवींच्या अत्यंत जीवलग मित्रांपैकीं एक, असे रा. केशवराव सोनाळकर, यांनीं आपल्या प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे. आह्मांला, या मधुगीतांमुळें मराठी भाषेंत, विचारांत व रसिकतेंत केवढी क्रान्ति होणार आहे, हें सांगावयाचें आहे; पण तें " मधुगीतें " भाग २, या पुष्पांतच सांगूं. बालकवींचें चरित्र त्यांचे जेष्ठ बंधु रा. अमृतराव ठोंबरे हे लिहिणार होते. परंतु ते मुळशीच्या सत्याग्रहांत सरकारी कारागृहांत गेल्यामुळें चरित्राचें कार्य पुढील भागावर टाकणें प्राप्त झालें. शिवाय अमृतरावांना बालकवींच्या ज्या कविता तोंडपाठ येतात, पण ज्या कोठेंहि लिखाणांत सांपडत नाहींत, अशा कविताहि त्याच कारणामुळें पुढील भागांत ग्रथित केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. दुसऱ्या भागाची अवश्यकता आणखी एका कारणामुळें उत्पन्न झाली आहे. तें कारण म्हणजे, आमची भयंकर सामाजिक हेळसांड ! एक काळ असा होता कीं, केवळ भीडेखातर कांहीं सामाजिक व्यंगें झांकून टाकावीं लागत. पण एकतर तसा काळ आतां उरला नाहीं; व दुसरी गोष्ट, खुद्द आमचा मानसिक पिंडच, प्रसंग पडला असतां,

कठोर सत्यहि सांगण्याचा आहे. शिवाय बालकवींच्या कवितांचा, मानसिक पिंडाचा, नव्हे काव्यात्माचा ज्याला थोडा तरी पराक्रम कळेल, त्याला त्या थोर विभूतीलाहि अस्सल प्रेमाच्या अचल सत्याची केवढी सूक्ष्म परीक्षा आवडत असे हें कळून येईल. अशा तिहेरी आधारांवर उभे राहून आम्ही सांगतों कीं ज्यांच्यापासून आम्ही माहितीची व श्रमांची अपेक्षा केली होती त्यांच्याकडून आह्मांला कांहींसुद्धां मदत झाली नाहीं ! असा एक बालकवि–स्नेही नाहीं कीं ज्याला आह्मी स्वतः किंवा मध्यस्ती घालून, प्रेमानें, गोड वाणीनें, आमच्या कार्याच्या महत्त्वाचें व पावित्र्याचें कथन केलें नाहीं. बेंजामिन फ्रँकलिननें अमेरिकन युद्धाच्या अगोदर तासांचे, मिनिटांचे व सेकंदाचे वीर टिपून काढिले होते, त्याप्रमाणें आह्मी बालकवींचे स्नेही, आप्त, सगेसोयरे, वगैरे शोधून काढून, प्रत्येकापासून आह्मांला किती व कशा तऱ्हेची अपेक्षा आहे, व त्याप्रमाणें एक ओळ, एक साधार आठवण, एक खरें पत्र, अहो फार कशाला, एक प्रेसकॉपी जरी लिहून दिली तर आम्ही आभारी होऊं अशी हात जोडून विनंति केली. पण कोणी मत्सरामुळें ( कोणाच्या हरि जाणें ? ), कोणी द्रव्यलालसेमुळें, कोणी अज्ञानामुळें, व बहुतेकांनीं केवळ हेळसांडीमुळें आपापली फुलाची पाकळीदेखील आम्हांस पाठविली नाहीं नमूद करून ठेवावयास तीव्र वेदना होतात--पण नको! बालकविच म्हणतात–

**तापल्या जिवाला कोण देइना ताप ?**
**संतप्त नरावर कोण करि न संताप ?**

( ७ ) कोणी काय केलें नाहीं हें सांगून आम्ही वैरी मात्र उत्पन्न करतों. तेव्हां त्यांची नामावलि न देतां, व त्यांना निदान लज्जा उत्पन्न होईल व ते अजून दुसऱ्या भागाकरतां तरी आपलें हृदय आमच्यापुढें उघडें करितील, अशी अपेक्षा करून, ज्यांनीं बालकवींच्या पश्चात् त्यांच्यावरचें आपलें खरें प्रेम किंवा आपला खरा आदर व्यक्त केला अशा, जनांत अनभिज्ञ पण काव्यमंदिरांत वंद्य मित्रांचा उल्लेख करण्याचा आनंद दाखविलाच पाहिजे.

( ८ ) रा. **केशवराव सोनाळकर** कांहीं जगाला नवे नाहींत. परंतु खरोखरच केशवरावांची थोरवी जगाला अजून चांगलीशी कळलीच नाहीं.आप्पांनीं आम्हांला जी मदत केली ती अशा स्वरूपाची आहे कीं,त्यांनीं आपल्या घरचें ताट आणून आमच्या घरीं आमच्या शिदोरींतल्या भाकरीबरोबर, मित्रभोजन केल्याचाच प्रकार झाला आहे. कोणीं कोणाचे आभार मानावे ? आम्हीं त्यांचे आभार मानावे असा आमचा अधिकार नाहीं. आमचे आभार मानण्याचा त्यांना मोह झाला तर तो मोहच ! बरें दोघांचे आभार अमृतरावांनीं मानले तर–त्यांनीं एकदां प्रयत्न केला होता, त्यावेळीं ते रडले,आप्पांना रडूं कोसळलें व धुळ्यास आमच्याकडेहि तोच प्रकार झाला !! रसिकांनो, आपण काव्यग्रंथ वाचाल च.वाचला म्हणजे मगच आमच्या या रडण्याचें रहस्य तुह्मांला कळेल !

( ९ ) या रडण्याचा अधिकार तिघांशिवाय आणखी कोणालाच कां नाहीं ? त्यांनीं कां बरें रडूं नये ? त्यांच्या हृदयाला दुःख होतच नाहीं कां ? बालकवींच्या तोडीचे जे आज हयात कवि आहेत, त्यांपैकीं कांहीं जणांचें, या कमालीच्या पवित्र कार्याला फक्त हातभार लावण्याचें हि कर्तव्य नाहीं कां ? शारीरिक पिंडानें जवळ असलेल्यांना कोणीं दोष द्यावा, पण मानसिक पिंड, व तो हि सहृदय कवींचा मानसिक पिंड मृदु असतो ना ? मग त्यांना आपल्या स्वतःच्या काव्योद्याना-खेरीज बाकींच्या कवींचीं काय कव्य–स्मशानें वाटावीं ? हर हर ! कोण ही हेळसांड ! कोण हा अप्पलपोटेपणा ! ! केवढी ही संकुचित काव्यदृष्टि !!!

(१०) तथापि एक खरा, अस्सल, शाहीर रडला होता! ढसाढसा रडला होता!! इतका रडला होता कीं त्यानंतर त्याला आपलें रोगग्रस्त शरीर लवकरच सोडावेंसें वाटलें. **गोविंदाग्रजांना** बालकवींचा अपघात कळला, तेव्हां ते प्रथम तर मूर्छितच पडले ; पण भानावर आल्यावर ते एकसारखे तासभर टाहो फोडून, दमून, थकून, धरणीवर पडले ! या रडण्याचा, आक्रोशाचा, टाहोचा, अर्थ, स्वाद, आनंद, ज्याचा त्यालाच ! रडा म्हणून कोणी रडत नसतो.

( ११ ) परंतु या रडण्याचे हुंदके मात्र संसर्गजन्य असतात. विधवेच्या कपाळपिटीनें पतिव्रतांनांहि दयेचे पाझर फुटतात. तिच्या दिराचे पाषाणहृदय मृताच्या तिजोरीलाच बांधलें

जातें ; पण त्या एका दगडाखेरीज सामान्य शेजाऱ्याचें हि करुणेनें ऊर धडधडतें ! गोविंदाग्रजांच्या बंधूंनीं, रा. शंकरराव गडकऱ्यांनीं आम्हांस निदान सहानुभूतीचीं पत्रें तरी पाठविलींत. आमचे धुळ्याचे एक रसिक स्नेही रा. भय्यासाहेब देशपांडे यांनीं आपला गायनरसिकतेचा फायदा आम्हांस असा करून दिला कीं, जेथें केवळ घाईमुळें बालकवींकडून शब्दचे शब्द लिहावयाचे राहून गेले होते, तेथें शब्दांची निवड करण्याच्या कामीं त्यांनीं अमृतराव व आम्ही, यांस अगदीं न रागावतां, उलट विनोदानें, आमचा हट्ट सांभाळून शब्द सुचविले, कवींच्या फारच थोड्या कवितांना मथळे होते. बहुतेक मथळे आमचेच आहेत. पण त्यांचें श्रेय आम्हीं घेत नाहीं. दोष मात्र घेतों. कारण मथळे देतांना केशवरावांपासून भय्यासाहेबांपर्यंत सर्वांशीं आम्हांस खडाजंगी वाद करावा लागला; असो. त्याचप्रमाणें पुण्याचे रा. दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ अज्ञातवासी कवि यांनीं लहान्या फोटोच्या ब्लॉकची मेहनत व खर्च सांभाळून आम्हांस मदत केली आहे. त्यांच्यासारखा उत्साही, रसिक, व खटपटी कविमित्र विरळा. त्यांनीं जळगांवीं मुद्दाम जाऊन, व अप्पांची मुद्दाम भेट घेऊन, आपणांकडून कांहीं तरी बालकवींची सेवा घडूं द्या, असा हट्ट धरला ! या भ्रातृप्रेमाकडे पाहतां खरा भाऊ कोण ? याची व्यावहारिक व्याख्या बदललीच पाहिजे. असो. बालकवींच्या काव्यावर

---

१ " सुमनकर्ते " रा. रा. वासुदेव कृष्ण भावे यांनींहि एक ब्लॉक पाठवून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

व चरित्रावर लेख लिहिणाऱ्यांचे, व त्यांच्या अप्रकाशित कवितांचें आपल्या मासिकांतून प्रकाशन करणाऱ्या संपादकांचेंहि आभार मानलेच पाहिजेत. कविता प्रकाशित करणाऱ्या संपादकांनीं मात्र विशेष काळजी घ्यावयास पाहिजे होती.

( १२ ) यावरून प्रस्तुत ग्रंथाच्या संपादनाविषयीं दोन शब्द लिहिणें अत्यंत जरूरीचें झालें आहे. कविता व वाचक यांच्यामध्यें संपादकानें अगदीं पडूं नये असें आमचें एक मत आहे.त्यानें कवीच्या कविता बरोबर रीतीनें दिल्या कीं त्याचें काम संपलें. टीपा देण्याच्या भानगडींत त्यानें मुळींच लक्ष घालूं नये. जरूरच पडल्यास आपल्या प्रास्ताविक दोन शब्दांत उल्लेख करून प्रकाश पाडावा. परंतु असें मत असूनहि आम्हांस त्याचें उल्लंघन करावें लागलें. बालकवींच्या कविताच अशा आहेत कीं, त्यांत अपुऱ्याच फार आहेत. त्यांत कित्येक कवितांची थोडी तरी माहिती दिल्याखेरीज त्या कळणारच नाहींत. कांहींचें मासिकांतलें संपादनच चुकीचें झालेलें आहे. कांहींवर टीपा देऊनच खरा प्रकाश पडतो. त्यामुळें टीपा देणें भाग पडलें. व त्या तेथल्या तेथें देऊनच परिणामकारक होण्यासारख्या होत्या. म्हणून आम्हीं त्या पुस्तकांतच दिल्या आहेत.त्या आम्हीं, अमृतराव व बाबूराव ठोंबरे आणि भय्यासाहेब देशपांडे यांच्या मदतीनें व सल्ल्यानेंच दिल्या आहेत. आतां आरंभीं आरंभीं त्या टीपा पृष्ठांच्या खालीं न देतां मध्येंच दिल्या गेल्या व ती आमची खरोखरच चूक झाली. परंतु लोकमान्य मासिकाची,स्वतःच्या ग्रंथलेखनाची, पत्रव्यवहाराची, प्रवासांची व शेवटीं प्रेसवाल्यांची

धांदल लक्षांत घेऊन रसिकांनीं तेवढी आमची चूक पदरांत घ्यावी अशी विनंती आहे. द्वितीयावृत्तींत ही ढोबळ चूक व कांहीं चोरून शिरलेलीं अशुद्धें दुरुस्त होतील अशी आम्ही हमी घेतों.

( १३ ) आतां रसिकांजवळ आणखी एक हितगुज करून त्यांना आप्पांच्या प्रस्तावनेकडे पाठवितों. दुसऱ्या भागांत कांहीं राहून गेलेल्या, कांहीं नव्या मिळालेल्या कविता व हातीं आलेलीं व येणारीं पत्रें येतीलच. परंतु बालकवींच्या चरित्राविषयीं व काव्याविषयीं चरित्रात्मक व टीकात्मक लेखहि मुद्दाम मागवून प्रसिद्ध करूं. केसरीकर्ते रसिकवर रा. नरसिंह चिंतामण केळकर, आधुनिक कवितांचें सरस परीक्षण करणारे रा. लक्ष्मणशास्त्री लेले, बालकवींचे प्रतिस्पर्धी, रा. अनंततनय, नव्या तडफेचे कवि रा. अज्ञातवासी, व रा. ए. या. निफाडकर हे टीकात्मक लेख लिहितील व रा. वासुदेव कृष्ण भावे, सुमनकर्ते रा. अमृतराव ठोंबरे, व कुमारी ताराबाई टिळक, बी. ए. ही मंडळी चारित्रात्मक लेख लिहीतील. त्याच भागांत अनंततनय व बालकवि यांचा केसरींतील वाद प्रसिद्ध होईल.

(१४) एका गोष्टीचा उल्लेख करणें व्यवहारदृष्ट्या जरूर आहे. कांहीं रसिकांनीं आम्हांस सांपत्तिक मदत केली असून, आमच्या महाराष्ट्रग्रंथमालेविषयीं व लोकमान्यमासिकाविषयीं दोन अभीष्ट- चिंतनपर शब्दहि लिहिले आहेत. या त्यांच्या पुण्याची नोंद राष्ट्रकल्याणाच्या परमेश्वराच्या वहींत झाली असल्याची त्यांच्या स्वतःच्याच मनानें त्यांची खात्री पटवली

असेल. आम्हांला परमेश्वराचा पोस्टमन होण्याचें कारणच नाहीं. त्यांचे आभार मानावे तर आतां आभार हा शब्दहि पोकळ गाम्याचा झाला आहे. पण आमची होत असलेली राष्ट्रसेवा त्यांच्या व वर्गणीदारांच्याच कृपेनें होत आहे हें मात्र खरें. तसें नसतें तर सरकारी खंजिराखालीं आमचा केव्हांच मुडदा पडता. मुडदा हा केव्हां तरी पडणारच, पण एक मात्र त्रिकालाबाधित सत्य गोष्ट आहे. ती अशी कीं, ही माला, हें मासिक, नव्हे

सर्वमेतत् लोकमान्यार्पणमस्तु ।

लोकमान्य कार्यालय,
धुळें

**एकनाथ यादव निफाडकर**



# माझा—छे! महाराष्ट्राचा बालकवि!!

भाग्यानें भागीरथीच्या निर्मल तटप्रदेशावर कांहीं काल रहावें आणि नंतर दुःखावस्थेंत ती सुखपूर्ण स्थिति आठवावी किंवा वसंत ऋतूंत गर्द आम्रछायेंत कोकिळाची श्रुतिविहारी वाणी ऐकून धन्य वाटावें आणि मग शिशिरांत ती कंठमाधुरी आठवावी अथवा, शरच्चंद्रिकेचा निर्भरानंद सेवन करून मेघांनीं व्याप्त अशा काळ्या कुट्ट रात्रीं त्या धवल ज्योत्स्नेस स्मरावें, तशी मनः स्थिति आज कै. बालकवि याच्या काव्यकलापास प्रस्तावना लिहितांना माझी झाली आहे. ज्याच्याबरोबर अभिन्न हृदयानें स्पृहणीय काळ घालविला, ज्याच्याशीं ‘ सुहृद् ’ ह्मणून अंतःकरणांचीं सर्व द्वारें उघडीं झालीं, तो प्रिय बालकवि दिवंगत झाला; आणि आपणांतून जो मागें राहील त्यानें पुढें गेलेल्या कविमित्राच्या काव्यप्रकाशनाचें पवित्र कार्य करावें या परस्परांतील ठरलेल्या संकेतानुरूप तें कार्य माझ्या वाट्यास आलें ! ज्या स्थळीं प्रिय बालकवीनें आपल्या आवडत्या कविता लिहिल्या; ज्या स्थळीं बसून त्या वाचून दाखविल्या;त्या स्थळीं बसून आज मी आमच्या खऱ्या कविभूषणाच्या या काव्यग्रंथास प्रस्तावना लिहित आहे! या वेळीं मनांत जी कालवाकालव चालली आहे ती मला शब्दांनीं व्यक्त करवत नाहीं. कांहीं केल्या बालकवीची मूर्ति

डोळ्यांपुढून हालत नाहीं. आणि मी रोधू पाहतों तरी हे विरहाश्रु रोधिले जात नाहींत !

\+ + +

सृष्टींतील चराचर वस्तूंत वसत असलेलें सौंदर्य दिव्य दृष्टीनें पाहणें; तारामंडळांत भरून राहिलेलें मनोहरत्व प्रतिभेच्या गगनविहारी नौकेवरून अवलोकन करणें आणि पातालांत दडी मारून तेथील अगोचरत्व भासमान करून घेणें हीं दिव्य कवींचीं दिव्य लक्षणें होत. त्या स्थितींत भावनेची जी अद्भुत समाधी लागते तींत हें जग व या जगांतील स्वार्थसंबंध यांचा विसर पडतो. जणो काय वातावरणांतून घुमत आलेल्या स्वर्गीय संदेशाचे न कळत आघात हृदयावर होत असतात. तेणें करून प्रकंपित झालेल्या हृदयाचे जे सहजोद्गार ती सत्कवींची सत्कविता होय. सृष्टींत राहून प्रतिसृष्टि निर्माण करून तद्रूपतेनें—तज्जन्य अनुभवानें-प्रवचनोन्मुख झालेल्या काव्यवाणींत अज्ञात रहस्यें गूढतत्वें व विलक्षण चेतष्कर्पी स्वर्गीय संदेश भरलेले असतात. ज्या हृदयांतून असे नितांत सुंदर काव्यनिर्झर उसळून वर येतात तें पवित्र, रमणीय व स्पृहणीय असलें पाहिजे हें विधान अत्युक्तीचें कसें म्हणवेल ? स्वतः बालकवींची कविविषयींची कल्पना च अशी होती कीं, कवि हे स्वर्गांतील पुण्यवान् प्राणी, परंतु ते क्षीण पुण्यानें भूतलावर अवतरले. ज्या कवीची कविविषयीं अशी उदात्त कल्पना होती तो प्रेमळ, पवित्र भक्तियुक्त अंतःकरणाचा असावा याला आणखी प्रत्यंतर तें काय पाहिजे ?

आपण खरोखर गगनवासी, इहवासी नव्हत; उषा, संध्या हीं आपल्या गृहाचीं दारें; आकाशगंगा ही आपली नदी; सूर्य, चंद्र, तारे हे आपले स्नेही; याच नभोविहारी कल्पनातरंगांत पोहणाऱ्या बालकवीच्या कवितेंत कितितरी भाग या उदात्त विषयानें भरून गेला आहे. संध्यारजनीं संध्यातारक, पौर्णिमेची चांदणी रात्र, कविबाळें, ताराराणी, मधुयामिनी, अष्टदिशांचा गोफ, शुक्रोदय, अरुण, कवीचा विचार, इत्यादि विषयांत बालकवि हे 'कविबाळें' या कवितेंतील आपल्या कल्पनेस अनुसरून च्युत झालेल्या भूतलावरून स्वर्गद्वारावर पुनःपुन्हां जाऊन उभा राहिला आहे. भूतलावरून प्रतिज्ञेच्या जोरावर अंतरिक्षाच्या विशाळ प्रदेशाची वारंवार सफर करणाऱ्या बालकवीनें अंतर्गत मुग्ध सृष्टीला जितकी बोलकी केली तितकी कोणत्याहि कवीनें केली नाहीं. तेथील लीला, तेथील प्रीति, तेथील विलास, तेथील वत्सलता, यांचा कौतुकार्ह अनुभव बालकवीच्या रसाळ रसनेनेंच आपणास घ्यावयास सांपडेल.

* * *

निसर्गाच्या दोन भागांपैकीं उद्धृत केलेला अंबरगत भाग व दुसरा पृथ्वीतलावरील पर्वत, निर्झर, सरिता व वनराजी यांचा भाग. हे दोन्ही या कवीचे काव्य विषय. बालकवि ह्मणजे "निसर्गाचा कवि" असें प्रत्येक महाराष्ट्रीय त्यास ह्मणतो; व तें अक्षरशः खरें आहे. आकाशस्थ दिव्य सौंदर्यानें दिव्य

प्रीतीच्या लहरींत तो जसा विरून जात असे, तद्वत् निर्झरांचे पर्वतराजींतून चाललेले स्वच्छंद विहार, सरितांचे रम्य प्रवाह, पर्वतांचीं उत्तुंग शिखरें, वनराजींतील लतांच्या मनोज्ञ गुंफा, तरूंचे प्रेक्षणीय कुंज, या भूतलावरील निसर्गात त्याचें मन दंग होऊन जाई. दिव्य प्रीतीच्या उसळत्या लहरीनें उद्गातुकाम झालेल्या त्याच्या वाणीनें निर्झराचें श्रुतिमनोहर व हृदयसंवेद्य मधुगीत गाइलें आहे ; प्रवाताच्या तालसुरावर वनराजीचें सौंदर्यगीत गाईलें आहे ; सरितेच्या तीरावर वनमालेला बसवून तिच्या लावण्यानें मोहित झालेल्या युवकासह तिचा सुंदर संवाद रचला आहे ; 'ऊन' 'पाऊस,' 'श्रावणमास' 'गवताचें गाणें' 'खेड्यांतील रात्र' 'भारद्वाजास' हीं सर्व कवीची याच भावनासमाधींतील गाणीं होत.

बालकवीच्या काव्योद्यानांत केंद्रीभूत असे जे दोन मनोरे उभारलेले दिसतात त्यांपैकीं निसर्गाच्या मनोऱ्यावरून त्याच्या बहरलेल्या कवितालतिकांचें एव्हांपर्यंत सांगितलेलें निःसीम सौंदर्य पहावयास सांपडतें. दुसऱ्या संसृतिच्या ऐहिक मनोऱ्यावर चढावें तों जिकडे तिकडे उद्विग्नता, उदासीनता, वैराग्य, नैराश्य, वैताग यांचेंच रान भरून गेलेलें दिसतें ! 'निश्वास' 'भटकणें' 'उदासीनता' 'तापल्या जिवाला कोण देईना ताप' 'काळास' 'संशय' 'निराशा 'पारवा'' 'हृदयाची गुंतागुंत' यांत बालकवीचे विषण्ण, खिन्न, दिङ्मूढ अंतःकरण हळहळलें आहे. या दुखपूर्ण विचारांचे

झंझावात एथेंच थांबलेले नाहींत तर ते पूर्वभागांवरून हि ओझरून गेलेले दिसतात. त्याचें अंत:करण पिळवटून निघालेलें असल्यामुळें आंतील बोल तत्वज्ञानानें भरलेले, परमार्थाच्या विचारांत शिरलेले असे आहेत.

संसारांतील आपत्तींनीं नासलेल्या जीवाला अल्पतरी गृहसुखाचें विश्रांतिस्थान असावें लागतें. तें असलें म्हणजे लहानशा फळीवरहि दर्याच्या भीषण लाटांना उल्लंघून जाण्याची जशी नाविकाला आशा असते तशी त्याला असते, पण गृहसुखालाच आग लागल्यावर काय करायचें ? अशावेळीं खिन्नतेच्या व विषण्णतेच्या खडतर मार्गानें मनुष्य बहुधा परमार्थाच्या मार्गाकडे वळतो. तुकाराम, सॉक्रेटीस हे ज्यांत प्रमुख आहेत अशा महापुरुषांचीं उदाहरणें याला पुरेशीं आहेत. पार्शिया देशांतलि महाकवि शेख सादी आणि गांधार देशांतलि महाकवि फर्दोसी हेही असेच पत्निसुखाला मुकलेले कवि होत. सादीचें आणि त्याच्या बायकोचें तर मुळींच पटेना. एका प्रसंगीं त्याच्या बायकोनें त्याला खोंचून म्हटलें " बस. माझ्या बापानें तुमच्या पायांतील बेड्या काढून विकत घेतलें आहे " त्यावर त्यानें खोंचदार उत्तर दिलें " हो. तुझ्या बापानें माझ्या पायांतिल एक बेडी काढिली खरी पण

---

१" सादी " लढाईतील कैदी होऊन गुलाम म्हणून विकला गेला होता. त्याचा काव्यगुण पाहून त्याच्या सासऱ्यानें त्याला विकत घेऊन आपली मुलगी त्यास दिली.

तिच्या ऐवजीं दुसरी बेडी ( तूं ! ) अशी घालून दिली आहे कीं, ती माझ्याहि बापाच्यानें निघणार नाहीं ! ! " ही गत कालांवरील निरीक्षक दृष्टि अगदीं आधुनिक काळाकडे वळवावी तों कै. रेंदाळकर व कै. गोविंदाग्रज यांना पत्नीसुख मिळालें नाहीं आणि प्रस्तुत बालकवीहि गृहिणीसुखाला अगदीं मुकला होता. त्याच्या उद्विग्नतेचें मूळ कारण हेंच होतें. सोबत त्याची प्रेमळमनाचीं प्रत्यंतर देणारीं जीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांत मधून मधून त्याचा दुःखोद्रेक व्यक्त झाला आहे. एका पत्रांत त्यानें आपल्या मनाची स्थिति कशी झाली आहे हें लिहितांना–पाणी टाकून विझवलेल्या निखाऱ्या सारखी माझी मनः स्थिति आहे. खालीं कोळसे व वर किंचित् धग अशी मोठी समर्पक उपमा दिली आहे. ' अलीकडे मजकडून कविता लिहिली जात नाहीं. असें त्यानें ठिकठिकाणीं या पत्रांत म्हटलें आहे. कविताग्रथनाला जी एक विविक्षित मनाची प्रसन्नता असावी लागते. त्या प्रसन्नतेला या विघटनेनें तो मुकला होता. त्याच्या जिवाला चैन म्हणून वाटेना. कुठें केव्हां जरा समाधानाच्या वायूची लहरी आली कीं हा आम्रावरील कोकीळ गाऊं लागे. पण पुढच्याच क्षणीं पुन्हां मुका होई. बालकवीच्या पुष्कळ कविता अपूर्ण आहेत याचें कारण हेंच.

' कविबाळें ' या कवितेंतील त्याच्या रम्य कल्पनेप्रमाणें, जेथून आपण ढळलों, त्या दिव्यस्थानावरील त्याची प्रीति आणि प्रापंचिक आपत्तींत विपन्न झालेल्या प्राण्याची परमार्थ-

प्रिति, या दोन गोष्टी लक्षांत घेतां त्याला शेवटीं शेवटीं या जड देहाचा बंध तोडून मायापाशाला झुगारून जावेंसें कां वाटत होतें याचें कोणीहि निराळें कारण योजणें अप्रयोजक होईल. ज्ञानेश्वर तुकाराम यांच्या काव्यवाणीचा त्याला व्यासंग याच मनःस्थितीनें घडविला. संतांचा अनुवादहि याच भावनेनें अवतरला. धर्मरूढीच्या ज्या बंधनानें तो जखडला गेला होता, त्या धर्माचें विकृत रूप आणि रूढीची बलवत्तर सत्ता यांचा त्याच्या मनाला पुरा पुरा वीट आला होता, हें ' धर्मवीर ' सिद्ध करितो; पण या पत्रसमूहांतील एक पत्रहि त्याची साक्ष देईल. संतांच्या अनुवादांत प्रत्येक अभंगाखालीं रमाईचा बाळ म्हणून जो बालकवीनें स्वतःसंबंधानें उल्लेख केला आहे ती रमाई म्हणजे कवीची माता असा समज होऊन, असा अतुल कवि प्रसवणाऱ्या रमाईस व्यर्थ धन्यता मिळण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति अगदीं भिन्न आहे. माय म्हटलेल्या मायाविनीनें दंश केलेल्या या प्रस्तुत कविमित्राच्या किंकाळीसरसा बालकवि धाऊन जात होता तों मधेंच आगगाडीखालीं त्याचा अंत झाला. यापेक्षां प्रत्यक्ष अनुभव घडूनहि या विषयावर अधिक प्रकाश काय पाडावा ?

मरणाच्या पूर्वी येथून उडून जाण्याची त्याच्या जीवाची तळमळ किती वाढली होती हें त्या काळांतील त्यानें लिहिलेल्या कवितांवरून चांगलें कळून येतें. अशी एक कविता पहाः—


जगाचे बंध कोणाला—जगाचा बांधला त्याला ॥
मला जो थांबवी ऐसा——जगीं निर्बंध ये कैसा ॥
जगानें देह हा केला——जगाला वाहिलें त्याला ॥
ह्णा मारा खुडा तोडा——परी आतां मला सोडा ॥
न कीर्तीला न प्रेमाला——न सौख्याला विलासाला ॥
न विघ्नाला न मृत्यूला——मला ये आडवायाला ॥

इतकी बेभान वृत्ति झाल्यावर मानसशास्त्राप्रमाणें ह्णा कीं अध्यात्मशास्त्राप्रमाणें ह्णा, आत्म्याची इच्छा पूर्ण झालीच पाहिजे. जड देहाचा बंध तोडून बालकवि आपल्या आवडत्या स्वर्मंदिरीं निघून गेला. पण त्याच्याच भाषेंत बोलवयाचें ह्णजे आज महाराष्ट्र शारदेचें " भरलें घर ओकें ओकें " वाटत आहे. तिच्या उपवनांत विविध वृक्षांच्या डहाळयांवर विविध कविविहंग गात आहेत; पण जी एक डहाळी बाल-कवि सुनी करून गेला ती भरलेली दिसत नाहीं ; तेथून ते प्रेमळ सूर आतां ऐकायास येत नाहींत. आज महाराष्ट्रानें महाराष्ट्रांतील खानदेशानें-बालकवीचें रिक्त झालेलें स्थान पाहून अश्रु गाळावे या दुःखांतच त्याचें भाग्य आहे. माझा—छे ! महाराष्ट्राचाच बालकवि, त्र्यंबक बापूजी ठोंबरे !!

**जळगांव**
**१४।८।२३**

**केशव महादेव सोनाळकर**

# सृष्टिसौंदर्यविषयक



कै० बालकवि

त्र्यंबक बापूजी ठोंबरे.

धुळे, आत्माराम छापखाना.

ा. क्र 2333 ता०८-५ ६।१

# महाराष्ट्र–ग्रंथ–माला

पुष्प पांचवें

# मधुगीतें

## मंगलमय प्रेमकवन

सृष्टि निमाली स्वर्गहि उुरले। प्रेम मात्र मंगलमय भरलें
तेज हरपलें तम मालवलें। उन्मलीत मन तन्मय मुरलें
जागृति नव्हती स्वप्नहि नव्हतें। भाव मनोज्ञ स्फुरले तेथें
सूरहि नव्हते शब्दहि नव्हते। गीतच हृदयंगम बनलें तें
सृष्टि पातली स्वर्गहि आले। तेज–तमांचें मीलन झालें
सूर उदेले शब्द निघाले। विश्व कवन ते ऐकुनि धाले

## अरुण

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळिली मूढ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं,
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.

क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिंवळे कांहीं,

रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा ?

अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय?
कीं. नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात—
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गीच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा ‘ माझी चोरुनि नेली मोत्यांची माला ’
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला ?
कीं, रात्रीचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली ?
किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं अपणावर आज पातली हीच खरी विजया ?
कीं, स्वर्गीच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार,
जणू वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार ?
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं, सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ?

“ तेजानें न्हाणिते जगाला कोण सखे बाई ?

नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीहि !
परस्परांना दिशा ह्मणाल्या प्रेमळ वचनांनीं
" विरह-काल संपला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा-पुरे गडेग ! हा तुमचा मान !
अह्मी गवळणी हृदय-रसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! ह्मणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्ण गडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूंग ! शंकित कां ह्मणुनी ?
सर्व सारख्या ? हांसावें मग कोणाला कोणीं ? "
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला कृष्णाचा कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्भुत लहरी वसुधेवर आली !

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आम्हांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें.
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंव बिंदूचा—नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा—
मुग्धपणाचा बालपणाचा कोमल हृदयाचा—
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,
योग्यच, अथवा प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !

प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिक कां हृदयाचीं कोडीं ?
जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
लाजच अथवा–खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी ?

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला
भव्य गिरींनों ! निजशिखरांवर झेलुनि घ्या याला.
नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील,
' निगा रखो ! ' येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक !
सुवासिनींनो, वनदेवींनों, डोला ग डोला !
नटवा सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !
वनमालांनों, हळूंच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !
' जय ' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं द्या धाडुनि ही विहगांची माला !
सरोवराच्या फलकावरती स्वर्गाच्या छाया

कुणी रंगवा कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलींच्या वळयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी !
कुणी कुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुल शब्दांहीं !
उषःकालच्या सुगंध, शीतल, मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरती स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोंके दे त्याला !

ऊठ कोकिळा, भारद्वाजा, ऊठ गडे, आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते, गाणें तुझें, सुरांमधिं या मिळवीं बाई !
साध्या भोळ्या तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिंवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं !
चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान !
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे झोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें,
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्याचीं गाणीं.

## संध्यारजनी

अस्तगिरीच्या अभिनव कुंजीं निजला निजनाथ,
बघतां बघतां त्यास रंगलें वारुणिचें चित्त.
हळुंच पाहते, मधुर हांसते, जाते लाजून,
ह्मणे मनाशीं " जीव टाकुं का हा ओवाळून ! "
प्रेमनिर्भरा बघुन सखीला भास्कर मायावी
जातां जातां साखरचुंबा एक तिचा घेई !
लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला,
त्यांतच आल्या रोषाच्याही लहरी गालाला ?

गेला, झाला दृष्टिआडही सूर्य, तरी अजुनी
पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं.
थक्क होउनी दिशा ह्मणाल्या " काय मोहिनी ही !
प्रेम—समाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं !
" किती पश्चिमे ! आतां त्याचें चिंतन करिशील ?
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ ?
खिन्नपणा हा पुरे ! पुरेग अश्रूंची माळ !
उद्यां वरं का तो राणीला अपुल्या भेटेल ? "

संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हळुच पाहते, खुणावितेही ' या-या ' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?

लाजत लाजत असाच येइल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतिल गगनीं आतां नव लाख.
प्रथम तारके ! पहा सखी तव एक पुढें आली,
ही दुसरी, ही तिसरी–आतां किति तरि अंवतालीं !

आली होती भरती, आतां अस्त समुद्राला,
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला !
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती ?
आकाशींच्या गंगेला कीं बुद्बुद हे येती ?
नव टिकल्यांची चंद्रकला कीं गगनश्री नेसे ?
स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें ?
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !
मंगल मंगल जिकडे तिकडे जय मांगल्याचा !

रजनीदेवी ! वैभवशाली तूं अमुची राणी,
हीं नक्षत्रें, तारा साऱ्या, लीन तुझ्या चरणीं.
ज्याच्या त्याच्या तारा वांटुन दे ग्रहगोलांनां,
गगनमंडलीं फेर धरूं दे प्रेमाचा त्यांनां.
दिशादिशांला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !
काळया काळया या पडणाऱ्या अंधरासंगें
ब्रह्मांडाचें हृदय नाचवीं प्रेमाच्या रंगें !
काळया अंधारांत खेळतें विश्व लपंडाव,
ताऱ्यांवरती बसून बघती तें कौतुक देव.

दहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला.
मंद मंद तेथांत शोधिते गगनश्री त्यांनां,
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना.
खेळ चालला एकसारखा हा खालींवरती,
पूर्व दिशाही तोंच हांसली सांपडली हातीं !

* * *

उदयगिरीवर नवतेजाची शांत पताका ही !
कीं, गंगेच्या शुभ्र जलाचा स्रोत वरी येई ?
हे मेघांचे धुऊन पडदे स्वच्छ कुणीं केले ?
मंगल मंगल तेज चहुंकडे कुठुनि वरें आलें ?
अर्ध्या मिटल्या अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं
कुणास बघती दिशा कळेना मंदस्मित करुनी ?
पहा उदेला दिव्य गोल हा-छे. भलतं कांहीं !
हा तारांचा सखा तयांनां भेटाया येई !

* * *

तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्यहाळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे अलिंगन दिव्य यामिनीला,
बहिणी बहिणी तुह्मी सुखानें चंद्राशीं खेळा !
कां तारांनो ! तुह्मी लाजतां ? हा मंगल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल !
ब्रह्मांडाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुलें शांतिचीं अहा उधळलीं जगतीं चौफेर !

निज निज आतां ह्मणे जगाला वत्सलता माता,
रजनीदेवी गात बैसली अंगाई गीतां.
गगनाच्या या शेजेवरती निजवा तारांनां,
चंद्रा ! दे ओढणी तुझ्या नव तेजाची त्यांनां.
हंसतां हंसतां झोंप लागली दहा दिशांनांहि,
ब्रह्मांडाचा गोल डोलतो, पण जागा नाहीं !
या प्रेमाला गातां गातां कविचेंही चित्त
प्रेमाच्या निद्रेंत रंगलें पाठ गात गात

---

## निर्झरास—

गिरिशिखरें वनमालाहि दरी दरी घुमवित येईं !
कड्यावरुनि घेऊन उड्या खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती, फिर गरगर अंगाभंवतीं,
जा हळुहळु वळसे घेत लपत छपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें झुलव गडे, झुळझुळ गानें !
वसंत मंडप–वनराई आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिंवळीं शेतें सळसळतीं–गातीं गीतें,
झोंप कोठुनी तुला तरी, हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तूं–बालगुणी बाल्यचि रे! भरिसी भुवनीं!

---

बालतरू हे चोंहिकडे ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंहि मुक्तामणि उधळुनि देईं !
बुदबुद–लहरी–फुलवेली फुलव सारख्या भवतालीं.

सौंदर्य हृदयांमधलीं दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरती रानफुलें फुलतीं हंसतीं.
झुलवित अपुले तुरे तुरे निळी लव्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बारे ? वन नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा बालवसंतचि तूं चतुरा ;
या लहरी लहरी मधुनी स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं!

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरती;
रम्य तारका लुकलुकती नीलारुणफलकावरती;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येतीं तुजला रात्रंदिन भेटायाला !
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनियां अवघीं भानें,
धुंद हृदय तव परोपरी मग उसळी लहरी लहरी.
त्या लहरीमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततति !
नवल न, त्या आशायाला स्वर्गहि जर भूवर आला !
गंधर्वा ! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें !

पर्वत हा, ही दरी दरी तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिरचर झालें ! गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें !
मुरलीच्या काढित ताना वृंदावनि खेळे कान्हा ;

धुंद करुनि तो नादगुणें जडताही हंसवी गानें;
दिव्य सख्याच्या वेणुपरी तूंहि निर्झरा ! नवल परी—
गाउनि हें झुळझुळ गान विश्वाचें हरिसी भान !
गोपि तुझ्या हिरव्या वेली रास खेळती अंवतालीं !
तुझ्या वेणुचा सूर तरी चराचरावर राज्य करी !

काव्यदेविचा प्राण खरा तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्याच्या धुंदिगुणें दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्यांची सुंदर माला ओवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी सरस्वतीचा कंठमणि !
अक्षय तव गायन वाहे अक्षयांत नांदत राहे !

शिकवीं रे शिकवीं मातें दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली—लहरी असल्या मम हृदयीं उसतळो खुल्या !
वृत्तिलता ठायीं ठायीं विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी—काव्यस्फूर्ति ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चवदा भुवनीं दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे ! अविच्छिन्न मग चोंहिकडे !
प्रेमशांतिसौंदर्याहीं वेडावुनि वसुधा—माई—
मम हृदयीं गाइल गाणीं रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !

आणि जसें सगळें रान गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही गाइल मम गाणीं कांहीं !

---

## फुलराणी

हिरवे हिरवे गार गालिचे। हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती। फुलराणी[1] ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत। अव्याज मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला। अवगत नव्हत्या कुमारिकेला!
आईच्या मांडीवर बसुनी। झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला। साध्या भोळ्या फुलराणीला?

पुरा विनोदी संध्यावात। डोलडोलवी हिरवें शेत;
तोच एकदां हांसत आला। चुंबुन ह्मणे फुलराणीला :-
"छानी माझी सोनुकली ती। कुणाकडे ग पाहत होती?
कोण बरें त्या संध्येंतून। हळुंच पाहतें डोकावून?
तो रविकर का गोजिरवाणा। आवडला अमुच्या राणींना
लाजलाजली या वचनांनीं। साधी भोळी ती फुलराणी?

आंदोलीं संध्येच्या बसुनी। झोंकें[2] झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल। नभीं चमकती ते ग्रहगोल!

---

१ एक कळी. २ रे. टिळकांनीं ' झोंके ' असें प्रसिद्ध केलें आहे. ( अ. का. माला. भाग २. पृष्ठ १७२ ) पण मूळांत ' झोंकें ' असें तृतीयांतीं रूप आहे; व तेंच अधिक काव्यमय व सार्थ आहे. ए. या.

जादूटोणा त्यांनीं केला । चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें, निजलें रान । निजले प्राणी थोर लहान.
अजून जागी फुलराणी ही । आज कशी ताकयाव( नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा । काय जाहलें फुलराणीला ?

—※— —※— —※—

या कुंजांतुन त्या कुंजांतुन । इवल्याशा या दिवल्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं । खेळखेळते वनदेवी ही.२०
त्या देवीला ओंव्या सुंदर। निर्झर गातो; त्या तालावर—
झुलुनि राहिलें सगळें रान । स्वप्नसंगमीं दंग होउन !
प्रणयचिंतनीं विलीन वृत्ति।कुमारिका ही डोलत होती;
डुलतां डुलतां गुंग होउनी।स्वप्नें पाही मग फुलराणीः-

—※— —※— —※—

" कुणी कुणाला आकाशांत । प्रणयगायनें होतें गात;
हळुंच मागुनी आलें कोण,। कुणी कुणा दे चुंबनदान"?
प्रणय—खेळ हे पाहुनि चित्तीं । विरहातां फुलराणी होती;
तों ज्योतींच्या प्रेमदेवता।वाऱ्यावरती फिरतां फिरतां—
हळूंच आल्या उतरुन खालीं।फुलराणीसह करण्या केलि.
परस्परांना खुणवुनि नयनीं। त्या वदल्या ही अमुची राणी!

—※— —※— —※—

स्वर्भूमीचा जुळवित हात । नाचनाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला।हळुहळु लागति लपावयाला
आकाशींची गंभीर शांति । मंद मंद ये अवनीवरती;
विरूं लागलें संशयजाल, । संपत ये विरहाचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी । हर्षनिर्भरा नटली अवनि;
स्वप्नसंगमीं रंगत होती । तरीहि अजुनी फुलराणी ती!

तेजोमय नव मंडप केला, । लख्ख पांढरा दहा दिशांला,
जिकडेतिकडे उधळित मोतीं। दिव्य विजांडी गगनीं येती
लाल सुवर्णी झगे घालुनी। हांसत हांसत आले कोणी;
कुणी बांधिला गुलाबि फेटा। झकमकणारा सुंदर मोठा!
आकाशीं चंडोल चालला। हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटानें लग्न कुणाचें-। साध्या भोळ्या फुलराणीचें!

गाउं लागले मंगलपाठ, । सृष्टीचे गाणारे भाट;
वाजवि सनई मारुतराणा। कोकिळ घे तानांवर ताना!
नाचुं लागले भारद्वाज, । वाजविती निर्झर पखवाज.
नवरदेव सोनेरी रविकर। नवरी ही फुलराणी सुंदर!
लग्न लागतें! सावध! सारे। सावध! पक्षी सावध! वारे!
दंवमय हा अंतरपट फिटला। भेटे रविकर फुलराणीला!

वधूवरांना दिव्य रवांनीं, । कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें। परस्परांचें, प्रेम! अहा तें!
आणिक तेथिल वनदेवीहि। दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं। फुलराणीची गोड कहाणी।
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं। स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला। नवगीतांनीं फुलराणीला!

## तारकांचें गाणें

कुणि नाहीं ग कुणि नाहीं। आम्हांला पाहत बाई॥
शांति दाटली चोहिकडे। या ग आतां पुढें पुढें।
लाजत लाजत। हळुंच हांसत॥

खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीही पाहत नाहीं ॥ १ ॥
सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून ॥
प्रेमाच्या वसतीकरितां । जग सगळें फुलवूं आतां ॥
दिव्य स्वानीं । गाणीं गाउनि ॥
विश्वाला निजवायाला । वाऱ्याचा बनवूं झोला ॥ २ ॥
फेकुनि द्या इकडे तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे ॥
या निर्मल अवकाशांत । प्रेमाचें पेरूं शेत ॥
मंद्याथिनी– । सर्व गुंगुनी ॥
झोंप लागली जगताला । या ग आतां खेळुं चला ॥३॥
सरितांच्या लहरींवरती । नाचूं या निर्भय चित्तीं ॥
अर्धोन्मीलित फुलवोनी । लपूं चला कलिकांत कुणी ॥
कविहृदयांत । गरके घेत ।
जाउनिया खेळूं आतां । हीं गाणीं गातां गातां ॥ ४ ॥
एकादी तरुणी रमणी । रमणाला आलिंगोनी ॥
लज्जामूढा भीरुत्व ती । शंकित जर झाली चित्तीं ॥
तिच्याच नयनीं । कुणी बिंबुनी ॥
धीट तिला बनवा बाई । भुलवा ग रमणालाही ॥ ५ ॥
सुखभ्रांतीं गुंगवुनी । पुण्यात्मे हसवा कोणी ॥
आशा उग्रा उग्रांच्या चित्तीं । त्याच रचा स्वप्नांबरनीं ॥
दयितचिंतनीं । विरहभावनीं ॥
दिवसां ही झुरली बाला । भेटूं द्या स्वप्नीं हिजला ॥ ६ ॥
अनेक असले खेळ करूं । प्रेमाशा विश्वांत भरूं ॥
सोडुनिया अपुले श्वास । जगीं नाचवूं उल्हास ॥
प्रभातकाळीं । नामनिराळीं ॥
होउनिया आपण राहूं । लोकांच्या मौजा पाहूं ॥ ७ ॥

## संध्यातारक

दिनरजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पहिलें !
कोमल किरणीं, नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत.
लहरींच्या सुंदर आंदोलीं
लहानग्याची शय्या केली,
रजनी ओंव्या गाउं लागली:
तूं लडिवाळा ! निज निज बाळा ! मातेच्या हृदयांत.
विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन !
तूं वेल्हाळा ! निज निज बाळा ! मग गीतसुरांत
तेजाला आन्दोलन देत
मंदपणें विचरे स्वर्गांत
शांत शांत अवघ्या गगनांत,
दिव्य अप्सरा, सुगुणागारा, प्रीतिगीति गातात.
त्या गीतींच्या मधु लहरींनीं.
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझ्या म्हणोनी—
मीही गातें, अस्फुट गीतें, हृदयाच्या हृदयांत.
झोंप कशी ती परी अजुनिहि
आज गडे तुज लागत नाहीं ?
सांग करूं तरि आतां काई ?
बघ ना बारे ! विश्वच सारें; निजलें प्रभुहृदयांत.

आन्दोलीं तुज नीज न येई

घेतें तर उचलुनि मी बाई

झांकियलीं ग मधुनेत्रें हीं,

पदराखालें, झोंपीं गेलें, बाळ कसें इतुक्यांत ?

---

## शुक्रोदय

सौंदर्य शब्दातीत । स्वर्भूवर अवतरत,
तेजाची फुटली पेठ । दिव्यत्वाची लयलूट
कृष्णपक्षिंच्या चंद्रकला । त्यावरतीं तरते विमला
शांति दाटली निस्तुल ही । मंद कौमुदीसहवासीं
स्वर्गाच्या वरचें तेज । तारांगणिं भरलें आज
त्यांतच तमही भासतसे । रजनीचे मधुमंत्र जसे
निश्चिंतपणा अवनीला । निश्चिंतपणा गगनाला
विश्राम धिं मिश्रित झाला । निस्पंदपणा अवनीला
तेजतमांचे झुंज परी । अव्यक्त नभीं हांस्य करी
संधिकाल अत्युत्कट तो । क्षितिजावर अस्फुट फुटतो !
अत्युत्कट सगळें कांहीं । नित्य नवी शोभा पाहीं
सौंदर्य वेडें झालें । तेजाची वारुणि प्यालें.
दिव्याच्या मागुनि चाले । विश्व खरें, कळुनि आलें
केंद्र तया सौंदर्याचा । शुक्र नभीं उगवे साचा.
मुकुट कळ्यांचा दिव्य शिरीं । पीतांबर परिधान करी
तेज विखुरलें चोंहिकडे । पुष्पावर गगनीं उघडे
मंगल मंगल गीत म्हणे । अस्फुट रजनी सूर गणें
बाल सुधाकर बालकरीं । बालशिरीं अभिषेक करी.

## मधुयामिनी

मधु यामिनि नील-लता
हो गगनीं कुसुमयुता
धवलित करि पवन-पथा
कौमुदि मधु-मंगला ॥ १ ॥
दिव्य शांति चंद्रकरीं
आंदोलित नील सरी
गिरिगिरिवरि, तरुतरुवरि
पसरी नव भूतिला ॥ २ ॥
सुप्रसन्न, पुण्य, शांत
रामण्यक-भरित धौत
या मंगल मोहनांत
विश्वगोल रंगला ॥ ३ ॥

---

१ पुण्याला असतां कवीचे धाकटे बंधु रा. बाबूराव यांच्या समवेत वाल्मीकिरामायण वाचित असतां सहजरीत्या ही कविता झाली आहे. ए. या.

---

## अष्टदिशांचा गोफ

सांज खुले सोन्याहुनि पिंवळें हें पडलें ऊन
चोंहिकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान !
पांवरली जरतार जांभळी वनमाला शाल
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल
त्या तेजाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बाल विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत ! ६

क्षणभर येथें क्षणभर तेथें, भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची!
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी.
गिरिशिखराचें गोल फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं? १२

अष्टदिशांचा गोफ सभोंनीं हा भिरि भिरि पाहे
मंद झुले वनमाल वाहतां शांत झरा राहे.
समाधिस्त जणुं काय जाहलें हा गिरि हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून?
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मित चित्त स्तब्ध उभा ठेला १८

सृष्टिदेविच्या सगुणशाळा स्वर्गीच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या!
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगिं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते कां घेऊनिया हातीं? २४

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं!
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे

चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें. ३०

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं,
शांति मिळेना क्षणभर जीवा विश्रांती नाहीं.
काव्य-देवता अंतरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
आतें माझे वातावरणीं तुजपरि भरभरती
पंख तुटुनियां विव्हल पडलों मीं धरणीवरतीं ३६

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचें ही नाचे
बंदहि होतीं शिथिल हरपतें भानहि जगताचें.
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं
हाय ! सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठीं !
दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे ४२

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकी.
अपूर्ण अपुलें ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली [1]
कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली. ४८

---

१ या वेळीं बालकवि, सांसारिक त्रासांमुळें व शरीराच्या आजारामुळें आपणांकडून फार दिवसांत कविता झाली नाहीं व लवकर होईल कीं नाहीं याची शंका आहे अशा उद्विग्नतेंत

होते. ही कविता होतांच 'बाबू, आज माझ्याकडून एक चांगली कविता झाली बुवा!' असे बालकवि उद्गारले. अर्ध्यामुर्ध्या कविता होण्याचा बालकवींचा हाच काळ ( सन १९१६) होता.

ए. या.

---

## मेघांचा कापूस

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंबाचा.
त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी
कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी.
इंद्र निळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोतनमाला.
चौंबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा
सृष्टिसतीनें साज घेतला पाउस काळींचा
यशस्विनी सौभाग्य देवता माता जगताची
त्या अंबेची घटस्थापना आज बसायाची
घोर घनघटा भूलिंगाला प्रक्षाळुनि गेल्या

अपूर्ण

## शारदीय सौंदर्यदेवता

प्रभातकाळीं काव्यतारका सोज्ज्वल गगनांत
उदयाचलिं परिधान करुनिया पीतांबर येत.
मुकुट कळयांचा, शिरीं उषेचें सिंहासन केलें
हालवीत कचमार सृष्टिचें हस्थापन बोले.
प्रसन्न पवनें जलद आल तें अपसारुनि नेलें

[library stamp] २३३

तारामंडळ विश्वविभव हें आकाशीं ठेलें.
कणा-कणांनीं शुद्ध चेतना भरुनी अवकाश
सर्व धुवुनि हा निवळ साजिरा रंग भरे त्यास.
पिकलीं शेतें मंद वायुनें आंदोलन घेतीं
सौंदर्याच्या मूर्त देवता वनमाला होती.
निर्झरिणी या मुक्तमण्यांचें घेउनि भांडार
विमल सैकतामधुन हालतां चमचमती फार.
हा कुरणांचा थाट दाटला वर्णावा कोणी ?
शारदीय सौंदर्यदेवता अवतरली भुवनीं.
आर्यभूमिच्या दिव्य पुरातन या देवी दोन
शरद्देवता उषादेवता झाल्या अवतीर्ण.
भूवरचा संसार दाविते सुफलित ही बाला
तसा स्वर्ग--संसार आमुचा दिव्य तिनें केला.
एक गातसे मानवतेचें मधुमंगल गाणें
देवपणाचें दिव्य-मंत्र परि धरिले दुसरीनें.

---

## काव्यदेवतेस

जगन्मंगले काव्यदेवते जडातीत मूर्ते,
सदानंदरूपिणी स्वामिनी उदो उदो तूतें
गीतदेवता तूंच तूंच गे शब्ददेवताहि
ज्ञान-चित्कला तूंच ईशही तुजवांचुन नाहीं.
अनंत छाया दाखवूनिया निद्रित भूगोला
अनाद्यंततें प्रकटविशी निजभूति दिव्य त्याला.
पुरोवर्तिनी दिव्य दीपके तुझ्याच मागून
दिङ्मूढा मानवता येई पार तमांतून.

भूतकालच्या कवीश्वरांच्या हृदयीं अवतरुनी
प्रज्वलिली चैतन्य ज्योति तूं या मानवभुवनीं.
विविध-रूपिणी जगन्मोहिनी सुंदरते येई
विश्वकोष नवनव्या प्रीतिचे रुचिर गंध देई !
भुलून त्याला परम मंगला कमला त्यावरती
अवतरली श्रीदेविच कविता आज तिला म्हणती.

रात्रकीट हा तिडतिडताहे दीपसंन्निधानीं
ऋषीश्वरांच्या पंक्ति बैसल्या यज्ञधूम्रगगनीं
पावित्र्य भरी मंगल जेथें शुभवातावरणीं,
... ... ... ..१
सुर किन्नर गंधर्व देवता येऊन भूवरतीं
पुण्य स्पर्शें आशिर्वादित वस्तुजात करिती
गोड दुधानें गायि दाटल्या हंबरती मागें
शेत पिकूनी पीक नाचरें वाऱ्यावर रांगे.
फुला फुलानें रान दाटलें ओढे त्यांमधुनी
... ... ... ...२
धांवति घेउनी पाट जलांचे हिरव्या राईंत
मंजुळ गाणीं गात पांखरें वरती उडतात
फुलपांखरें हिरव्या कुरणांमधें बागडतात
... ... ... ..३
सान थोर हो प्रसन्न सगळे विश्व दिसें झालें

अपूर्ण.

---

१ एथलें चरण मुळांत नाहींच. अशीं स्थळें कवीच्या अनेक अपूर्ण कवितांत आहेत. ए. या. २–३ (१प्रमाणें.)

## ताराराणी

या शुभ्र विरळ अभ्रांचें । शशिभंवतीं नर्तन चाले
गंभीर धवळली रजनी । बेभान पवनही डोले
तंद्रींतच अर्धी मुर्धी । लुकलुकते ताराराणी
ये मंजु मंजु तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी
निस्पंद मंद घटिका ती । अंधुकता धुंद भरीत
ब्रह्मांड मंदिरीं गाई । सौभाग्य सुभग संगीत.

निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खालीं
वर मूक मोहनें जैसीं । शशिकिरणें विरघळलेलीं
इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हां पवनास
निश्चित शांति–देवीचा । किंचितसा चळुनी हाले
रोमांच कपोलीं भरती । कुंजांत कोकिला बोले.

घननील लतावलयांत । हिमधवल शिलातलभागीं
चमकून मोहिनी झाली । जणु कुंजकूजनें जागी
सौंदर्य-भरीं भरलेलें । तारुण्य चढे रंगास
अलवार कोंवळें अंग । जशि काय फुलांची मूस
धरि आम्र मंजिरी कानीं । हातांत जुईची वेणी
कंठांत मालतीमाला । माधवीच भासे बाला ।

मदनाची मंगलमाया ।नटनाट करी हृदयांत ।
स्फुरतात कल्पनातीत । रणकार सुखाचें त्यांत
किति होत नाच नयनांचा । किति रंग मुखावर आले

ते चित्र चोर चित्ताला । कितिदां तरि चुकवुनि गेले
उत्कंठा धीर धरीना । लागला दुखाया ऊर
तारुण्य तरल बालेच्या । चित्तांत भरे हुरहूर

पायांत रुप्याचा तोडा । ये थबकत थोडा थोडा
युवराज विजयसिंहाचा । झाडींतुनि पिवळा घोडा
शिरपेंच शिरावर साजे । पाठीवर लटके ढाल
रूदार झगा जरतार । अंगावर हिरवी शाल ।
उतरून विलासी वीर । चुंबुनि ती मोहनमाला
जणुं रम्य हृदय रमणीचें । हलुवार धरी हृदयाला
उतरून वारुवरतून । सरदार शिपाई आला
हलुवार हृदयिं रमणीच्या । हृदयाशीं संगत झाला.

अपूर्ण

---

## मूढ मालती !

प्रेमतंूच्या मरुद्गणांची पहिली लहरी आली
हृदयीं शिरली मुग्ध मालती ईषत्कंपित झाली.
तेंच रूप तें दृष्टि तीच ती माधवही तो पहिला.
आज निराळा परंतु गमला ह्या वेड्या हृदयाला.
वेडे वेडे विलक्षणचिया आज भावना काय ?
पुसूं कुणाला ? जिकडे तिकडे भरले माधवराय.
मंद वायुनो शपथ तुह्मांला गुणगुणतां तें काय ?
मूढ मालती ! नाहीं नाहीं बोलत माधवराय ।
हृदय गडे धडधडे ! कशाच्या लहरी येती अंगीं ?
जागी कां मी काय बोलत्यें बसलें कोण्या जागीं ?
अमृतमयी स्वर्धरा त्यांतचि शशांक पोहत आहे

निश्वासांची उष्ण झरी कां मद्हृदयांतुन वाहे.
पलिकडचें हें मेघाडंबर धांवत येइल बाई
दिव्य चंद्रिके विचार असले नकोत भलते कांहीं.
स्वर्गस्वर्गा तेजोमय तूं वसुधा दीन बिचारी
मूढ मालती तशी माधवा तुजसाठीं झुरणारी.
आर्द्र करावें विश्वाश्रूंनीं दूणविल्या श्वसितांहीं
स्त्रीहृदया ! तुज मार्गच दुसरा जगीं नसे बा कांहीं.
जर वातांना भाव मनींचें प्रगट कराया येते
तेच सांगते त्या बालेचें हृदय कसें होतें तें.
निश्वसितें तीं तीं प्रेमार्वी मुकीं कोंवळीं गीतें
फुलें अहा तीं प्रेमतरूंचीं लाजवितीं स्वर्गातें.
गर्द वनांतिल मुक्या झरी परि तिची प्रेममय वृत्ती
स्वर्गगेला लाजविणारी दिसती अवकाशीं ती
प्रेमकल्पनामय प्रेमांचा सेतू अद्भुत कांहीं
दिसला असतां जो कोणीही कधीं पाहिला नाहीं.
कुमारिकेच्या मूक मनाच्या स्निग्ध सांवळ्या छाया
दिसल्या असत्या जरी काय ते विचार अबलेचे या.

अपूर्ण

---

१ ही कविता एखाद्या खंड काव्याच्या तयारींतली दिसते.

ए. या.

---

## औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.

चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.
पायवाट पांढरी तयांतुन अडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे
झाकळुनी जळ गोड कालिमा पसरी लाटावर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.[1]

---

१ ही कविता एकाद्या खंड काव्याच्या तयारींतली दिसते.

ए. या.

---

## सृष्टि

सृष्टि मला हांसविते । स्वर्गसौख्य दाखविते
शांतीनें पालविते । आनंदें डोलविते
मन माझें टाकि गडे नित्य गुंगुनी ॥ १ ॥

अपूर्ण

---

## तडाग असतों तर

विमळ चंद्रिका क्षितिजावरती
तुरळ तारका चमचम करिती
दिव्य लोकिंची रुचिरा शांती
तुडुंब भरली गगनांत;
ग्रहाग्रहावर भरलें तेज
तेजाची लयलूटच आज
रात्रींचा शेवटला साज
देव करिति जणुं स्वर्गांत.
तेज दाटलें शांति दाटली

सौंदर्याची वेलहि फुटली
प्रेमाच्या नव पुष्पीं नटली
कविच्या हृदयांत.
मंद तेज अवनीवरते ते
मधु एकांता वाढवितें तें,
त्यांत हि वारा हळूंच हाले
निर्भर रुचिरानंदांत
या समयीं जर तडाग असतों
रम्य दिव्य तें रेखित बसतों
हीच शांतता अशीच धरितों
शुभ्र जलाच्या हृदयांत.

---



# प्रेमविषयक

## गाण्याची चढली कमान—

गाण्याची चढली कमान नयनीं स्वर्मार्ग झाला खुला
व्योमीं तारकमालिकासह कवी प्रेमें हसूं लागला.
त्याला हास्य परंतु दिव्य असलें आलें तरी कोठुनी ?
त्याचा उद्गम नाहिं काय तुझिया दिव्यौष्ठगंधांतुनी ?
प्रेमावांचुनि कोणता कवि पिसा गाईल गाणें तरी ?
गाणें प्रेमच तें स्फुरेल तरि कां निष्प्रेम चित्तावरी ?
प्रेमानें रसरंग जो उधळिला त्याच्या तरंगांवर
होवोनी रसवंत लुब्ध हृदयें बेहोप त्यानंतर ?
स्वच्छंदें मग वाहतात जिकडे त्या त्या प्रदेशांतरीं
तारांच्या सुमवाटिका विलसती आकाशगंगेवरी
प्रीतीचा लडिवाळ बाळ चिमणा वक्षस्थळीं वाहिला
तो प्रेमातुर ओष्ठचुंबन सुखा निःशंक नादावला.

अपूर्ण

---

## तेजोवीणेची रागदारी

निजला होता क्षीरसागरीं परेश विश्वंभर
निजलें होतें विश्व धुंदिनें धुंद दिसे अंबर.
जागी होती दिव्य देवता एक मात्र त्याक्षणीं
छेडुं लागली रागदारि मग तेजोवीणेंतुनि.
सकंप रव तो ब्रह्मकपाटीं मंद घुमूं लागला
हळूं हळूं ये नवी चेतना दिव्य विश्वमंगला.
निशांत विरला तमः, प्रसर ती लीन रवीच्या करीं
रविकर होती लीन अंबरीं, अंबर परमेश्वरीं
परेश तोही लीन जाहला या गाण्याभीतरीं

तो गाण्याचा सूर सांठला वसुधेच्या अंतरीं
आला आला आला गडि हो जगासंगतीं कवि
आला आला देव, तयाही आदिशक्ति जागवी
करूं चला जयघोष तियेचा पहिला मानच तिला
उदो उदो सौंदर्यदेवते, विश्वगोल बोलला.

---

## मुकांत चंद्रानना पातली—

" गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? "
ती वनमाला म्हणे " नृपाळा, हें तर माझें घर
पाहत बसते मी तर एथें जललहरी सुंदर.
हरिणी माझी तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा.
घेउन हातीं गोड तिला त्या कुरणावरती फिरे—
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे. "
" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.
तव अधरांवर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी !
क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळे उडे.
अर्धस्मित तव मंद मोहनें, पसरे गालावरी,
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं. "

× × ×

अर्धें मुर्धें चित्र चित्रिते चपला जें कांहीं ?
तें ऐकावें गीत पहावी चित्रकला तसली.[1]

---

१ प्रसिद्ध चित्रकार कै. माळी ऊर्फ मुल्लर यांच्या एका अर्ध्यांच तयार झालेल्या चित्राकडे पाहून बालकवींनीं ही कविता केली आहे. ए. या. नि.

## प्रेम--लेख

मेघाचें कारिं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गीचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही;
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी;
श्यामा निर्झरिणी पुनःपुनरपी सारीत नीलाचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाकुला;
वेलींचे स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदमंदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहींतरी आपुले.
हे सारे मधुलेख घेउनि जगीं नाचोत वेडे कवि,
गावो गीतशतें तयांस, मजही त्यांची कळे थोरवी.
लज्जामुग्ध परी शिरःकमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावलि.
सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच, उभा मी मग्न पारायणीं !

---

## आनंदी—आनंद

[ १ ]

आनंदी आनंद गडे !
इकडे तिकडे चोहिंकडे

वरती खालीं मोद भरे,
वायूसंगें मोद-भरे;
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[२]

सूर्यकिरण सोनेरी हें,
कौमुदि ही हंसते आहे,
खुलली संध्याप्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें,
गान स्फुरलें,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[३]

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हे पाहतसे;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?
तयामधें तो
सदैव वसतो,

सुखें विहरतो,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ४ ]

वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ५ ]

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो
सोडुनी स्वार्था तो जातो
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

## भारद्वाजास

भारद्वाजा विहगा माझ्या, धन्य जगीं तूं मज गमसी,
फुलल्या बागा या तरुरांगा त्यावरतीं भरभर फिरसी.
सुंदर झाडी पाणद मोठी शीतल छाया तींत पडे;
वाढुनि वेली फुगडी झाली त्यांतुनि ओढा वाहतसे.
भारद्वाजा विहगा माझ्या, तूं वनराजा खरोखरी,
हिरवा मांडव सृष्टिदेवता तुजसाठीं हा राय करी.
हीं वेलींचीं सुंदर सदनें रत्नमण्यांनीं भूषविलीं,
सौभाग्येंही वनदेवींनीं तुझिया चरणीं अर्पियलीं.
प्रीतीचा तो सूर सुखाचा जग दुःखीं हो दुःखमय—

अपूर्ण

---

## निःश्वास

### १

चाल- भूपती खरें तें-

पांखरा, गाइलें तुला कधींहि न कोणी
न च अश्रु गाळिले कुणीं वनीं येवोनी ॥ ध्रु० ॥
निःश्वास धांवती सौख्यामागें सारे
दुःखाचा वाली कुणा कुणी हि न बारे !
मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनांदोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिला मैना गातिल गाणीं,
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं.

त्या मधुर मुखीचें अश्रुमाळ चुंबीत
झुलतील फूल-पांखरें निजानंदांत.
रविवदनावरचा रंग भराभर बदले,
मम गान, सर्व सौंदर्य, सर्व हे थिजलें !
या मत्त कोकिळा सोडुनि आम्र जातील
कोंवळया कळया मोडोनि मान पडतील;
लवदार मनोहर वेलबुटी नवलाची
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची
रवि वरतीं वरतीं चढत चढ
अंगार भरिल या मंद शीत पवनांत;
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील तसेंच्या तैसें
ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जशि काय उभी सौंदर्यदेवता होती;
परिधान करी ती पीतांबर कटिभागीं
शिरिं मुकुट कळयांचा त्रिलोकसुखदा मूर्ति.
हळुंवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
गाईल सर्व निद्रिस्त विश्व डुलवोनी.
सारून जरा कचभार बालिका पाहे,
एकेक तारका समाधिचें सुख लाहे.
निद्रिस्त भूमिला स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.

स्मरतां हि जया हो रोमांचाची भरती
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती.
परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी,
निष्प्रेम मनाला कोठें हि सुख नाहीं.
चुंबीत गुलाबी गाल मधुर संध्येचा
कर वरती आला सुंदर रविरायाचा,
जग समाधिस्त जणु सर्व सर्व हें होतें,
परि शांतिलेशही नव्हता ठाऊक तूतें !
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत
तव हूं हूं हूं चें होतें गीत वहात !
येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून भरारा गोफण तो झाडील
कांट्यांवर उपडें भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
गाऊन तुझें हें जळतें हृदय निवेल[1] !

---

१ हाय ! हाय ! शेवटीं हेंच खरें झालें ना ?-ए. या.

## निःश्वास

### २

हे सौंदर्यध्वंसी काला । भीति दाविसी काय? कुणाला?
विद्युत्पातासह कडकडुनी । कडे कडे जा टाक फोडुनी
गर्वराशि हा गभीर भूधर । ने पाताळीं तुला हवा तर
क्षुब्धाब्धीच्या लाटांमधुनी। धांव जिभाळ्या चाटित गगनीं

गर्भभरित ती तारा-बाला । वळी तुझ्या घे हत जठराला
परी प्रीतिचा न्यारा वारा। खबरदार आडवितां याला !

* * *

नाजुक मी ललना फुलवेल । प्रेमहि माझें काय ? मलूल.
अशा विचारीं मूढा हृदया । क्षणक्षणां धडधडसी वायां
प्रेमरक्षणीं दक्ष देवता । अव्यक्त जगीं करिती सत्ता
प्रलय वज्र कीं कृतान्त तोही । सामर्थ्यें अवगणिला त्यांहीं
पडल्या स्त्रीहृदयाचा तोल । त्याच देवता सांवरतील
भीति कशाची आणि कुणाला । पहा जगा, ललनेची लीला!

× × ×

चला सरा सुमनांनो दूर । दे हातीं प्रेमा, समशेर
उग्र रूपिणी शिवा भवानी । प्रीतिदेवते, उतरे भुवनीं
क्षुद्र मूषका काळा मूढा । पसर तुझ्या त्या कराल दाढा !

अपूर्ण

---

## निःश्वास

### ३

देहचिंतनीं जीव जाळुनी हा कुठवर घ्यावा
घाल मोहिनी तूं फुंकूनी गोड गडे पावा !
तव अधरींचें प्रेम-लाडके, कवीश नमि यातें
तव हृदयींचें श्वसन- अहा त्या प्रेरितसे गीतें
तव हृदयींची सुखद उष्णता प्रेम भरी हृदयीं
नवल न मग यद्गीत ऐकतां मन मोहुनि जाई.

---

## भटकणं !

सर्व जगानें मला टाकिलें म्हणून धरिलें तुला
तुझ्याच भजनीं तुझ्याच चरणीं जीवभाव वाहिला.
तुझ्याजवळ मी कशी प्रेमदेवते, प्रेमयाचना करूं ?
हा गवताहुनि दीन दास तव, दूर नको परि धरूं.
थोर थोर नर नित्य वांछिती तुझें कृपाविक्षण,
तव चरणाच्या धूळिं लोभलें दुबळें माझें मन !
तव हाताचा गोड जाहला स्पर्श मला जेधवां
तुझिया भजनीं मात्र वाहिलें तेंव्हांपासुनि जिवा.
गेला भडकुन राही जाउन वनस्मशानीं जरी
या गगनाची शपथ लोचनीं तुझीच मूर्ती परी.
निराश झालों बघुनि सभोंतीं पर्वतमाला जरी
रडत बैसलों बाळपणींही तुझ्याच नांवें तरी.
परदेशामधिं दिवस कंठिले, सौख्य सर्व टाकिलें;
आशा कीं मज दिसतिल कोठें रम्य तुझीं पाउलें.
मैदानावरि खुळया पिशापरि भटकत फिरलों किती ?
किती लोटली रात्र तयाची नाहीं हृदया क्षिति !
किति हृदयाची तीव्र वेदना तुजसाठीं सोशितों ?
परि अजुनी तूं दूर किती वद पथ दुःखद वाटतो.

---

## प्रेमाचा पहिला भास

जरि धूप जळत अनलांत । वाऱ्यावर भरतो वास
जरि देह शिजे दुःखांत । परि सुटका आज मनास

मन्मानसराजसहंसी । अवतरली स्त्रीरूपानें
सौंदर्य हृदंगम ज्योती । पाजळते दिव्यत्वानें
जा प्रेमदेवते जा जा । बंदिस्थ तुझ्या दासानें—
तव पुण्य दर्शनें केलें । निमिषांत जिवाचें सोनें
देहाचा दास मरून । प्रेमाचा उरला जीव
प्रेमांतच झाला सारा । विश्वाचा अंतर-भाव
तारुण्यमदाचा श्वास । प्रेमाचा पहिला भास
मुग्धेचें मोहन तेंही । याहूनि मनोहर नाहीं
नवरागरक्तिमा रांगें । रविरंजित रजनीवरती

---



# विषणतेविषयीं

## खेड्यांतिल रात्र

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती
ओसाड देवळापुढती
वडाचा पार—अंधार दाटला तेथ भरे भरपूर
ओढ्यांत भालु ओरडती
वाऱ्यांत भुतें बडबडतीं
डोहांत सावल्या पडती
काळ्या शार—त्या गर्द जाळिमधिं रात देत हुंकार
भर रानीं काकस्थानीं
उठतात उत्राळ भडकोनी
अस्मान मिळालें धरणीं
आर ना पार–अवकाळ रात्रिचा प्रहर घुमे तो घोर

## दुबळी भूल

[ लावणी ]

जळ काळें काळें हंसे, भयानक दिसे, सहज बघशील ।
तर दिसेल तुजला तुझीच दुबळी भूल ॥ ध्रु० ॥
यक्षिणी, देवता कुणी, कपारींतुनी,
घोर घुमतील,

××××एथली ओळ कवीनें लिहिलेली आढळत नाहीं. ही कविता कोठें प्रसिद्ध होऊन हे सुटलेलें चरण तींत आलें असेल तर त्याविषयीं जरूर परीक्षा केली पाहिजे. ए. या. नि.

हे काय बोलते बोल, भाबडी भूक,
नको म्हणुं कांहीं,
बघ हिरवा मांडव मजवर होईल बाई ॥ १ ॥
दुरदूर माय चालली, बाळ परतलि
भरे हुरहूर,
तिच उदासवाणें—दिसतें सगळें दूर ॥ २ ॥
भावांनिं घेतलें पुढें, नको रडुं गडे,
घालुं बे चुडे,
तुझ्या हातांत;
तुज भावजतोभा, आज करूं दहिभात ॥ ३ ॥
लोभाचा भरला पूर, विखारी घोर,
भरे महापूर,
लोपली माया,
ते विखार पिंवळे लागति त्यास दिसाया ॥ ४ ॥
दारांत बहिण भेटली, भीति वाटली,
चरकला भारी,
परि पुन्हां धनाची आली लहर विखारी ॥ ५ ॥
ऐकून माय बावरे, निघाली त्वरें,
आडवी येई,
वेल्हाळ लाडकी चिमणी सोनाबाई ॥ ६ ॥
तुज रानांनिं वाहिलें, काळ सोनुले,
राजबागांत,

जा, भिऊ नको, मी तुला जोडिते हातें[२] ॥ ७ ॥

१ या कवितेचा अर्थ विशेषसा स्पष्ट होत नाहीं. इच्या उगमस्थानीं कोणता तरी पूर्व वृत्तांत असला पाहिजे. कोणता आहे हें अजून कोणास माहित नाहीं. तथापि ही कविता नगर मुक्कामीं कवीनें केली असेल तर, आपली मुलगी दुष्काळ समयीं विकणाऱ्या बापाकडे, व विकण्यापेक्षां पोरगी रानांत गेलेली चांगली असें सांगणाऱ्या आईकडे, पाहून ही कविता झाली असावी. ए. या. नि.

## थडग्यांतील रमणी

होतें एक असें जुनाट थडगें, झाडें तया भोंवतीं—
काव्यांचीं किती वाळुनी विषम तो भूभाग आच्छादितीं.
सर्वांच्याहि वरी उठे वट परी तो, तों करी त्यावरी—
काळी गर्द भयाण, भीषणपणा स्थानावरी त्या करी.
वाहे एक झरा असा जवळुनी, ती पैल झाडी असे,
सौंदर्यैकनिधाननिश्चलपणा तीमाजिं सौख्यें वसे.
प्रेमें पाहत त्याकडे बसुनि मी निश्चिंत[१] त्या आसनीं

१ हा शब्द, नव्हे कोणताच शब्द मूळांत नाहीं. अशा कैक ठिकाणीं मी माझे शब्द घातले आहेत. कांहीं ठिकाणीं बाबूराव व कांहीं ठिकाणीं अमृतरावांनीं सुचविले आहेत. ही निवड बालकवीच्या मनोरचनेकडे पाहून तिघांमिळून केलेली आहे. असाच प्रकार कांहीं चरणार्धांचाहि झाला आहे. ही सांगड रसहानि टाळण्याकरतांच घातली आहे. तथापि टीकाकारांना यामुळें चांगलीच जागा मिळणार आहे, व आम्हांलाहि मूळ दाखवून त्यांची गंमत करतां येईल. ए. या. नि.

या ऐशा थडग्यावरी बसुनि त्या ओढ्याकडे पाहुनी—
मी एथें किति काळही दवडिला नाना विचारांतरीं.
होती निर्भर पौर्णिमा—विमल तो शीतांशु विश्वावरी-
प्रेमाची अपुल्या अनंत विमलच्छाया सुखाची करीं

× × × × ×[1]

ग्रीष्माच्या दिवसांत ती कितीतरी मातें सुखाची गमे;
मी ऐसा बसलों पहात, मनही माझें तयानें रमे.
गेला काळ असा किती मज नसे त्याची मुळी कल्पना,
एकाकी परि वाटलें हदरली ही भूमि ऐसें मना.
मी पाहे वळुनी, अहो नवल कीं, हो भूमिचें कंपन
तेणें तें थडगें दुभंगुनि पहा कोणी तरि त्यांतुन-
येई, ती रमणी विशुद्ध तरुणी सौंदर्यरंगांगिणी
ती राणी गुणशालिनी विजयिनी हो भूतकालीं कुणी.

---

१ एथलें चरण मूळांत नाहीं. परंतु त्यामुळें अर्थाची हानि, कल्पनेची अपूर्णता व काव्याचा ओघ मुळींच थांवत नाहीं. ‘ आपणांला इंग्रजी कवींच्या धर्तीवर कविता करतां येणार नाहीं, निदान तुला तरी येणार नाहीं; ’ असें गोविंदाग्रज एकदां बालकवीला ह्मणाले. त्यानंतर दोनचार दिवसांतच ही कविता झालेली आहे. एक कल्पना एका ओळींतून दुसऱ्य ओळींत नेऊन दुसरींतच नवी कल्पना घ्यावयाची, ‘ असा ’ शब्दाचा certain सारखा अर्थ करावयाचा, खुद्द काव्य विषय, यावरून चरण गाळण्याची योजना बुद्धिपुरसर झालेलीच दिसते. गोविंदाग्रजांनीं हि असे प्रयत्न केले आहेत.

ए. या. नि.

होतें शुभ्र जरी मुखावर तिच्या आपाद आच्छादन
चंद्राच्या स्फटिकप्रभेंत दिसलें तद्रूपही त्यांतुन.
ती देवी यवनी असूनिहि पहा माझ्या मनाला किती
तद्गांभीर्य बघूनि जी उमटली श्रद्धा, न तीची मिति.
प्रेमें जोडुनि अंजली चकित मी पाहोनि तीचें स्मित
हे अर्धस्फुट बोल कंपित रवें मी बोललों विस्मित–
'भूमीच्या उदरीं अहा किति तरी रत्नें निमालीं, परी
त्यांतोनी न पुन्हां कुणीहि उठुनी आलें असें भूवरी.
या ऐशा थडग्यामधूनि अपुली दिव्यप्रभा घेउनी
हे देवी विजयस्विनी, फिरुनिया आलीस तूं कां जनीं ?
नाना कीट वनस्पतींत हि तुझें हें रूप ऐशापरी
राहे केविं विशुद्ध हें नवल कीं वाटे मदीयांतरीं.
हा दृष्टिभ्रम काय ? रूप अपुलें जें हें तुवा दाविलें
तें नाहीं हविलें विशुद्ध उरलें कालप्रवाहानलें

अपूर्ण

---

## उदासीनता

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला ?
काय बोंचतें तें समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला ?
एथें नाहीं तेथें नाहीं,
काय पाहिजे मिळवायाला ?
कुणीकडे हा झुकतो वारा ?

हांका मारी जीव कुणाला ?
मुक्या मनाचे मुके बोल हे;
घरें पाडिती पण हृदयाला!
तीव्र वेदना करिती; परि ती
दिव्य औषधी कसली त्याला ?

---

## रजनीस आव्हान

( वाजवि रे बाळा, )

ये ये ये आई, ये बाई, रजनिमुखीं लवलाही
मजला पाहूं दे, स्वानंदें, कृष्ण तमीं नभ कोंदे
वाहूं दे वारें, त्यांतून, दिव्य शांति घेऊन
दुर्धर कर्कश गे, या बसली, कर्ण संपुटीं टाळी
एकहि धड नाद, येईना, ऐकाया श्रवणांना
नसता कल्लोल, जिवाचा, अवघा स्वार्थचराचा
घालवुनी आतां, ये येथें, शांति स्थापित हातें.
हृदयाचे बोल, बहुमोल, खोल मनांतिल खोल.
ऐकूं दे वाणी, हृदयाची, माझी मज गे सजणीं !
माझ्या हृदयींचा, निःश्वास, साचवुं दे विश्वास.
माझ्या हृदयाचे, नाचच ते, परिसूं दे श्रवणांतें.
माझ्या नयनांच्या, किरणांनीं, मद्हृदया पाजवुनी,
लावुनि निज हातीं, दे दे ती, स्वयंप्रकाशप्रीति.
दिवसांचें तेज, तेज तया, लाजे चित्त म्हणाया
दिवसाचा घोर, अंधार, बसवी झांपड पार !
दिपवी नयनांना, दाखवुनी, अनंत दुःखें नयनीं,

संशय काहूर, करि हृदयीं, स्वास्थ्य क्षणभर नाहीं
आत्मा होउनिया, निभ्रांत, मूर्छित होय मनांत
वारें उष्ण फिरे, वणव्यांत, दग्ध मना जाळीत !
तेलच मग ओती, त्यावरतीं, रविप्रभा निज हातीं.
जळफळतें सारें, धगधगुनी, अशांतिच्या वणव्यांनीं
ये ये ये देवी, दे हृदयीं, प्रेमा विकसन बाई !
अनंत दिव्य कर्णीं, पसरोनी, अनंतत्व दे गगनीं.
फुंकारे आधी, दूर करीं, रविप्रभा ही सारी.
मग ला ला गाणीं, गावोनी, बाह्य जगा निजवोनीं,
कर अंधाराचा, पाऊस, पाडुनि शांत जगास.
ते सगळे नाद, निःपात, बुडवुनि सस तळांत !
राज्य करीं जगतीं, घेउन ती, शांतिपताका हातीं.
आतुर गे डोळे, बघण्याला, रूप तुझें अवलीळा
व्योमीं लाल फुटे, तोंच करी, हाकाटी तुझसाठीं.
तुजविण कोण बरें, वारील, बाह्य जडाचा खेळ ?
तुजवांचुन कोण, पेटविल, हृदयीं प्रेमविलोल ?
या बाहुल्यातें, तुझ्याविणें, चित्तहि उल्हासानें ?
मांसखंड[१] लाल, पाहोनी, रक्तपताका गगनीं—
फोडी हंबरडा, ही अवनी, दुःखित गायमुखांनीं
जागा मी झालों, आईच्या, त्या प्रेमळ रजनीच्यां

अपूर्ण

---

१ हा शब्द बालकवीचा नाहीं.

२ ही कविता अपूर्ण असली तरी बरीच मोठी आहे. तथापि केशसुतांच्या " दिवस आणि रात्र " या [ पुढें चालू

अवघ्या १६ ओळींचा आवेश या कवितेंत नाहीं. गटेची अशीच एक कविता आहे. तद्विषयक एक लेख "उद्यान" मासिकांत ( १९१८ ) पहावा. ए. या. नि

---

# भरलें घर ओकें ओकें

## ( उद्धवा शांतवन कर जा )

भरलें घर ओकें ओकें । मज न कळें दिसतें कैसें ?
मज भंवते जमले सगळे । स्वप्नीं परि बघतों जैसे
ही दूध पाजिते ताई । परि वाटे घोटुं नयेसें
स्फुंदूनि माय रडताहे
समजावित भाऊ आहे
ती रमा भयाकुल पाहे
वैकल्य भरी हृदयातें । पाहूच नये परि गमतें ॥ १ ॥
संवेदन-शक्ती मेली । उघडे हि नयन मिटतात
बघण्याचे ही श्रम गमती । येई न विचार मनांत
वरचे वर येतां ग्लानी । जणुं जीव बुडे गहनांत
परि नलगे औषधपाणी
मजसाठिं नका रडुं कोणी
सुख भोगा अपुल्या स्थानीं
द्या आशिर्वाद मुलांतें । झोपेन सुखें मग एथें ॥ २ ॥
अस्फुट वच वदुनी ऐसे । झांकुनि घे थिजले डोळे
देहावर जडता पसरे । परि नुसतां हातच हाले
नयनांवर साचे पाणी । श्वासाची धमनी चाले

मायेच्या हलकल्लोळीं
भंवतालीं गरदी केली
परि त्यजुनि पिंजरा खालीं
दुखवूनि उडाला जीवा । मायेचा हिरवा रावा[1] ॥ ३ ॥

---

## आशा

गेले सुंदर इंद्रचाप विरुनी, ते मेघ ही फांकुनी
गेला गंध उडून वायुवरती, निर्माल्य झालें फुल,
गेले गोड विचार ही उडुनिया रम्याकृती घेऊन
गेलीं भारुनि गोड मोहन अहा तीं रम्य नेत्रोत्पलें ॥१॥
गेली प्रीति दिसे स्मशान हृदयीं माझ्या तरी केवढें
जें जें सुंदर भव्य तें सकलही सोडून गेलें मला
त्यांची भेट फिरून कां कधिं तरी होईल जीवा तुला ?
कां येथें तर थांबतोस असल्या या दुःखभूमीवर ॥२॥
जा, गेलें उडुनी तयासह सुखें वास्तव्य तूंही कर
विश्वाचें पण चक्र अक्षय फिरे या माजि कांहीं तरी
माझी येउनि भेट देइल मला, हा जीव आशा करी
ती आशा मग सृष्टिबंधनीं पुन्हां जीवास घे गोंवुनी ॥३॥

अपूर्ण

---

१ पुण्यास शेजारीं राहणारा लक्ष्मणदास नांवाचा एक तरुण पंजाबी मित्र क्षयानें वारल्यानंतर ही कविता त्याच दिवशीं झाली आहे. बाबूराव ठोंबरे.

## शून्य मनाचा घुमट

शून्य मनाच्या घुमटांत
कसलें तरि घुमतें गीत;
अर्थ कळेना कसला ही
विश्रांती परि त्या नाहीं;
वारा वाही,
निर्झर गाई,
मर्मर होई,
परि त्याचें भीषण भूत
घोंवावत फिरलें येथ.
दिव्यरूपिणी सृष्टि जरी
भीषण रूपा एथ धरी;
जग सगळें भीषण होतें
नांदाया मग ये येथें;
न कळे असला,
घुमट बनविला,
कुणी कशाला ?

अपूर्ण

2333

---

## तापल्या जिवाला कोण देइना ताप ?

मम विशीर्ण गीता, पाठवुं तुज जगतांत ?
कां ठेवु आपुल्या सांठवुनीच मनांत ?
ती जीवकळा नच सुंदर तुजवर कांहीं,
तुज चित्ताकर्षक गंधहि उरला नाहीं.

जो लाजवील कीं ललनेच्या हृदयाला,
तो रंग नसे तव दर्वी लिहिला बाळा !
तव भग्न देहिं मधुबिंदूही नच राही
करिशील काय तरि राहुन जगतीं पाहीं.
ही तीव्र झळा त्या उन्हावरुनिया आली
परि करूं नको ती मान लाडक्या, खालीं.
जणुं जाळ तापल्या दगडांतुनि निघतात,
जळलेंस, परी नच पुरें जळालें त्यांत.
तापल्या जिवाला कोण देइना ताप ?
संतप्त नरावर कोण करि न संताप ?
वेड्याच्या मागें होउनि वेडें लागे;
तूं दुःखी जन, तव दुःखचि राहिल मागें.

अपूर्ण

---

## काळास

चाल– संक्रान्त रम्य पातली—

अंधकार मातला वेष्टितसे भूतला,
शून्य मना खिन्नपणें सुखदायक जाहला.
झोंप न ये लोचनीं शांतता न मन्मनीं,
दाहकता घोर भरे परि अंतरशोषिणी !
हा मारुत वाहतो नेइल मज काय तो,
काळ जिथं विगतचिंत विस्मरणीं नांदतो ?
तेजोमय चमकती दिव्य गोल हे किती ?
त्यावरती असतिल किति देवलोक संप्रती ?

सजलाग्रीं बघुनियां येइल कां तयां दया?
अमृतसेक करितिल शिरिं शांति मला द्यावया?
सप्तलोक वेष्टुनी स्थिर बसली यामिनी,
देइल मज आणुनि ती शांतपणा कोठुनी?
लपवूं दिग्वदनीं मुख होईल तरि मजला सुख,
ये काळा, ध्यान तुझें मात्र मला लागलें!
मित्रपणा भेसुर हा काळकूट प्रेम महा!
मारिल मज म्हणुनि तुला बाहतसे बाळ हा!
विस्मृतिमधिं बुडवि जीव तव हृदयीं हृदय ठेव
तूं आतां आप्त–जगा संबंधच संपला!

---

## नीति व अनीति

नीति अनीती व्यर्थ कल्पना धर्माधर्माच्या[1]
प्रेमावांचुनि कुणी न आंतडिं तोडिल जीवाच्या.
प्रेमधर्म हा धर्म विसरलों भरकलों सैराट
म्हणुनिच पडलों गिळित भूमिवर दुःखाचे घोट!
लोकाचारें जीव जाहला लोकांचा दास;
जरा निराळा वागतांच मज वेडा म्हणतील[2]

---

१ हा शब्द माझा आहे हें, कविता तीव्र मतभेद उत्पन्न करणारी असल्यामुळें, सांगणें जरूर आहे. २ मूळांत कविता अपूर्ण असल्याचें मुळींच लिहिलेलें नाहीं. पण अर्थानें व भावनेनें ती अपूर्णच आहे. ए. या. नि.

## संशय !

१

मृत्यू येइल जेधवां पसरुनी विक्राळ दाढा पुढें,
जेव्हां त्या बघुनी थरारुनि मनीं चैतन्य हें बापुडें,
जेव्हां बुद्धि मरे, धृतीहि विधरे (?) श्रद्धा बिचारी मरे,
जेव्हां झांपड येउनी जनिं मनीं अंधार सारा भरे,
तेव्हां कोण करील सोबत मला हा प्रश्न चित्तांतरीं
मी पाहे पुसुनी पुःनपुनरपी, अंधार सारा परी !
स्वर्गाचीं रमणीय आजवरीं जीं स्वप्नें मनीं पाहिलीं,
प्रेमाचीं बर्वीं हृदंगम अहा गाणीं कितीं गाइलीं !
अज्ञानें परि वाहिलें निजमनीं ज्या ईश्वराला धुनी
साह्या त्या समयास तो तरि अहो येईल कां धावुनी ?
नाना प्रश्न असे उठून करिती जेव्हां मना व्याकुळ ?
त्यातें शांत करील अद्भुत असें आहे कुणा का बळ ? [१]

## निराशा

(अंजनीगीत)

रात्र संपली दिवस हि गेले । अंधपणा घे फिरुनि धरेला
खिन्न निराशा परि हृदयाला—या सोडित नाहीं.
नित्यापरि रविकिरणें देतीं । रंग मनोहर सांध्यमुखीं तीं
खळखळ ओढा गुंगत गीती—राईंतुनि वाहे.
सुंदर सगळें, मोहक सगळें । खिन्नपणा परि मनिचा न गळे,

---

१ या कवितेची नक्की तारिख कळेल तर कवीच्या बऱ्याच गोष्टींवर चांगलाच प्रकाश पडणार आहे. ए. यां. नि.

झुसती हुरहुर होय जिवाला- कां न कळे कांहीं ?
चंद्रबिंब धरि अभिनव कांती। मेघ तयांनीं धवलित होती
परि हृदयीं नैराश्य कालिमा—मम खंडत नाहीं !
भोंवऱ्यांत जणुं पडलों कोठें। स्वप्न भयंकर दिसतें वाटे
जीवित केवळ ऋरुगासंकुल–नैराश्यें होई !

× × × ×

प्रति दुःखामधिं सौख्य सांठलें जें अद्भुत कांहीं.
वर्णायातें शक्ति शारदादेवीसहि नाहीं.
अजरामर मेलास जगाला परी तुला अंत.
झुलत रहा चिरकाल आपुल्या प्रेमानंदांतं

—ला

दुर्धर करुणा तीव्र वेदना मनास माझ्या दंश करी
काळिज फुटतें रक्त गोठतें वीजहि त्याहुनि फार बरी।
जीव येवुनी थिजल्या नयनीं शून्य दिगंतीं खिन्न मनें,
वण वण ववतां, हाय ! अवचिता मूर्ति तुझी······

अपूर्ण

---

## पारवा

भिंत खचली कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्धस्त धर्मशाला;
व

---

१ या चार ओळींच्या अगोदरचीं चरणें कवींनीं रचलींच नाहींत. तिसऱ्या ओळीचा तर अर्थच चमत्कारिक आहे.
ए. या. नि.

तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांत-गीत गातो. १
सूर्य मध्यान्हीं नभीं उभा राहे
घार मंडळ त्या भंवतिं घालिताहे,
पक्षि पानांच्या शांत सावल्यांत
सुखें साखरझोपेंत पेंगतात. २
तुला नाहीं परि हौस उडायाची
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची;
उष्ण झळया बाहेर तापतात,
गीतनिद्रा तव आंत अखंडीत. ३
चित्त किंवा तव कोंवळया विकारें-
दुखत खुपतें कां सांग सांग बा रे!
तुला कांहीं जगतात नको मान?
गोड गावें मग भान हें कुठून? ४
झोंप सौख्यानंदांत मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायाची?
दुःखनिद्रें निद्रिस्त बुद्धराज
करुणगीतें घुमवीत जगीं आज. (?) ५
दुःखनिद्रा ती आज तुला लागे
तुझें जगही निद्रिस्त तुझ्यासंगें.
फिरे माझ्या जगतांत उष्ण वारे,
तुला त्याचें तर भानही न बा रे! ६

अपूर्ण

# संशय

## २

शब्दज्ञान असे कधींच न दिसे ते आत्मयाचें मना
देवाच्या भजनांत सौख्य सगळें लोकांत या बोलतो
जो तो हो, मग दुःखि कां जन तसे अग्नीमधें पोळती ?
याचा शोध करावया भटकतो उद्विग्न चित्तांतरीं.
कांहीं दावुनि भास जात निघुनी माझ्यापुढें ते तरी,
तेथें जावुनियां पुन्हां हि बघतां तेथें हि कांहीं नसे;
आशा चाळवि होय जीव दुबळा दुःखांत ऐसा मरे !

## काल आणि जीवित

गेले भंगुनि दुर्ग, दुर्गगिरिची गेलीं झरोनी शिरें,
गेले देश कितेक राख बनुनी संतप्त कालानलें.
होवोनी थरकांप, पेटुनि मनीं, ज्वालामुखें प्रत्यहीं
जें तें नश्वर ! हाय हाय ! म्हणुनी निःश्वास टाकी मही !
भूमीचा बडिवार काय तरि या, तो विश्वसाक्षी वरी,
कालव्याधशरें प्रतापनिधिही घायाळ हो अंतरीं;
शुक्राच्या शशिच्या कला स्मरुनि हो स्वर्दैवतासुंदरी;
भीतिग्रस्त, खगोलनेत्र करुनी दिङ्मूढ वेड्यापरी !
कालाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्मांडांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,
चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं !

आवो विश्व जळून, जीवित तुझें कालस्थलाबाधित,
प्रीतीनें मज हा धडा शिकविला, हो शांति हस्तंगत !

## हृदयाची गुंतागुंत

हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी
अंधार दाटला अपार भरला पूर
परि पार तयाच्या कोण मला नेणार ?
हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे
मी सोडवितां तें उलटें बांधी फासे
मन विटलें विटली शब्दचिकित्सा सारी
मी फिरतां गरगर बुद्धि तया माझारीं
सौंदर्य फुलांचें गाणीं वनविहगांचीं
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची
शीतलता सुंदर चंचल निर्झरणींची
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाची.
मज रुचे न किमपी व्यापकता गगनाची
तीं अनंततेचीं किरणें ग्रहगोलांचीं
ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची
ही अगाधता कीं सर्वंकष कालाची
हें दिसून सर्वहि मज न दिसेंसें होई
समजूत मनाला कांहीं उमजत नाहीं
हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाहीं

ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें
हें चित्त वदे तें पटे च ना बुद्धीतें
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले
सुखदुःखीं खातें चंचल चित्तहि झोले
दुर्भाग्य दुबळा मनास दिसतें सारें
परि चंचल चळतें चपळहि चित्त कसें रे,
मानवतो कवणां स्वार्थ कुणां परमार्थ
परि अर्थ दिसेना हाय मला उभयांत
वैराग्य बरे कीं सुखद बरा अनुराग
परि हाय प्रीतिचे उगाच माझें सोंग
तें कर्म बरें कीं बरवा कर्म-त्याग
दुर्दैव तसें मज नव्हे, त्याग ना भोग
ती श्रद्धा बरवी अश्रद्धाहि बरी ती
परि मानवते मज मधेंच भलती रीति
व्यामोह भयंकर दुस्तर भरला भारी
कीं जीव दडपतो मम निद्रेमाझारीं
मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी
तूं तुझाच कर उद्धार बोल हे कळती
परि सहायार्थ या वृत्ति मनीं तळमळती
या, हाक मारितों, उठवा मजला कोणी
या भर निद्रेच्या दुस्तर गहनांतूनी
दिन पक्षमास ऋतु वर्ष भराभर गेले
हें रक्त जसेंच्या तसेंच झांकळलेले-

# विचारात्मक

## कवीचा विचार

दिव्यकल्पनामय पक्षांहीं । दिव्य विचार ये लवलाही
स्वर्गीय तुझ्या आलापानें । या कविहृदयिं मंजुळ गाणें
देवदूत तूं स्वर्लोकींचा । तूंच गूढगूढांची वाचा
परोक्षासही तूं सोपान । तूंच मर्त्य जगताचा प्राण
विश्वात्मक देवाची वाणी । विश्वात्मक दिव्यांची खाणी
विश्वाला तूं येथें तेथें । प्रगटविसी या आज्ञेयातें.

× × × ×

मायाजालीं परि अवघडला । आत्मराज तेजोमय पहिला
एक सुराचें गीत तुझें तें । कळुनि येइना तेणें त्यातें
रम्य उषेच्या पहिल्या किरणीं । कीं रजनीच्या गभीर गानीं
दिव्य दर्शनें मोहुनि जाते । परि न बघे मन तेथें तूंतें
सृष्टीचा मनिं भाव कळेना । तेजोमार्गी चित्त वळेना
म्हणुनि असे हृद्विश्वपणें तें । हांक मारितें अखंड तूंतें.

× × × ×

वत्सल मातेच्या उच्छ्वासी । सात्विक कांतेच्या करपाशीं
लहानग्याच्या कीं मृदुहास्यीं । भूमितलीं या तूं वावरसी?

---

## सौंदर्याचा अभ्यास कर !

गाणें हें रचिलें असे जुळवुनी कोठून कांहींतरी,
वाणी सत्य तुझी असेल भरली द्वेषानलानें जरी;
रम्याकार चमत्कृतिप्रचुर हें ब्रह्मांड नेत्रीं दिसे,
खेळे कांहिंतरी तयांतुनि मनीं गाणें तदा होतसे.
सूर्याचीं किरणें, सुनिर्मल तशा त्या तारका—मालिका,

संध्येचे रमणीय रंग, उदयीं सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्दूर्वादलच्छादिता,
वाहे शांतपथा सुरम्य सरिता कल्लोळ मालायुता;
प्रेमानें अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वीं दिसे;
चित्ताची रमणीयता उतरुनी संगीत होतें तसें.
तें सौंदर्य च आणिलें जुळवुनी कोठून कांहीं तरी,
तूंतें तें न दिसे म्हणून सखया, अभ्यास याचा करी.

---

## दोष व प्रीति

दोष असती जगतांत किती याचें,
नसे मजला सामर्थ्य गणायाचें;
दोष माझा परि हाच मला वाटे,
दोष बघतां सत्प्रेम कसें आटे?
दोष असती जगतांत, असायाचे;
मला त्यांशीं तरि काय करायाचें?
प्रेमगंगेच्या शुद्धसिंचनेंहि
शुद्ध होइ न जो दोष असा नाहीं.
गड्या पूर्णा! मज आस तुझी नाहीं;
सख्या न्यूना! ये मार मिठी देहीं!
प्रीति, माझ्या हृदयांत करी वास!
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास!

---

## प्रीति व कर्तव्य

प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्य–सौदामिनी

डोळ्यांना क्षण तेज दाखवुनिया अस्तंगता हो क्षणीं;
चित्तामाजिं विकारसिंधु खवळे चांचल्य जीवीं भरे
नेत्रांतून उदास तेज जगतीं वेड्यापरी वावरे.
वर्षी हा ग्रहगोल शांत वरती हा चंद्रमा मंगळ
तैसें नील गभीर हें गगनही निश्चिंत उर्वीतल
पाहोनी असला विरोध जगतीं चिद्वृत्ति हो घाबरी.
देवा पाप तरी असेल कुठचें मी खिन्न कां यापरी ?
कोठें जाउं कसें करूं मज विभो, कर्तव्य कैसें कळे ?
आलें तें समजूनही तरि पुन्हां हें चित्त कैसें वळे ?
माझ्यामाजिंच शत्रु घोर बसले माझा कराया वध,
कर्तव्यास बघूं टपून बसुं कीं यांच्यावरी सावध ?
गेला तास निघूनिया दिवसही याच क्रमें जातसे
गेले मासहि वर्षही निघुनिया सार्थक्य कांहीं नसे;
खा, पी, नीज पुन्हां असेंच करितां आनंद नाहीं पुन्हां
चित्तामाजिं सदैव टोचित वसे कर्तव्य ही भावना.
डोकें जाय विचार एक करुनी चित्तीं दुजें तोंच ये;
चित्ताचा पगडा विशेष; बळ तें बुद्धीबळाला न ये.
त्या योगें परि जीव हा निशिदिनी ठेंचाळतो सारखा;
साऱ्या हाय! सुखास होउन बसे मी माझिया पारखा !

# शारदेस

प्रिय कविते अमर तुतें तेजाची तूंच उज्वले, खाणी;
मर्त्य जगीं अमर तुझी विश्वाला स्फूर्ति देतसे वाणी.
रविशशितारकमाला सायंतन मंगले तुझीं माते,
तव अरुण वरुण इंद्रहि, सुरलोकच भूति अर्पितो तूतें

अहगोल ?? रुनि तुवां मंगलता मूर्त आणिली खालीं,
हिमगि ?रि मानवता मुनिवदनीं बोल बोलती झाली.
आले पुण्य ऋषीश्वर अवतरले भरतमंडलावरतीं
स्व ?र्गाहूनि अधिक या भूमीची वाढली तयें महती.
तीं दिव्य अद्रिशिखरें हिममंडित सूर्यमंडलाखालीं
भासवितीं दिव्य उषा अक्षय कीं उतरुनी जनीं आली.
ते शुद्ध पूत निर्झर उज्वलता मूर्त पसरिती पाहीं !
धांवति कड्याकड्यांहुनि मधु गीतें धुंधकारुनी जाई.
पसरे कर्कश कानन भानु किरण ज्या मधीं मुळीं न शिरे
घोर दरी किरि करी मैदान हि थोर त्यापुढें पसरे.
असल्या चमत्कृतीचे पाहुनि नाना विलास नयनांहीं
या क्षुद्र मर्त्य देहीं आसक्ती अल्प राहिली नाहीं.
निर्झरमय काननमय गायनमय दिव्य जाहला देह.
सृष्टीचें हि पुरेना विचाराया स्वैर त्याजसी गेह.
मग गूढ अमूर्ताचीं मधुगीतें गोड गावया लागे
आनंदरूप झाली मानवता, मृत्यु राहिला मागें.
ही सर्व कृपा देवी, तव चरणाचीच शारदे, वाटे;
सान मनें हीं अमुचीं तेथच्या तूंचि लाविलीं वाटें.
रविकिरणीं भासतसें कीं निर्झर तांडवांत नाचतसें
पुष्पांवर हांसतसें रूप तुझें क्षणिक मानवांस दिसें.

---

## कवीचें अंतरंग

सख्या वाचका, गीत कवीचें ऐकुनिया निज कानीं
न वदे, कळलें महाकवीचें अंतःकरण निदानीं.
हृदंजूषीं भाव गुप्त जे भरले, जनसंमर्दीं—

कथील कां कधिं उच्चरवानें कविहृदयाचा दर्दी ?
जा, जाउनिया अब्धिकिनारीं एक शुक्तिका वेचीं !
रंग मनोहर दीप्तिहि अनुपम याविण अन्य न कसची.
अगाध गहनें सागर ठेवी झांकुनिया निज हृदयीं—
खोल खोल त्यांविषयीं कांहीं शब्दहि बोलत नाहीं !

---

## काव्याची कल्पना

वस्तुवस्तुमधिं काव्य विलसतें ।
श्रवणीं नयनीं हृदयीं उतरुनि ।
पूर्ण करी जें जड जीवातें ॥
बाह्य वेष जरि सुंदर धरितें ।
मंजुगीत त्यामधुनि स्फुरतें ॥
दिव्य अहा मग तें अवतरतें ।
मीतूंपण तें क्षणिं विसरवितें ।
लावि अखंड ध्यास जिवातें ॥

---

## कवीची इच्छा

गज्जल

जगाचे बंध कोणाला—जगाला बांधला त्याला
मला जो थांबवी ऐसा—जगीं निर्बंध ये कैसा ?
जगानें देह हा केला—जगाला वाहिलें त्याला
हुणा मारा खुडा तोडा—परी आतां मला सोडा
न कीर्तीला न प्रेमाला—न सौख्याला विलासाला
न विघ्नाला न मृत्यूला—मला ये आडवायाला !

वृथा या वाहणें चिंता—वृथा अश्रू वृथा ममता
वृथा निःश्वासमालाही—मला जी थांबवीना ही
पुरे संबंध प्रेमाचा—नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला—जगीं प्याला सुखी झाला.



# तत्वज्ञानात्मक

# बाळें तीं खेळत होतीं

## थोडासा पूर्ववृत्तांत

एकदां भगवद्गीतेंतील " क्षीणे पुण्ये मर्त्य लोके विशन्ति " या चरणार्धाचा आपणांस कांहीं अनुभव आला आहे काय, असें आम्हीं कवीला विचारलें. त्यावेळीं कवीनें आपले अनुभव सदर कवितेंत सांगितले.—अमृतराव ठोंबरे.

( चाल-राजहंस माझा निजला )

स्वर्गाच्या तेजोगर्भीं । बाळें तीं खेळत होतीं
वत्सलता प्रभुरायाची । जोजवी तया निज हातीं.
झुलवी त्या पाळणियांत । छायामय मधुरजनी ती
संध्येची सुंदर तारा
करि त्यावर विंझणवारा
लडिवाळ परमोदारा—
देवास बहु आवडती । बाळें तीं खेळत होतीं.
बसून सूर्यकिरणांत । सोन्याच्या कारंज्यांनीं
कधिं जलद जाल खुलवावें । स्वर्गीय सुधेनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी । नवरंगीं हार विणोनी
शांतेचा करुनी पावा
अवकाशीं सूर भरावा
नक्षत्रलोक खुलवावा
सौंदर्य उधळित होतीं । बाळें तीं खेळ होतीं.
एकदां सडा संध्येचा । शिंपून महोत्सव केला;
बनविलें बीन बाळांनीं । ओढुनि सूर्यकिरणांला
तें वाद्य वाजवायाला । अनिवार हर्ष हृदयाला

ते सांध्यगिरी बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
गजबजल्या सुरललनांनीं
परिसाया देवहि येती । बाळें तीं खेळत होतीं.
वाद्याचे ये झंकार । एकेक जसे उद्गाला
एकेक सृष्टिचें फूल । लागे मग उमलायाला
निःस्तब्ध मूक गगनाला । निमिषांतच मोहर आला.
आनंद गडे आनंद
गाण्याचा एकच छंद
स्थिर भरला परमानंद
ये रंगनाथ संगीतीं । बाळें तीं खेळत होतीं.

२

परि हाय ! कुठुनि तरि आला । अतितीव्र विषारी वारा
कंपित हो एकाएकीं । मधु दिव्य देश तो सारा
बाळांचे गळले हात । वीनाच्या तुटल्या तारा
ती स्वप्नसृष्टि जळाली
गाण्याची तार गळाली
काजळी चढे वर-खालीं
झाली हो माती माती । बाळें तीं खेळत होतीं.
या खोल भूमिगर्तेंत । अंधार रूढाळत होते
मोहाचे वीख विखारी । बेभान करी सकलांतें
वाऱ्यावर भेसुर भारी । अंधुकता पसरित येते
वाफारा तो लागोनी
तीं रम्य बालकें तान्हीं

कळमळुनी प्रंचप्राणीं
कोसळुनी खालीं येतीं । बाळें तीं खेळत होतीं.
मग भयद काळडोहांत । भोवंडुनि गरके खाती
फणि डंख विखारी मारी । वर लाट चपेटा देती
अंगार ! तडकतें–लाही–। जंजाळ जिवाचे होती.
तडफडती माशावाणी
आक्रंदति करुणागानीं
हा हा ते हाल बघोनी
पाषाणहि भंगुनि जाती । बाळें तीं खेळत होतीं.
कळवळुनि शेवटीं आला । यमधर्म सुमस्नेहाळ
जर्जरित बाळ गालांत । निश्चेष्ट दृष्टि तेजाळ
मालवती जीवज्योत । लवली ती किंचित्काळ
अप्परसा निर्भर चित्तीं
गंधर्व गायनें गाती
स्वर्गांत दिवाळया होती
जातीं न परंतू वरतीं । बाळें तीं खेळत होतीं.

---

## कवि-बाळें[1]

स्वर्गाच्या तेजो गर्भी बाळें तीं खेळत होतीं
वत्सलता प्रभुरायाची जोजवी तयां निजहातीं !
झुलवी त्यां पाळणियांत छायामय मधु रजनी ती;

---

[1] ही कविता बाबूरावांनीं मिळविली आहे. " बाळें तीं खेळत होतीं " व " कवि–बाळें " या एकाच अर्थाच्या कविता आहेत; पण कडव्रीं थोडींफारवेगळीं आहेत. ए.या.नि.

मोत्यांचें घालुनि पाणी
स्वर्गंगा त्यांना न्हाणी,
लडिवाळें बाळें तान्हीं
देवाचीं आवडतीं तीं—कविबाळें खेळत होतीं !
बैसुनी सूर्य किरणांत सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल खुलवावें स्वर्गीय जादुनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजावावी ज्योत्स्नेचें जाळ विणोनी
शांतीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा,
नक्षत्र लोक डुलवावा,
सौंदर्यें उधळित होतीं—बाळें तीं खेळत होतीं !
एकदां सडा संध्येचा शिंपुनी महोत्सव केला
बनविलें बीन ओढोनी कोवळ्या सूर्यकिरणांला
तें वाद्य वाजावयाला बाळांचा मेळा आला;
ते सांध्य गिरि बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
टाकिल्या क्षणीं व्यापोनी !
परिसाया देवहि येती ! बाळें तीं खेळत होतीं !
वाद्याचा ये झंकार एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल लागे हो उमलयाला !
निस्तब्ध मूक गगनाला, निमिषांतच मोहर आला
'आनंद गडे—आनंद
गाण्याचा एकच छंद
हो चोहिंकडे गोविंद !

ये रंगनाथ संगीतीं । बाळें तीं खेळत होतीं!
परी आला तीव्र विषारी हा न कळे कुठचा वारा ?
कंपित हो एकाएकीं कां दिव्य देश हा सारा ?
बाळांचें गळले हात वीणेच्या तुटल्या तारा !
ती स्वप्नसृष्टि जळाली
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे-वर खालीं,
झाली हो माती माती ! बाळें तीं खेळत होतीं !
त्या खोल भूमिगर्तेंत अंधार खळाळत होते.
मोहाचें जालिम वीष बेभान करी सकळांतें
वायूसह तीव्र विषारी अंधुकता प्रसरित येते.
वाफारा तो लागोनी
तीं दिव्य बाळकें तान्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खालीं येतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं !
कडकडला गगनीं तारा ढांसळला भूवर आला !
स्वर्गीय तेज मालवुनी पाषाण क्षणार्धीं झाला !
हा प्रभाव या जगताचा ! दोषावें यांत कुणाला ?
स्वर्गांचे ते शृंगार
प्रेमाचे मौक्तिकहार
गांठिता जडाचें दार
जडतेनें वेष्टित होतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं !
काळाच्या आवर्तांत भोवंडुनि गिरके घ्यावे,
चांचपतां अंधारांत ठेंचाळुनि विव्हल व्हावें !

जें जीवित या जगतीचें तें, त्यांस कसें मानावें ?

जीवास आग लागोनी
तळमळती माशावाणी
स्मरुनी ती पूर्व कहाणी
फोडितात टाहो चित्तीं—बाळें तीं खेळत होतीं !
परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाचीं गाणीं !
निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोढ हा मानी
संतप्त अश्रुमालेला गणितात कल्पनाश्रेणी !

गौरवितें विश्व कवींना,
जग सर्व डोलवी माना,
परि मुग्ध मधुर आस्यांना
त्या काय बोंचतें चित्तीं—बाळें तीं खेळत होतीं !

---

## वैष्णव धर्म

### अभंग

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
संतजनीं वर्म सांगितलें.
तयांचें भजन घडो अहर्निश
माझ्या मीपणास आग लागो.
पर-उपकारीं वेचो सर्व शक्ति
हेचि माझी भक्ति पामराची
सर्व ही आघात येवो मजवरी
सुखी राहो परी देव माझा.

नको स्वर्गवास जनधनकीर्ति
प्रेमाची संपत्ति प्रेमरूप.

---

## आवाहन

श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल,
शिणल्या सुंदर सांध्यदेविचें हो घर्मांकित भाल;
शिणले मारुत, खिन्न पयोधर दुर्धर साहुनि ताप
शून्य गिरिदरी जर्जर निर्झर गळती आपोआप.
उदासवाणें एकच गाणें शून्य मनें वनराई
घोळित राही, लागुनि तंद्रा शीण भरे तद्देहीं.
शिणलें कोणी संसाराचा वाहुनि माथा भार,
अनंत चिंताकाहूरांनीं भरे कुणाचें ऊर.
गायन गातां शिणली माता, शिणलें तान्हें बाळ,
शिणला पालक; मंद हालुनी चालविताहे काळ.
शिणली काया, शिणली माया, शिणले लोकाचार,
सौख्यहि शिणलें, दुःखहि शिणलें, शिणले तत्वविचार.
काळवंडल्या वातावरणीं ये करुणामय वाणी,
शीण पावली प्रीतिदेवता ब्रह्मांडाची राणी.
जगन्मोहिनी काव्यविणेचा मंद पडे रणकार,
ग्रहगोलांवर गंधर्वांचा एक जुळेना सूर,
पक्वपणाची पिवळी छाया सुंदरतेवर रांगे,
ब्रह्मांडाचीं शीण पावलीं, श्रमलीं, दमलीं अंगें
ये ये ये जगदेक माउली ! ये रजनी, लवलाही
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं.

तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळुनि फिरतां तव प्रेमांचित हात.
तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शांत लता ही घेई;
दिव्य दर्शनीं तुझ्याच जननी, फुलते सुंदरताहि.
आद्यदेवते, रजनी, येथें निजले श्री भगवान,
ब्रह्मांडांचा भार माउली तुजविण वाहिल कोण ?
प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हां देईल ?
ग्रहगोलांनां निजकक्षांतुनि कोण पुन्हां नेईल ?
ये ये रजनी, ये फिरफिरुनी, येशील न तूं जेव्हां
प्रळयकाळ या ब्रह्मांडाचा सत्वर होइल तेव्हां !

## अतृप्ति

पाव्याच्या गोड सुरांत । बुडवून जगाला देऊं
स्वानंद सुखद राज्यांत । संत्रस्त जिवाला नेऊं
तारुण्य भ्रष्ट हो जेथें । प्रेमास अंधता येते
सौख्यातिरेकही पाहीं । दुःखाला कारण होई.
संध्येच्या सुंदर छाया । निमिषांतच काजळताती
करि घोर भयद अंधार । नैराश्यविषाची भरती
या अपूर्ण जगतासंगें । मन तृप्ति कधींहि न पावे
मग मंजु गायनासंगें । बा, कां न उडुनि तें जावें ?

## जिज्ञासु

हे योगीशा, मोहमूढ मी नर दुर्बळ दीन,
आनंदाच्या मागें वणवण दमलों भटकून.

अपूर्णतेनें पूर्ण निराशा हृदयाची होते
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें.
आनंदाच्या भारानेंही दुखणारें चित्त
दुःख बघुनि मग नवल न त्याचे तुकडे होतात.
खरा खुरा आनंद असे, कीं सर्वच आभास ?
पडतें कोठें लागे वेडें चित्त रडायास !
उदास जीवन कंठायातें मग कांहीं नाहीं,
भूलभुलाई तत्त्वज्ञांची शोधुनिया पाहीं.

---

## विश्वाचा प्रवास

अव्यक्तांतिल दूरदूरच्या शांत गुहेंतून
दिव्ययोगिनी रजनी झाली गगनीं अवतीर्ण !
जगद्व्यापिनी काव्यकल्पना कविहृदयामधुनी,
जेंवि अवतरे शब्दसृष्टिच्या मधुवातावरणीं—
दिशादिशांतुनि तेंवि प्रगटली छायारूपानें
गभीर मूर्ती निशादेविची, कोण न हें जाणें ?
अर्पुनिया हें सुवर्णरंगी सूर्यकमळ पायीं
त्या भगवतिची करिते पूजा निसर्गदेवी ही !
लाक्षारस चर्चिला गुलाल हि भरला भांगांत
रम्यतारकाफुलें उधळलीं स्तुतिगीतें गात.
सप्तलोक दशदिशा अप्सरा सुर वदती सारे
उदोउदो ब्रह्मांड दुमदुमे त्या जयजयकारें !

अपूर्ण

# जादुगारीण

दे दे सोडुनि ही, लाज गडे, चुंबुनि लाडें कोडें
धर मज कवळोनी, करपाशीं, स्निग्ध तुझ्या हृदयाशीं !
मोहनमालेच्या, बालेच्या, गोड कळ्या गालींच्या,
फुलल्या मन्नयनीं, तद्गंधें, अननुभूत आनंदें.
घेउनि शिथिलपण, निस्त्राण, होउनि पंचप्राण,
झिंगुनिया काया, कलली ही, सांवर गे धर हृदयीं !

× × ×

मधु मंद श्वास, फुंकोनी, मृदुल मधुर अधरांनीं,
झांपड जादूची, मन्नयनीं, जादुगारिणी आणीं !
झांकळुनी प्राण, धुंदिगुण, भरुनि जीव बेभान-
होतो मग नयनीं, गे रमणी, मोहर मूक मुक्यांनीं !

× × ×

बंदा दास तुझा, हा असला, दगडाचा घडलेला
पुतळी जादूची, बनतांची, जीवकळा मग त्याची-
सोडुनि मातीला, अवलीला, तुझ्या हृदयज्योतीला,
पाहुनिया, गिरक्या, घेइल ती, तुझ्याच भंवतींभोंतीं !

× × ×

जादूची झोंप, ही असली, देहमनीं जरि ठसली,
गुंगत परि जीव, नव दृष्टी, बघतिल अद्भुत सृष्टि,
तुझिया श्वासांच्या, भंवतालीं, मधुर नयनकरजालीं,

अपूर्ण

# वात्सल्य

# निजलेल्या मुलास–

ऊठ मुला । ऊठ मुला ।
बघ हा अरुणोदय झाला ॥ १ ॥
नवरंगी । किरणांनीं
भूषविली बघ ही अवनी ॥ २ ॥
मोदभरें । रान भरे
मंद सुगंधातें विखरे ॥ ३ ॥
शीतल हा । वात पहा
आळस हरण्या येत अहा ॥ ४ ॥
किलबिलती । बागडती
वृक्षांवरती पक्षि किती ॥ ५ ॥
रव करिती । भृंगतति
पुष्पांचा मकरंद पिती ॥ ६ ॥
फुलांवरी । फळांवरी
पतंग मोदें मजा करी ॥ ७ ॥
झटकन् बसे । झटकन् उठे
उंच भराऱ्या घेत सुटे ॥ ८ ॥
आनंदें । नभ कोंदे
हरुनि आळसा तरतरि दे ॥ ९ ॥
पूर्वेला । रवि आला
मुला उठाया कथित तुला ॥ १० ॥

## घोडा घोडा !

घोडा घोडा खेळु चला रे। मौज घडींभर करू चला।ध्रु।
घोडे शंकर विठू करा
लगाम हातीं कुणी धरा
दोरीचा चाबूक करा
हां ! तर आतां पळा चलारे ॥ १ ॥ ध्रु० ॥
भले मुलांनो बसा जरा
चित्त आपुलें शांत करा
धांवत जाऊं पुन्हा घरां रे ॥ २ ॥ ध्रु० ॥
गेलीं धांवत मुलें घरीं
गंमत झाली घडीभरीं
आनंद हि चित्ता झाला रे ॥ ३ ॥ ध्रु० ॥

---

## माझा भाऊं [1]

पाहत राहूं । गोजिरा ग माझा भाऊ ॥ ध्रु० ॥
केव्हां हंसतो केव्हां रडतो,
हात पहा हा कसे हलवितो,
घेतो कांहीं टाकुनि देतो,
कां रे भाऊ । तुज कडेवरी का घेऊं ॥ १ ॥
बाहुलि का खेळाया व्हावी ?
लबाड कांहीं बोलत नाहीं !
हांसत हांसत कैसा पाही !

---

१ ही कविता बालकवींच्या नांवावर छापली गेली असली तरी बाबूराव ठोंबरे, कवींचे धाकटे बंधु यांची आहे – संपादक

गाणें भाऊ । रमविण्या तुला कां गाऊं ?
पहा कसा हा आई हंसतो !
माझे केस कसे वध धरितो
लागलीच मग सोडुनि देतो !
चल रे भाऊ । खेळण्यास आपण जाऊं ॥ ३ ॥

## पाळणा

निज रे निज बाळा,लडिवाळा, हालविते हिंदोला ॥धृ०
आणुं नको चित्तीं, क्षणही ती, नश्वर संशयभीति
चंचल निमिषाचें, मोहन तें, सुंदर म्हणती ज्यातें.
फसवुनियां तूंतें, जाइल तें, अक्षय बा दुःखातें.
आशा हृदयाच्या, जरि दिसती, दुरून सोज्वल कांति,
धरितां परि हातीं, हो माती, सोडुन दे ती भ्रांन्ति.
काळा नच कांहीं, ठाउक ती, थोर तुझी विख्याति.
निंदा स्तुति सारी, सोडुन दे, निज निज परमानंदें.
झोंपेमधि कांहीं, भयदायी, स्वप्न न सुजना पाहीं.
सुखदुःखें चिंता, निभ्रांता, भिववितो न तुजला आतां.

## बहिणीकरतां गाणीं

१

बोल बाई बोल ग
तुझ्या बोलाचें काय वाणुं मोल ग
डोल बाई डोल ग

जाइजुईचीं लाख फुलें तोल ग
हांस बाई हांस ग
माझ्या आंगणिं माणिकांची रास ग
नीज बाई नीज ग
गाई अंगाई काऊ चीऊ तूज ग

---

२

या बाई या । बकुळिच्या झाडाखालीं फुलं वेंचूं या
ऊन पडलें । पान फुल दिसे कसें गोड गोडुलें !
गोड गोडिलें । मोतियाचे दाणे कोणी खालीं पाडिलें
रान हालल । पहाटेला शुकदेवगाणें बोलिलें

---

## बीज

आहे बीज म्हणोनि आज तुजला चंद्रा बघोनी मनीं
माझी ही भगिनी असेल नयनें माझ्याकडे लावुनि
आला कंठ असेल दाटुनि तिचा, नाना मनीं भावना
येवोनी, असतील त्या करित ही दुःखी तियेच्या मना।१।
ताई, भाऊ तुझाहि त्याच बघतो चंद्राकडे या क्षणीं;
आणोनी तव मूर्ति चित्त-फलकीं उद्विग्न तोही मनीं
कालें घोर दरी जरी पसरिली प्रेमामधें दुःखदा
प्रीतीनें परि एकरूपच असूं मी तूं पहा सर्वदा ॥ २ ॥
घेवोनी करिं दीप, अक्षत तुवां चंद्राकडे फेकुनी
भाऊ आज कुठें असेल म्हणतां जे होय तूझ्या मनीं
ते तेथें परि गे, क्षणीं मम मनीं नेत्रांतुनी धांवती
हे अश्रू, तुज तेच घालित असे ओवाळणी संप्रती ॥३॥

## रजनीस आव्हान

ये ये ये आई ये बाई ये रजनी लवलाही
स्वप्नें भयदायीं दिवसाही सृष्टि बालिका पाही
गेला गे गेला विलयाला बंधुभगिनिचा मेळा

नक्षत्रें तारा माहेरा कुठें न उरला थारा
हुरहुर अवलोकीं गगनांत उठे अग्निचा स्रोत
आक्रंदे चित्तीं भगवंता धाव धांवणें आतां

———

## वत्सलता

वत्सलतेनें चिमण्याबाळा तुज वेल्हाळा पालविते
हृदयीं येई प्रेम दाटुनी त्यापरि पालव हालविते
निज निज बाळा-जीवभाव हा गहिवरुनी येई भरती
प्रेमानंदा तुज गातां जणुं लक्ष कवि मनीं अवतरति
सांठविलें जें मनीं आजवरि तेज तुझ्या वदनीं बघुनी
नको बघाया जनांत कोणी म्हणुनि झांकितें पदरांनीं
निज निज माझ्या प्रेमानंदा, मत्सुखकंदा नीज गडे
नातरि हृदयीं फिरुनि निजविण्या धडधड माझें चित्त उडे;
कसले कांहीं विचार बाई मी तरि आई शोभतसे
माझिच तुजला दृष्ट लागली हाय मना भय वाटतसे.



# ऐतिहासिक

## माझा भारत

अंधारामधुनी प्रकाशकिरणें चैतन्य वाहोनिया
आणी भूमिवरी अपार गमली सर्वेश्वराची दया
माझा भारत एकलाचि तिजला हा पारखा जाहला
शंका ये तुजला अशी तरि कशी आश्चर्य वाटे मला !
आहे हा हतभाग्य दीनदुबळा संत्रस्त दुःखी जरी
दारिद्र्यें जरि अस्थिपंजर उरे त्या तच्छरीरावरी
त्याला पाहुनिया भिऊन दुसरे कोणी पळाले दुरी
या दुःखीं परि प्रीति वाढत असे माझी तरी त्यावरि.
आहे देव विभागिला सकल या विश्वांत चोहींकडे
तो माझ्या हृदयांतरीं बसुनिया हे शब्द बोले पुढें
नाहीं भारत दीन दुर्बल जरी, माझा मला अप्रिय
मी न्यायप्रिय देव वारिन पहा आतां तयाचें भय !

---

## वीरगडी

या घुमत्या रात्रीचा वारा घुमवूं दे तुमच्या हृदयाला
वीर्यश्रीचें अपूर्व पाणी वीरांनो, निधड्या छात्यांनीं
याच झऱ्यापरि पसरुनि धारे कड्यावरुनि चोहिकडे खाले
जों तेजाची दिव्य तुतारी प्रतापनिधि घुमवीन निराळी
तोंच आपुल्या खड्गलतांनीं शत्रुरक्तमय बनवा अवनी
कचेल जो-पण नांव कशाला पुरे हाच संदेश तुम्हांला

कडकडणाऱ्या चपलेवाणी वीरमणीची गभीर वाणी
नाच नाचुनी कड्याकड्यांत तेजाची संचरवी ज्योत

काळवेळ परि कसले काय वीर पुन्हां परते असहाय
साह्य कशाला विलसे हातीं रिपुरुधिरप्रिय खड्गलता ती
क्षणक्षणा त्या दुर्गामधुनी दीप तळपतो लपतो विपिनीं
विजा चमकती प्रगटे रान गर्द भरे अंधार फिरून

दरड भयंकर वरती आली रिपु सैन्याचा पडाव खालीं
मार्ग संपला चुकला घोडा वीर थरकला मनांत थोडा
अन्यक्षणीं नवकांति उसळली अग्निकणापरि नयनीं गाली
निमिषार्धीं सरसावुनि हात नाचुं लागलें खड्ग नभांत
अंधेरी परि भलती झुकली दृष्टि विरमली ठकली थकली
गुप्त रिपूचा जडला भिडला वीराच्या हृदयाशीं आला
दबा धरुनिया बसला छावा वीर केसरी खवळुनि यावा
त्यापरि तो उसळुनियां वीर जों घाली अरिवर तरवार
तोंच मधे टंकार उदेला खड्गाचा खणखण रव झाला
किंकाळी श्रवणावर आली पुढें निनादें बसली टाळी
स्तब्ध वीर न्याहळितो तेथें भूवर तों पडलेली प्रेतें
भास दिव्य हो क्षणैक नयनीं तोंच उठे निःश्वास दुरोनी

दुर्गामधुनी उसळुनि आला एकजात सरदारी भाला
पलिकडच्या अत्युग्र कड्यांत रणवाद्यांचा उठला धोत
मागे पुढती एकच मारा शत्रुगजबजे क्षणांत सारा
वीर पुरा बनला बेहोष क्षणाक्षण गर्जे रणघोष
धन्य वीर व्हा पुढती पुढती पाहु बरें काळाची छाती
भंग भंगुनी व्हा धुळधाणी शत्रुदळाचें जिरलें पाणी

वीर्यश्रीचा नवरा गाजी बेभान चरे समरामाजीं
शत्रुदळाचा कोट अफाट चिरित चालला तसाच थेट
रातकिड्यांच्या कठोर गानीं बेभानपणा भरला रानीं
कड्याखालच्या उभ्या कपारी पाणथळीच्या गलिच्छ भारी
त्या मधुनी घोंघावत गीतें सैराटपणें उठली भूतें
भालूचें विव्हळणें चाले कुठें पिंगळा भकास बोले
कुठें खिदखिदे दरीच वाटे रान करकरे भयाण कोठें
क्षणीं भारिला पुतळयावाणी वीर जशाचा तसाच रानीं

मृत्युप्रीती मृत्युप्रीती नाद भयंकर नभांत होती
दऱ्या कपारी वनें हि सारी नाचु लागलीं घनांधकारी
अग्नि पेटला उठल्या ज्योती भग्न सत्य ये भकास चित्तीं
भग्न रवे आरडोनी कोणी क्षणीं धबधबा उरास हाणी
मगरापरी वासुनिया तोंडें गरगर गरगर घेत भवंडे
किंकाळया फोडित लवलाही पिशाच्चमाला अदृश्य होई
अपूर्ण

---

# शाहीर

शूर वीर सरदार मराठी मानकरी मंडळी
पाट भाट वर्णिती जयाची उदार बिरुदावली,
धीर धिंग रणसिंग बैसले नरनायक त्यामधें
ऐटदार जरतार आपल्या भर पोषाखी सुधे.
सौंदर्याची वेल बहरली ठरली उजवीकडे
राजबाळ वेल्हाळ बघत अलुमाळ पावलांकडे
वीररसार सर्वस्व जयाचें विशाळ वक्षःस्थळ

नाथ तिचा तो सनाथ करि जणू अनाथ भूमंडळ
नवा युवा वनराज केसरी सलील बसला जसा
ठाणमाण मांडुनी, तयाचा तसाच उठला जसा
थाटदाट थाटला सभेचा थाप डफावर बसे
ताल धरी खंजिरी, तारिचा झणत्कार होतसे
उदो उदो ! जयघोष घणघणे थकित चकित हो समा
वीर्याचा नटनाच प्रीतिचा रोमांचावर उभा.
चित्त चरकलें प्रेम थरकलें वीर्य हरवलें अहो

अपूर्ण

## प्रतापसिंह

हा अंत:कलहाग्नि घोर पडला, पृष्ठें जळालीं किती ?
रक्ताचे ठिपके भयंकर निजद्वेषें किती माजती ?
स्वार्थाचें अति तीव्र खड्ग पडुनी, चित्रें किती कांपिलीं ?
झालीं कृष्णकभिन्न दैवलिखितें, ही क्षीणता हो बळी !
क्रुद्धा ग्रंथसमीक्षणीं भरतभू हुंकार फोडी बळें
गेला पेटुनि विंध्यपर्वत पहा, तद्दिव्य घोषानलें !
विश्वेशप्रिय विश्वधूरि-असुरां दुर्दांत निर्दाळुनी

---

१ ही कविता बालकवीकडून पूर्ण झाली असती तर किती पण बहार झाली असती असें कोणास वाटणार नाहीं ? बालकवींना राष्ट्रीय कवन गातां आलींच नाहींत असें म्हणणाऱ्यांनीं यापुढें तरी एकदम चूप बसावें ! नाथ

---

१ भाटांच्या वाक्शरांमुळें यादवी युद्धें माजून रजपूत हैराण झाले असा हा उल्लेख आहे. नाथ

दिव्यात्मे निजले तयावर तया चैतन्य येतां क्षणीं.
झाले ते रजपूत पून करण्या दिव्यध्वजा भारती
तो निर्घोष प्रतापसिंह अमुचा मार्तंड चंडाकृति !

× × ×

नाहीं विंध्य सुवर्णमेरुहुनिहीं अत्युच नाहीं उणा
खंदा राउत एक एक शतशा देवांहुनी त्या गुणा

अपूर्ण

---

## दौलतरावांची मंजुळा

नाकीं डोळीं चित्र बाहुली देवानें केली
हत दैवानें लिहुन ठेविलें काय परी भाळीं.
येउनिया मागून ठेवुनी खांद्यावर हात
करुणा वदनीं धाउन माला मोत्यांची येत.
वाहू दे ती मंगलमाया अशी च वाहूं दे
अश्रुपुरानें या करुणेच्या जग हें न्हाऊं दे
मिळेल वैभव दिसतिल जगतीं रत्नांच्या राशी
अश्रु दयामय मृत्युजगीं या मोल नसे त्यासी.
मिळतिल कवनें मिळतिल दुर्मिळ तत्त्वांचे बोल
दिव्य अश्रुंनो तुह्मांपुढें परि ते सगळे फोल
दिव्य तारका दूर राहिल्या त्या स्वर्लोकांत
दिव्य अश्रुपरि शुद्ध मनाचे त्यांहुनि निभ्रांत.
अमृताचा वर्षाव जगीं जरि केला जलदांनीं
तृषा न जाइल शोकदग्ध या अवनीची त्यांनीं
प्रति जीवाला अखिल जगाला एक सुधा व्हावी

अंतःकरणीं ओतितसे जी दिव्य दयादेवी.
गंगायमुना शुद्ध दयामय अश्रूंची जेव्हां
त्या गंगेच्या पुण्यदर्शनें नर तरतिल तेव्हां
परजीवास्तव जेथ आंतडें कळवळुनी येई
त्या हृदयाविण स्वर्ग दुजा या ब्रह्मांडीं नाहीं.
स्वर्ग हवा कां देव हवा कां ये तर मग येथ
मलूल अपुलें बनव गड्या या बाळासम चित्त
× × ×
राजस बाळा बाळ मंजुळा दौलतरावांची
पोर पोरकी एक राहिली थकल्या जीवाची.
बरोबरीचे पुत्र लाडके जीवाहुनि फार
एका मागुनि एक लोपले समरीं रणशूर
तुटे तटतटा हृदय लागला जीवावर घाय
झुरून पांजर माय तयांची त्या मागुनि जाय
दुर्धर दुःखें देह खचाया काळमुखीं लागे
एकच दुबळा पाश ओढितो त्यास पुन्हा मागें:
पर लोकींचें स्वप्न मनाच्या नयनावर येतें
जागेपणचें चित्र मंजुळा परि उघडी येथें !
अखंड चिंताव्यवधानांच्या जीव बुडे डोहीं
डोळयांपुढची बाळ मंजुळा परि हालत नाहीं.
तीव्र विषारी शोक पोंखरी आंतुन वृक्षाला
बाळकळीला सहज त्यामुळें म्लानपणा आला.
दुःख रेखिते सान जिवावर जी करुणा कांहीं
काव्यलेखनीं चित्रदर्शनीं ती दिसणें नाहीं.
भोळा हृदयीं भाव दाटला बाहीं देवाला

मूक रोदनीं अभागिनीचा नच लागे डोळा.
जीर्ण पसरले हात उराशीं धरिलें तनयेला
डोकींवरुनी कुरवाळित कर पाठीवर नेला:
थिजली आशा जीव गोठल्या नयनांतुन पाही
शून्य भविष्यें विकल चेतना करुणाकुल होई.
सरली माया लोचन मिटले शांतपणा आला
एकच झटका क्षीण कलेवर गळलें भूमीला

* * *

नश्वर जग हें नश्वर अमुचे मायेचे पाश
क्षणीं तोडुनी काळ तटतटा फेंकुनि दे त्यास.
वैभव गेलें नांव निमालें बुडलें घरदार
फिरला नांगर ओस जाहला भरला संसार
स्वप्नमात्र हा क्षणिक पसारा मायेचा भास
सत्य बोल हे परि न शांतता देतिल जीवास.

× × ×

अनाथ बाळा पोर मंजुळा केवळ अज्ञान
भूमि फाटली तिला वाटलें तुटलें अस्मान !
धार लागली जी ममतेच्या रुधिराची जीवा
मायेचें जग ओस-कुणाला दाविल ती देवा
काळवतें ब्रह्मांड मनीं घर खायाला येतें
निजेल कैसी पोर मंजुळा कुणि सांगा येथें ?

अपूर्ण

## जीर्ण दुर्ग[1]

दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढें, जेथ गतकालीं
शूर साहसी नरसिंहांनीं अपुली वसती केली.
कड्याकड्यांमधिं घुमुनि नर्मदा गात यशोमय गीतें
सांगत होती सर्व देशभर सद्यःकर्तव्यातें
रंगमहालीं शेज फुलांची याच गडावर झाली
स्वातंत्र्यास्तव अग्नि भडकला-राख तयाची केली
तरवारीची धार देवता हीच जयांची एक
ब्रीद, जयाचें सदा तियेला रुधिराचा अभिषेक
जीव नव्हे संसार ओपिला स्वातंत्र्यास्तव ज्यांनीं
त्या वीरांचा वास जाहला गतकालीं या स्थानीं
आतां कोणी क्षुद्र पुजारी देविस पूजायातें
घासित बसतो कुंकूमपूरित चंदन अपुल्या हस्तें
आणि पिवोनी भांग दुखारी झिंगत वदतो कांहीं
पूर्वकथा निर्विकार चित्तें हर्षित दोन पयांहीं
हे काळाचे खेळ, कुठेंही असेंच चालायाचें
त्यास कशाला परि आम्हाला कांहिं न वाटे त्याचें
एक खुराडें—भाड्याचें तें—राहूं त्यांत खुशाल
क्षुद्र जिवांतें अम्हां कशाला असले रंगमहाल ?

---

१ ही कविता नवयुगांत प्रसिद्ध करतांना ग. त्र्यं. माडखोलकर लिहितात, " येथले शब्द गळले आहेत. कविता अनामक आहे. अपूर्ण नसावी असें वाटतें. " हें लिहिणें अगदीं खरें आहे. परंतु शक्य तितकी काळजी घेऊन मित्रांच्या मदतीनें पूर्णत्व आणिलें आहे. नाथ

# वीर मराठा !

उग्र कडेच्या कडे तोडुनी वीर बालिका वनविर्झरिणी
पुन्हा एकदां वळुनी बघते स्वाभिमान दृष्टीनें जेथें
त्याच तिच्या सुंदर वळशावर विंध्यशिरावरि भव्य भयंकर
विश्वरक्षणा जणू उदेला, दुर्ग दिसे अभिमानच पहिला
उच्च उच्च तत्सौधावरतीं धीर गभीर प्रसन्न मूर्ती
वीर मराठा कुमार कोणी बघे सहज पलिकडच्या रानीं

× × ×

भयाण दरडी घोर कऱ्हाडी किर्र् दाट अंधारी झाडी
कृष्ण राक्षसी शिला पसरती गर्द मातल्या गवतावरती
ढांसळलेले कडे भयंकर तुटुनि घसरले परस्परांवर
त्यांत चेपला वननिर्झर तो काल भुजंगासम सळसळतो
कृष्ण भयानक तीं गिरिशिखरें त्या खिंडीं तीं रानभुयारें
विरूपाक्ष कालाचें तेथें भेसुर रूप दिसे न कुणातें ?

× × ×

काळमुखीं पण वावरणारा रणदेवीचा पंचिप्यारा
वीर्याचा अतिरेकच नुसता वीर बाल तो कुमार होता
रणक्षेत्र तें बघुनी नयनीं प्रस्फुरला वीर्याग्नि कणांनीं
ज्योत नवी फोफावुन झाली लाल लाल वदनावर आली
दृष्टींतुनि फूत्कारच ओती उग्र नागिणी मनस्वितानी
रणदेवीचा हृदयमणी तो दिव्य विचारीं यापरि झुलतो
शूरवीर समरांगणगाजी निजपूर्वज बघतो तो आजी
तीं मैदानें प्रदेश सारा आज अपूर्वच दिसतो त्याला
बघतां बघतां नटला बाळ काल दुजा बनला विकराल

तोंच कळेना कुठुनी कसला एकंदर निःश्वास उदेला
स्वप्न चले वरती मग पाहे नीशावात घोंघावत आहे
प्रकाश गेला संध्या गेली रात्र उदेली विचारजाली

× × ×

रणक्षेत्र ते कडे विशाल वाढविती रेवेचे बोल
घूं घूं घूं मंत्राची माला घुबड लागलें बोलायाला
वन्य पशूंचे भेसुर नाद दुर्गावर घेती पडसाद
कसा कळावा त्यांतुनि त्याला एक मंद निश्वास उदेला
श्रवण रंध्रि परि अजुनी घुमतो मारुतचेष्टाभास मात्र तो
बालवीर क्षण चंचल झाला।अस्फुट वच अपणाशिंच वदला
रणदेवीचें प्रीतिस्थान कर्कश रणधीरांचे प्राण

× + ×

मजसाठीं झरणाऱ्या श्वासा दाब आंतल्या आंत उसासा
समोर दिसतें रणस्थान तें हृदय नाचतें अमुचें तेथें
शौर्यासाठीं शूरापोटीं रणांगणाच्या घ्याया गांठी
रजपूताचे आह्मी छावे मरण मारणें आम्हां ठावें
प्रेमभुकेलें असेल कोणी पहा शोधुनी जा त्या स्थानीं
मी समरीं रणशूर बनोनी इच्छितसे खड्गाचें पाणी

× × ×

पाणी पाणी जलमय सारा आसपासचा पर्वत झाला
धो धो धांवती निर्झर खालीं दरी दरी धोधोमय झाली
कृष्णवर्ण घनपर्वत वरती काळकृतान्तापरी विचरती
कडाडती चपला त्या घातें स्वर्भूसी क्षण दुभंग होते
काळोखाचें काळिज फुटलें किर्र् रात्र अंधारी बोले
कसला पर्वत कसलें रान एक मात्र अंधार भयाण

दुर्ग गजबजे बसल्या थापा घोड्यांच्या टपटपल्या टापा
वीर मराठे दिसले लपले निस्तब्ध पुन्हां कानन डोले
कृष्णरात्रिची भयाण वेळ रान सभोंतीं जड जंजाळ
शौर्यदेवता परी नाचते कड्याकड्यांतुनि जेथें तेथें
हादरीत जड पर्वत सारा घो घो घो घुमताहे वारा
त्याच निनादें बसुनी टाळी प्रतिध्वनीं हो भयद निराळी

अपूर्ण

---

## राष्ट्रसेवा

### श्लोक

मना दैन्य दौर्बल्य हें पाहवेना
मना हिंदभूची व्यथा साहवेना
भरे घोर अज्ञान हें दुर्विकारीं
मना राष्ट्रशिक्षांजनें त्या निवारीं ॥ १ ॥
महामंगला पावना पुण्यभूमी
तिचे-राष्ट्रमाते तुझे बाळ आह्मी
तुझें नांव या सार्थ लोकीं करावें

---

१ ही कविता कोणत्या प्रसंगावरची आहे न कळे. महादजी शिंद्याच्या माळव्यावरील स्वारीची दिसते. तें कसें हि असो. बालकवि आणिक जगते तर त्यांच्या प्रेमळ बांसरीप्रमाणें ही ऐतिहासिक कवनांची भेरी खूपच मोठ्यानें वाजली असती ! पण— ! ! !

नाथ

स्वयें उद्धरोनी जना उद्धरावें ॥ २ ॥
बहू नेटका नीट संसार केला
परी शेवटीं काळ घेऊन गेला
अशा संसृतिची जनीं कोण गोडी
धरी रे मना राष्ट्रसेवा न सोडी
किती कोंवळे बाळ या हिंदभूचे ॥ ३ ॥

अपूर्ण

## माझा महाराष्ट्र

महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा निनाद अंबर भरी
महाराष्ट्र यश दिव्य गाइलें अनंत लोकेश्वरीं
थोर थोर नरवीर धैर्यधर संतसन्मणी गुणी
तुझ्याच चरणीं लीन जाह्ले माय विश्वपावनी

अपूर्ण

## आर्यांची अवनति

[ दिंडी ]

हमालांचें जरि राष्ट्र असें कोठें
हिंदभूमी तो देश मला वाटे
अहा ! पोटाची खांच भरायातें
कष्ट देवा पडतात किती त्यातें ॥ १ ॥
आंग्ल-विद्येच्या अध्ययनामाजीं
अहा सुकते तारुण्यकळा ताजी
तेज गेलें सामर्थ्य नष्ट झालें
हीन दुर्बळ विज्ञान घरां आलें ॥ २ ॥



कै० बालकवि

## त्र्यंबक बापूजी ठोमरे.

Vijaya Press, 570 Shanwar, Poona.

लग्न झालें संसार गळा आला
देह केवळ राहिला विकायाला
एक चिंता धन केविं पडे हातीं
अन्नवसनाची केविं सरे भ्रांती ॥ ३ ॥
क्षणीं विद्येची होय धूळधाण
तयासंगें हो तीहि हमालीण
पौरुषाचा मग सहज अंत झाला
गोड मानी मन त्याच हमालीला ॥ ४ ॥
स्वार्थ परमार्थांसवें साधणारी
दिव्य संजीवक पौरुषाधिकारी
स्वोन्नतीचा सत्पंथ दाविणारी ।
कुठें विद्या ती आत्मगर्व हारी ? ॥ ५ ॥

अपूर्ण

---

## राष्ट्रगायित्री

### अनुष्टुप्

नमो श्री राष्ट्रगायित्री । नमो चैतन्यरुपिणी
ध्वांत विध्वंसिनी देवी । ओजस्विनि नमोस्तुते
अहो हिंदभूच्या हरा अंधकारा
करा दिव्य हा राष्ट्रसंसार सारा

अपूर्ण

---

## रणघोष

अरिसैन्याचा अफाट सागर, त्यांत गर्जतो दुर्ग भयंकर
अग्निवर्षणीं वीर म्हाडनी, क्षणक्षणा आदळती धरणीं

तों दुर्गांतुनि बाहिर आला, एकजात सरदारी भाला
वीर पुरा बनला बेहोष, क्षणक्षणां गर्जे रणघोष
धन्य वीरहो, पुढती-पुढती, पाहु बरें काळाची छाती
वीरश्री नवरा तो गाजी, बेभान चरे समरामार्जी
त्यांत नटे रिपुरक्तस्नानीं, भाग्यवान एकादा कोणी.
तडिल्लतेचा तुटुनी लोळ, क्षणामधें करपून भुगोल
क्षणामधें नवतेज भरोनी, अग्निशिखाधगधगत्यानयनीं
क्षणांत वरती ऊर उभारे, क्षणार्धांत हो भयाण सारें
दुर्ग फाटला उठला त्यांत, अग्निशिखेचा भयाण धोत
काळच तो किंकाळया फोडी, वीर विराची धरितो नरडी
काळाची विक्राळ क्रीडा, तो मृत्यूचा भयाण कीडा
तोंच पलिकडे उग्र कड्यांत, दाट धुराचे उठले धोत
मागें पुढतीं एकच मारा, शत्रु गजबजे क्षणांत सारा
भंगभंगुनी हो धुळधाणी, शत्रुदळाचें जिरलें पाणी
भान कशाचें? नव नवसाचें, समरतीर्थ खऱ्या शूराचे
अन्य क्षणीं अंधार अघोर, तसा जाहला क्षणैक वीर
क्षणार्धांत मधु सुषमा आली, क्षणीं रोष ये नयनीं गालीं
निःश्वसिता किंकाळी फोडी, परि न चळे ओठांची जोडी[1]

अपूर्ण

---

१ या कवितेंत इतकीं अशुद्धें राहून गेलीं आहेत कीं तीं शुद्ध केल्यास कविता बालकवींची राहणार नाहीं. पण तें पाप करणारा मी नव्हे. नाथ

# नानाविध

## चैतन्याचे [1]ध्वनि

विश्वदर्शनीं जीव उचमळे मन थयथय नाचे
बंध बंध ही शिथिल हरपतें भानच देहाचें.
जीव ओढितो वरवर जाया चैतन्यापाठीं
जड देहाची सुटे तुटेना दृढ बसली गांठी !
परमानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा लोटे—
सत्यचि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे !
हृदयासह परि देह नाचतो या खगबालाचा,
दिव्य महात्मा म्हणुनि वाटतो हा मजला साचा.
वातावरणीं गूढ गीत जें मुग्ध भविष्यांचें.
दिग्गगनाचें विश्वगीत तें अवकाशीं साचें.
प्रकाशांत जे चैतन्याचें ध्वनि उठले कांहीं
गोल डोलती अनंततेच्या त्या मधुबोलांहीं

त्या शुक्ती परि हींहि गायनीं विचारलहरीवरुनी
हृदंतरांतुन महाकवीच्या उसळुनि वरतीं येती.
घे हातीं कर कौतुक यांचें, परि नच चित्तीं आणीं,
या गीतांनीं कळलें कविचें अंतःकरण निदानीं

---

१ या प्रकरणांत कवींच्या, ठिकठिकाणीं सांपडलेल्या पूर्ण व अपूर्ण, केवळ एकच कल्पनेच्या तर एका ओळीच्या देखील कवितांचा समावेश केला आहे. नाथ

२ ही कविता ' कवीचें अंतरंग ' या कवितेची पुरवणी असावी. एकाद्या कवितेवर नवीन विचार सुचले तर कवींनीं कधीं त्याच कवितेखालीं तर कधीं वेगळ्याच चिठोऱ्यांवर लिहून ठेवावें. अमृतराव ठोंबरे

'सांजसकाळीं हिमवंतीचें वेलित मोत्यें घडे
हात लावितां परि नरनाथा, तें तर खालीं पडे'
ती वनमाळा म्हणे नृपाळा, सुंदर मी हो खरी,[1]

---

मंदगतीनें मारुत वाहे, चढतें पडतें आंदोलन
तें भिरभिरतें आहे, वातावरणीं झेली कोणी,
यास देवता मृदु हातांनीं, आणि शिकविते,
मंजुळगीत यद्गानीं कां हें ?

---

गगनीं तारा उदय पावल्या, स्वर्गांचे ते—
दीपक होतें दिव्य अप्सरा घेउन आल्या,
तेज भहातें—या या म्हणतें—वृत्ति
समुत्सुक अमुच्या झाल्या, मंगल गीतें—
गात जगातें—कविसंगें वरवरती गेल्या,
मरुद्गणांनीं दिशा धुवुनियां साजऱ्या केल्या—

अपूर्ण

---

कोठारी यावरला दिसतो न परी
पाहुनि तें मग मारुत शिरती तेथें
त्याहलुनि नाहिं बवत दुसरें कोणी

---

१ 'सुकांत चंद्रानना पातली' या कवितेची पुरवणी असावी. नाथ

मग हातें अस्ताव्यस्त करी त्यांतें
मधुमोतीं भूवरतीं भरभर ओतीं" अपूर्ण

## श्रीमानवता

ग्रंथारंभीं नमन देवते श्रीमानवते तुला
दिव्यदेवता विविधरूपिणी तूंच एक निस्तुला

---

काळया काळया अंधरामधिं कोमल तारावाला
चंचल हललया तरुपर्णांवर ठेविति दंवबिंदूला ॥ अपूर्ण

---

सौंदर्यानें जीवन बाणे, प्रेमजागृती हो मग त्यानें
लहरींवर हें लिहून गाणें, मग दिवसां बसतो गात.
चित्रकराला कविरायाला, अशक्य जे कां उठावायाला
सौंदर्याच्या नव नव लीला, त्या उठल्या मम हृदयांत[2]

---

१ या कवितेवरून आमचा एक संशय दृढ होतो. आमच्या जवळच्या बाडांत, ३६, ३७, ३८, अशीं पृष्ठें नाहींतच. त्यावरून ही, कविता कवींनीं एवढीच लिहिलेली नसेल. मासिकांत असेलहि. तत्रापि या प्रथमावृत्तींत बाडावरच अवलंबून राहणें मला योग्य वाटतें. नाथ

---

२ ही कविता "तडाग असतों तर" या कवितेची पुरवणी असावी. असल्या कविता प्रसिद्ध झाल्या असतील तरी विशेष सबळ पुरावा मिळाल्यावांचून अमक्याच कवितेंतलीं अमकींच चरणें आहेत असें समजावयास मी तयार नाहीं. नाथ

## कवीची इच्छा

तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें
गुंगतची होउनि जावें । त्वदाधीन जीवें भावें !
गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते माती
तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणीं येती.
मग त्यांचा भरुनी झोल । एकेकच गुंफित बोल-
सौंदर्यांचे स्वप्नाचे । भासाचे कल्पकतेचे-
अर्धस्फुट नयनांवरचे । निद्रेचे जागेपणिंचे—
मुग्धमधुर हांस्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले,
हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे,
मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे,
दिव्य तरंगीं तरणारे । गोड गोड गुंफित सारे.

× × ×

प्रतिभेच्या सौधावरुनी । मरुद्गणांवरती चढुनी
अनंतांत गगनीं उडुनी । लीन बनुनि वातावरणीं
होउनियां सौंदर्य धनि । गुंजावीं मंजुळ गाणीं

× × ×

ब्रह्मांडाची सदाफुली । अक्षयतेमध्यें फुलली
फुलें तिचीं बघतां नयनीं । वेड भरुनि अंतःकरणीं,
फूलपांखरें परोपरी । निर्बंधपणें फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होतीं । मंद तरल गंधावरती,
तेंवि जगांच्या फुलांवरी । गंध दाटले परोपरी,
अनुभवुनी हर्षित व्हावें । सुखदुःखें चुंबित गावें.

× × ×

सुमकोपीं आपोआप । क्षण घ्यावी साखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें,
सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें व्यावें;
स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत !
मरण्याचें स्वप्नहि गोड । जगण्याचें स्वप्नहि गोड !
येणेंवरि सर्वहि भास । अमृताचे व्हावे कोष.

× × ×

काव्य पांखरूं हें मेलें । जन म्हणतिल पाहुनि सगळे;
नवल परी यावर कांहीं । मृत्यूचें चिन्हच नाहीं ![1]
स्वर्गींचीं बहरुनि फुलें । सूर्यफुलें नक्षत्रफुलें
नंदनवन सुंदर वरतें । तें दिसलें नयनीं यातें,
मधुगीतें गंधर्वांचीं । नृत्यकला अप्सरसांची,
देवांचीं राज्यें बघुनी । हें भुललें गेलें उडुनी.
अक्षय तेथें तरंगतें । तरल मनें डुलतें झुलतें
काव्यपांखरूं स्वैरपणें । चुंबनगीतें अजुनि म्हणे;
नाहिं खरें जगतीं मरण । काव्यपांखरूं बघा खुण.
नसत्याची भीती धरुनी । असतें का द्यावें त्यजुनी ?
कां म्हणुनी वेडें व्हावें ? चुंबितची यासम जावें.
भासाचीं सर्वहि सुमनें । चला चला चुंबित वदनें
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड जगणें गोड
दुःखाश्रूंतिल ही गोडी । हास्याहुनि नाहीं थोडी.

---

१ " फूल पांखरूं मरण पाहिलें, आहे कां कोणी ? "
केशवसुत.

दोघे ही नाहीं भास। आवडती चुंबायास.
प्रेमानें भरलें गात्र। सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्ही जाऊं। स्वैरपणीं जगतीं राहूं
प्रेतहि माझें पाहूनी। प्रेमें मी गुंगे गानीं
यापरि जग हर्षित व्हावें,
हें इच्छीं जीवेंभावें !

## धर्मवीर

[१]

आद्य ऋषींनीं जी केली, तेजाची पूजा पहिली
ती करणें ज्या ज्या लोकां, ते सारे सावध ऐका !

× × ×

गर्जू या हिंदुस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदुस्थानीं,
ते सारे सावध ऐका, सत्यधर्म कथितो लोकां–

× × ×

ज्या तेजामध्यें भिनले, आद्य ऋषी जाउनि सगळे,
तेंच तेज हृदयीं भिनतां, आद्य ऋषी बघतां बघतां–
अवतरुनी तुमच्या हृदयीं, स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !

× × ×

जडतेचें लागुनि भूत, सृष्टि करी हळहळ येथ.
क्षणीच तेजाचीच जगीं, भासतसे जागोजागीं.

१ ही कविता " कवन–गुच्छ " या गोविंदाग्रज–मंडळाच्या पुस्तकांत छापलेली आहे. तींत व ईंत जे फरक आहेत ते दिसावयाला किरकोळ पण काव्यदृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. नाथ

क्षुद्र तुम्हीं बनलां कां रे ? मायेनें भुललां सारे !
तेजाला अवमानुनिया, अंधारीं मरतां वाया.
मरणाचें काढा मरण, द्या मिळवा जीवंतपण !
वाट करा तेजाला रे, फोडुनि हीं कारागारें !
प्रकाश द्या सृष्टीला तो—जो तुम्हांवरतीं येतो !

× × ×

धर्माचारांची माती, कां धरूनी बसलां हातीं ?
मातीवर चढतें कीट, सत्य धरा ध्यानीं नीट !
सत्य सदा निर्मळच तें, आज उद्यां येथें तेथें.
रूढींचें चढलें कीट धर्मांवर, परजा नीट[1] !
सत्याची समशेर धरा, असत्य सारे पार चिरा !

× × ×

आद्यऋषींचा सद्धर्म, हेंच मात्र त्याचें वर्म—
सत्य प्रस्थापित व्हावें, देहमनें जीवेंभावें.
जडतेची काढा कीट, तेजाची उजळा वाट.
धर्मपताका द्या हातीं, उदार व्हा प्राणांवरतीं !
अहंकार जिरला नाहीं, मोह पुरा विरला नाही—
धर्माच्या वाफा जुसत्या, दवडितसां भलत्या सलत्या !
तोंडावर बसली माशी, शक्ति न ती उडवायासीं !

× × ×

---

१ ही ओळ " रूढीवर चढलें कीट, साफ करा परजा नीट " अशी कवन-गुच्छांत आढळते. एक तर मूळांत असें चरण नाहींच; व दुसरें असें कीं रूढीवरच गदा घालणारे केशवसुतांचे चेले रूढीवर कीट चढलें तें काढा असा इशारा देतील तरी कसे ?—नाथ

विषयांचा नयनीं धूर, धर्म मात्र तुमचा थोर!
दिडकीला सतरा पापें, धर्म धर्म वदणें सोपें !
ब्रह्मचर्य तुमचें थोर, चवदावें वर्षीं पोर !
देहाचे बनला दास, मायेचा बसला फांस,
स्वार्थानें वेडे झालां, धर्माचा मुडदा केला !

× × ×

धर्म नव्हे संध्यास्नान, धर्म नव्हे आसन ध्यान;
तत्वज्ञानाचे बोल, तें धर्मावरचें फोल !
अंतरंगीं तुमच्या बसतो, आचरणीं तुमच्या दिसतो,
धर्म खरा तुमचा तोच, बाकीचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार, धर्म नव्हे नाजुक नार;
जीवाचें द्यावें मोल, धर्म तेधवां समजेल.
तोंवरि या वाफा सोडा, धर्म म्हणा छाती झोडा—
अधःपात ढळणें नाहीं, धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा, मृत्यु जिला नाहीं ठावा.
नामरूप हीं मरणाचीं ! चंचलता जगतीं साची ![1]

× × ×

---

१ कवनगुच्छांत—

'रूढि अशी कोणी दावा, बदल जिला नाहीं ठावा. नामरूप बदलायाचें, चंचलता जगतीं नाचे,' व लगेच पुढें—

ही वरची—पोपटपंची, अजुनि किती घोकायाची ?

याचा अर्थ तरी काय होतो ? गुच्छ गुंफतांना माळ्यानें पुष्पांप्रमाणें पांकळ्यांकडे हि नीट बघावयाचें होतें. कोणत्याहि तत्त्वानें रूढीचा चोखाळ्या मार्ग घेऊं नये असेंच बालकवींचें मत होतें.-नाथ

जगताची पोपटपंची, अजुनि किती घोकायाची ?
आंत चला उघडा डोळे, मोहाचे सोडा चाळे.
परात्पराची कांस धरा; तेजाची समशेर नरा !
अंधकार तोडा मोडा, सत्यधर्म पदरीं जोडा.
बाधक ते, तोडुनि बंध—सत्याचा मिळवा छंद
भिऊं नका कलिकाळाला; धर्मवीर ! जयजय बोला ![1]

२

अग्नीनें जळणें नाहीं, शस्त्रानें तुटणें नाहीं;
पाण्यानें बुडणें नाहीं, वाऱ्यानें उडणें नाहीं;
दिक्कालापरते तुम्ही, विश्वाचे अवघ्या स्वामी !
धर्म तुम्हांसाठीं बनला, धर्म तुम्हीं तुमचा केला.
सत्याला नांदायाला, देव जगीं स्थापायाला;
तेज जनीं परसायाला, धर्म तुम्ही तुमचा केला.

× × ×

देवाला विसरुनि का रे, या पोकळ धर्माचारें—
सत्याचा अवमान करा ? अधःपात हा खराखुरा !
सत्य खरें स्थिरलें जेथें, तेज खरें मुरलें जेथें,

१ येथें ही कविता प्रथम संपली होती. पुढला भाग कांहीं दिवसानंतर लिहिलेला आहे असें दिसतें, व कविबंधूकडून कळतें. लेखी पुरावा असता तर बरें झालें असतें. कारण दुसरा भाग याच कवितेंत प्रसिद्ध करण्यानें, जादा तत्त्वज्ञानात्मक ‘ डोझ ’ मुळें, व पुनरुक्तिदोषानें कवितेची रसहानि झाली आहे हें त्यांना खात्रीनें माहित असलें पाहिजे—नाथ

देव खरा विलसे जेथें, धर्म खरा अमुचा तेथें.
सत्यासाठीं नित्य नवे, धर्मनियम आम्हांस हवे;
तेजाचीं आम्हीं बाळें, सत्यरूप आम्ही सगळे.

× × ×

धर्मवीर हिंदुस्थान, देवाचा कलिजा प्राण !
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदुस्तानीं,
स्वार्थाला देउनि लाथ, तेजाचा धरुनी हात,
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर,
दिव्य चिंतनीं रमणार, स्वयंपणें विश्वाकार;
विश्वकुटुंबी विश्वधर्मी, तेच खरे हिंदुस्थानी[1] !
धर्मवीर हिंदुस्थान, देवाचा कलिजा प्राण !

* * *

सत्य बोल हे करा उठा—धर्मवीर, अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा !
मायामय कारागारा, तोडा मोडा पार करा !
आचारांची रूढि नसे, सत्य ठसावें करा असे.
धर्मपताका घ्या हातीं, व्हा केवळ तेजोमूर्ति;
सगळ्या विश्वाचे नेते,धर्म तत्त्व अमुचें हें तें

× × ×

सत्य धर्म नरहंकार सर्वांचें समतासार,

---

१ हिंदुस्थानी कोण ? याची ही व्याख्या बालकवींनीं स्पष्टपणें दिली असतां, हिंदुस्थानी या संज्ञेऐवजीं हिंदिस्थानी अशी संज्ञा त्यांच्या माथीं सहेतुक मारण्याचें कवनगुच्छकारांस, मुळींच कारण नव्हतें. —नाथ

सत्य धर्म जगतीं प्रेम, चोहिंकडे आत्माराम.
स्वार्थांचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्यधर्म जीवंतपण.
सत्यधर्म कळणें नाहीं, जोंवर ही जडता राही;
धर्मांचें तोंवर सोंग, जा मिरवा नसतें ढोंग!
मेलेल्या सजवा रूढि, गात बसा त्यांची प्रौढी!

× × ×

शूद्रांचे सोसा शाप, देशावर लादा पाप!
विधवांना रडतचि ठेवा, धर्माच्या मिरवा नांवा!
कोणि असो कुठला पाहूं कां? आम्ही पसरूं बाहू!
देशाचाहि बंध नसे, विश्व सर्व अमुचेंच असे.
चोहिंकडे आत्माराम, सर्वांवर अमुचें प्रेम.
खाणारे आम्ही मोतीं, राजहंस भूमीवरती.
आद्य ऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें.

× × ×

धर्मतत्त्व हें खरें खरें, आम्हांला कळलें सारें!
धर्मवीर भूमीवरती, धर्मतत्त्व अमुच्या हातीं
देवाचे पंचीप्राण आम्ही! रे भिवविल कोण?
काळाचे कवि हे काळ, काळदिशा अमुचा खेळ!
तेजानें भरलीं अंगें! नेउं जगा तेजामार्गें!
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा;
वाट करा आम्हांला रे, कां मरतां व्यर्थचि सारे?
तेजाचे आम्ही दास, सत्याची धरिली कांस;
देवांला फिरवूं मागें, दाखवितां कां हीं सोंगें,

देहाची परवा नाहीं, कीर्तीची चाडहि नाहीं;
धर्मवीर भूमीवरती, त्या अमुची असली गीति[1] !

## अगदीं पहिली कविता[2]

### कटाव

निंब जांब जांभूळ शेंदरी । तुळशी बहुतचि झांक मारी ।
अणू काय ती येइ धावुनि । असेंच वाटे पहा साजणी ।
पुढें पाहिलीं खैरीं झाडें । तशीच मोठी मेंदी वाढे ।
जाइ जुई ती फार वाढली । गुंफा मोठी बहुतचि झाली ।
अशा वनीं मी ऐकिली मुरली । तिला ऐकुनि वृत्ति निमाली
काय कथूं त्या सुस्वर नादा ? पुढें पाहिलें रम्य मुकुंदा
गोपांनीं तो वेष्टित झाला । गळीं फुलांचा हार शोभला
कटिं पीतांबर सुंदर दिसला । गोप खेळती नानालीला
कितिक खेळली आट्यापाट्या । किती खेळती दांडु विट्या
अशा करिति ते नानालीला । देवहि भक्ता आधिन झाला
वाटतें जावें, तत्कमलमुखा पाहावें ॥

---

१ सत्य धर्मानुसार, सामाजिक बंधनें, ताडकन् तोडून, परात्पराचा जयघोष करणारे कवि व त्यांच्या तद्विषयक प्रसिद्ध कविता, रा. माडखोलकर यांनीं, " केशवसुतांचा सांप्रदाय " या आपल्या लेखांत उल्लेखिलीं आहेत. त्या सर्व कविता एकत्र करून प्रसिद्ध केल्यास, महाराष्ट्राच्या विचार-स्वातंत्र्यास खात्रीनें जोर येईल. --नाथ

२ ही कविता प्रथमच प्रकाशांत आणण्याचें सगळें श्रेय, 'सुमन' मासिकाचे संपादक, व बालकवींचे आप्त व बालस्नेही रा. रा. वासुदेव कृष्ण भावे, यांचेंच आहे. —नाथ

पत्रं

# पत्रें

## पत्र १ लें

॥ श्री ॥

१०२ रास्तापेठ
१२-६-१५

प्रेमपू. सा. न. वि. माझें अकल्पित पत्र पाहून आश्चर्य वाटेल; पण कांहीं विशेष कारणासाठींच आज पत्र लिहित आहे. माझे मेव्हणे जळगांव खुर्द येथें मास्तर आहेत. तेथील कुळकर्णी त्यांना कांहीं खाजगी गोष्टीवरून निष्कारण त्रासदायक झाला आहे. कांहीं तरी भानगडी काढून त्यांना पेचांत टाकण्याची त्याची इच्छा दिसते. मी आपणास भेटल्यानंतर तेथें ( जळगांव खुर्द )गेलों होतों. तेथें सार्वजनिक सुधारणावर बोलतां बोलतां जरा कडक झाल्यामुळें त्याला माझें बोलणें लागलें तेव्हांपासून तो त्यांनाच त्रास देऊं लागला आहे. तेथील मामलेदाराची व आपली ओळख असल्यास त्यांच्याकडून त्याला जरा दोन गोष्टी सांगितल्या तर तो गप् बसेल असें वाटतें त्याचें नांव................ कुळकर्णी तलाटी असें आहे. तो कांहीं विशेष त्रास देऊं लागल्यास मी पुणाच्या युरोपियनाची चिठ्ठी तिकडच्या ऑफिसरला देईन; पण इतक्या थरावर गोष्ट जाऊं न देतां थोडक्यांत मिटवावें म्हणून आपणास

१ हीं पत्रें बालकवींनीं रा. रा. केशव महादेव सोनाळकर यांस पाठविलीं आहेत. —संपादक.

पत्र लिहित आहे. दोन शब्दांनीं हे गपू बसतात अशी माझी खात्री आहे. असो. सहज करतां येण्यासारखें असेल तर करावें.

दुसऱ्या सर्व गोष्टींत आनंदांत आहे. पण कवितेची एक ओळ नाहीं व सुखाचा एक क्षण नाहीं. आपणहि लिहिण्याचें सोडून दिलें कीं काय ? परस्परांच्या प्रेरणेनें परस्परांचा उत्साह वाढून दोघांना हि कांहीं तरी करितां येईल हें स्वप्न वाऱ्यावर विरून गेलें कीं काय ? आपलें नाटक व आपल्या कविता कोठें आहेत ? ' जाइन फिरेन नभांतरीं ' म्हणणारा गृहस्थ स्वप्नांत बरळला होता असें समजावें काय ? किंवा हिंदुस्थानच्या हवेला कर्तव्यतत्परतेचा ताप सहनच होत नाहीं ? माझा तर अनुभव असाच आहे. आपल्यालाहि दुर्दैवानें तसाच आला कीं काय ? आयुष्यांत कांहीं क्षण असे येत असतात कीं त्यांच्या खातर सर्वस्व विसरून त्यांनीं दिलेल्या दिव्य संदेशाच्या धोरणावर पुढील जीविताचें तारूं न्यावयाचें असतें ' प्रीतिगबाला ' या कवितेनें–तुम्हाला कोणता दिव्य संदेश दिला आहे ? तो तुम्हाला आठवत नाहीं काय ? माझ्या प्रमाणें सर्वांचीच स्थिति व्हावी हें आश्चर्य आहे. माझें मन तर पाणी टाकून विझवलेल्या विस्तवाप्रमाणें झालें आहे. खालीं काळे कोळसे व वर मात्र थोडीशी कल्पनेची धग या शिवाय कांहीं राहिलें नाहीं. सर्वत्र सामसूम; प्रेतकळा आलेली आहे पण असें सर्वांचें होऊं नये. कोणी तरी कांहीं तरी करा; नाहीं तर असेंच

आयुष्य निघून जाईल. पुढें काय आहे कोणास ठाऊक? आत्मा, ईश्वर, ब्रह्म, माया, पुनर्जन्म सगळीं स्वप्नें आहेत. तीं बालमनाचें समाधान करूं शकतील. त्यांचा त्यांच्यावर विश्वास बसेल; पण निदान माझा तरी त्यांच्यावर विश्वास राहिला नाहीं. नाइलाज आहे. पण असें आहे असें लिहितांना भलतीकडे वाहवलों. पत्र पाठवा उद्योगाला लागा.

आपला बंधु
त्र्यं. ठोंबरे

---

॥ श्री ॥

पत्र २ रें

हेल्थक्यॉंप रूम नं. ४२
अहमदनगर १-११-१७

प्रियबंधुः—माझ्या दुर्दैवानें आपलें पत्र आज कुठे माझ्या हातीं पडत आहे. कारण पत्र पोष्टमननें घरांत नेऊन टाकिलें व आम्ही प्लेगमुळें बाहेर रहात असल्यामुळें घरीं गेल्यावर तें दिसून आलें. दुसरें एखादें कसलें- हि पत्र आणखी दहा दिवस लोळत पडलें असतें तर मला फारसें वाईट वाटलें नसतें. पण ज्या पत्रांत आपण मला 'आई आली रे भाऊ, आई आली!' म्हणून प्रेमाच्या भरांत, आनंदाच्या उद्रेकांत अमृतपूर्ण वाणीनें कळवितां तें पत्र-तें स्वर्ग द्वारावरचें पासपत्र-मला इतक्या उशिरा मिळालें; दुर्दैव माझें! दुसरें काय? मला इतकें चमत्कारिक वाटतें आहे कीं पुसतां सोय नाहीं.

तुला काय वाटलें असेल या बद्दलहि कांहीं काळजी नाहीं. पण आईला काय वाटलें असेल? असें कां झालें ? अजून माझा भाग्योदय काल-खरा भाग्योदय काल-दूरच आहे कां? २९ तारखेपर्यंत मला सुटी होती. मी सहज आलों असतों, आईची भेट झाली असती, मोठ्यानें गळा काढून रडलों असतों, मनाच्या वेदना कमी केल्या असत्या, दुःख हलकें झालें असतें, जीवाला शांति मिळाली असती-पण हा संकेतार्थ केव्हां सुटणार ? गळ्यांतलें हें बिरडें-दावें-केव्हां तुटेल ? माझी आई मला केव्हां भेटेल ? या वेळीं तर दैवानेंच दावा साधला; त्यामुळें आईची भेट अंतरली. पण—आई तेथें राहील कां ? मी दिवाळींत तेथें जरूर जरूर येईन; पण आई मात्र तेथें राहिली पाहिजे. कसेंहि कर माझ्यावर दया करुणा काय पाहिजे तें कर; पण आईला तेथून जाऊं देऊं नकोस ? भाऊ हा भाग्याच्या वाट्याचा वाटेकरी असतो. माझ्या आईची भेट हेंच मी माझें परम भाग्य समजतों. त्याचा वाटा मला घेऊं दे. मी अशक्त आहे. मी तुझ्यासारखा खंबीर मनाचा नाहीं. नाहीं तर नोकरीचीही परवा न करितां निघून आलों असतों. पण—माझी कर्मकथा कशाला हवी ? आईला कळव मी दिवाळिला येईन. माझ्या दुर्दैवानें माझ्या दुःखांचा कडेलोट करण्यासाठीं यापूर्वींच आईला तेथून नेलें तर नसेकना ? ही शंका सुद्धां मनांत दहा वेळ येऊन गेली. काय काय झालें असेल तें तावडतोब कळीव.

तुझ्या पत्रांतील ' तूर्त ' या शब्दानें हा संशयकल्लोल मनावर वाढत आहे व पत्राकडे—अर्थात् उत्तराकडे डोळे लागले आहेत. मी तूर्त कांहीं वाचीत नाहीं, कांहीं लिहित नाहीं, जिवंतपणींच मरण अनुभवित आहे; आणि म्हणूनच आईच्या भेटीची मला फार फार आवश्यकता आहे.

दुसरी आश्चर्याची गोष्ट मी कधीं कविता लिहित नाहीं. पण अलीकडे १।२ दिवसांत एक लिहिली व आज आपल्या पत्रांत आईला कविता दाखव म्हणून तूं लिहिलेंस. पोटाचें काम करीत असतां ओठ अजिबात बंद ठेवावयाचे हा माझा हट्ट मी कसा विसरलों याचें आश्चर्य वाटतें.

ती कविता वाचून तर तुम्हालाहि आश्चर्य वाटेल. कारण त्यांत " रजनी मातेचें आव्हान " केलें आहे कविता मात्र अभ्यास मोडल्यामुळें बोजड झाली आहे. कांहीं का असेना; बाळानें आईपुढें आपले बोबडे बोल बोलावयाला कां लाजावें ?

दुसरीहि एक पाठवीत आहे. ती जुनीच पण तुम्ही न वाचलेली आहे. डॉ. नूलकर यांस माझा प्रे. पू. सा. न. प्रविष्ट करावा. मी आईला भेटावयास ९ किंवा १० तारखेस पुथून निघेन.

आपला बंधु त्र्यंबक

॥ श्री ॥

## पत्र ३ रें

प्रियबंधु ! स्वप्नांत भयंकर जीव दडपला गेलेल्या मनुष्याला एखाद्यानें हालवून जागें करावें त्याप्रमाणें आपल्या पत्रानें मला अत्यंत सुखमय अशी माझी जागृति देऊन विचारकल्लोळांची परिसमाप्ति केली या ब॥ परमेश्वराचे मनःपूर्वक आभार मानवेसे वाटतात. रा. शांतारामपंतांचें पत्र पत्ता चुकलेला असल्यामुळें बुधवारीं मला मिळालें. त्यांत आपल्या अपघाताबद्दल त्यांनीं कळविलें. काय वाटलें असेल तें काय सांगणार? आजच सोमवारीं ११ वाजेपर्यंतची रजा काढून उभ्या उभ्या आपणास भेटावयास म्हणून निघणार तों आपणच पत्ररूपानें येऊन भेट दिली. यापेक्षां, परमेश्वर भक्तांच्या धाव्याला धावतो याचें अधिक प्रत्यंतर दुसरें कोणतें मिळणार ? त्याच्याच कृपेच्या भांडारांत मला अत्यंत प्रिय असलेलीं माझीं हिरेंमाणकें ठेवून मी खुशाल झोंप घेईन. सर्व नियामकाच्या अपरिमित प्रेमसामर्थ्यापेक्षां मानवी मनाचें अदूरदर्शी प्रेम कितिसा पल्ला गांठणार? आणि अधिक तें काय करूं शकणार ?

---

॥ श्री ॥

## पत्र ४ थें

अहमदनगर

प्रियमित्राचे सेवेसी प्रेमपूर्वक सा. न. वि.—किती तरी दिवसांनीं आलेलें आपलें हें पत्र पाहतांच मला

काय वाटलें याची तुम्हालाही कल्पना करतां येईल कीं नाहीं मला शंकाच आहे. मी पत्र पाठवलें नाहीं याचें कारण मला अत्यंत तीव्र निराशेनें वेडें केलें होतें या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. मला क्षमा करा; मी आहेच अंमळ आळशी ! व त्यांत खिन्न विचारामुळें मनाला कांहीं हि सुचत नाहीं. असो. माझें प्रेम अभिन्न आहे यांत कालत्रयीं शंका नको. कधीं हि घेऊं नका. या शिवाय दुसरें सांगणें नाहीं. आतां आपलें पत्र आलें त्यामुळें मनाला फार आनंद वाटला. नाहीं तर आजचा दिवस तर विशेषच उद्विग्नतेंत गेला असता. आतां बरीच हुशारी वाटत आहे. मी तुमचें कदाचित् प्रोत्साहन असेन पण तुम्ही माझें प्रोत्साहन आहां यांत मात्र शंका नाहीं. कांहीं हरकत नाहीं. चला ! परस्परांचा हात धरूनच आपण प्रवास करूं. परमेश्वरानें आम्हांला गाण्याला उसन्न केलें असेल तर-तर काय ? आम्ही एकाच सुरानें गाणींही गाऊं अशी मला हिंमत आहे. प्रियमित्रा ! एप्रीलमध्यें मला सुटी लागेल. सदर दोन महिन्यांची सुटी मी आपणाकडेच घालवीन.

आपली लवकर भेट व्हावी असें इच्छिणारा
त्र्यंबक बापूजी ठोंबरे

मनोरंजन बा॥ आपण लिहिलें, नाहीं त्यानें छापविली तरी काय हरकत आहे ? येऊं, कधीं तरी पुढें येऊं !

त्र्यंबक

श्री

पत्र ५ वें

अहमदनगर

ता. २९

क्षेम प्रियमित्राचे सेवेसी प्रेमपूर्वक सा. न. वि. मी सध्यां मिशनस्कूलमध्यें ४ तास शिकवावयाचें एक काम पत्करिलें आहे; आणि एक तास मला दुसरी एक शिकवणी आहे. मिळून महिन्याचे २५ रु. मिळणार! आतां थोड्याच दिवसांनीं आईला येथें आणणार आहे. माझ्या प्रकृतिसंबंधीं मी फारशी काळजीच करीत नाहीं, मधून मधून कांहीं चमत्कारिक तऱ्हा होते; पण त्याला माझा उपाय नाहीं. आतां तुमच्याकडे हीं कामें सोडून येणें कसें शक्य आहे? रे. टिळक नागपुराहून कधीं येतील हें निश्चित नाहीं. तथापि ते तुम्हास भेटतील. मी साधल्यास दरबारच्या सुटींत मिरजेला जाऊन डॉक्टरला प्रकृति दाखवून येईन.

तुकतीच आलेली प्रेमरहस्य ही कविता नितांत सुंदर आहे.मला फारच फार आवडली,तुम्ही महाराष्ट्र-वाङ्मयांत आपलें नांव कायमचें करून ठेवणार यांत शंका नाहीं. अ. काव्यमालेंत तुमच्या कविता घालावयाच्या आहेत. त्यांची निवड मी सदर प्रमाणें केली आहे. १ कवीचा हट्ट २ शांति ३ प्रेमगीत ४ प्रेमसंशोधन ५ बालविधवेस........इत्यादि.

मनोरंजनांत 'अश्रुमाला' 'नौका' 'प्रेम रहस्य' प्रेमकळी या प्रसिद्ध करावयाच्या. मनोरंजन तुमची

कविता आनंदानें प्रसिद्ध करील; पण कोणत्याहि मासिक पुस्तकांत प्रसिद्धी एक दोन महिने मागें पुढें होत असते.

माझ्या कविता जेवढ्या प्रसिद्ध आहेत. त्यांशिवाय मजजवळ राहिल्या नाहींत. कांहीं पुण्यास हरवल्या व कांहीं वेडेपणानें मी जाळून टाकिल्या. फार वाईट वाटतें. पण त्या वेळेस मला असें कांहीं सुचत नाहीं; असो.

कविता पुष्कळ होऊं द्या ! पुस्तक वगैरे पुढें छापवूं. ‘ अश्रुमाला ’ व ‘ प्रेमगीत ’ यावर तुमचीच सही आहे. पुढें ‘ मधुकर ’ ही लिहीन. मी माझ्या प्रत्येक कवितेवर पाठवावयाचे वेळीं ‘ तुतारी मंडळ ’ असें लिहितों; पण मित्र प्रसिद्ध करीत नाहींत. त्यांना कारण विचारिलें तरी उत्तर नाहीं. असो.

आपला आज्ञाधारक, त्र्यंबक.

कविता पाठवा !

माझी एकहि कविता नाहीं. मी आतां कविच राहिलों नाहीं. असो ! काय उपाय !

तुमचें पत्र आलें कीं कविता लिहावीसें वाटतें; पण टाक हातांत घेतला कीं भयंकर नैराश्यानें लेखणी गळून पडते.

आठवण न राहिल्यानें पत्र उशिरां आलें. क्षमा करा ! त्र्यंबक

॥ श्री ॥

## पत्र ६ वें

प्रेमपूर्वक सा. न. वि. मी अनंत अपराधी जरी असलों तरी माझी खात्री आहे कीं तुम्ही मजवर रागावणार नाहीं. तुमचें पत्र आलें तें एकदां नव्हे, दोनदां नव्हे, कितिवेळां वाचलें, मला सांगतां येणार नाहीं. मला किती धीर–उत्साह–आला याची नुसती कल्पना सुद्धां तुमच्या मनाला होणें कठीण आहे. माझ्या उदास परिस्थितीनें माझ्यावर अत्यंत उपकार केले. तिनें माझ्या उदार मित्राच्या पवित्र हृदयाची कल्पना मला फारच चांगल्या तऱ्हेनें करून दिली. या परिस्थितीनें काळ्या झालेल्या हृदयाच्या प्रभावळीवर माझ्या मित्राचें प्रेमचित्र किती खुलून दिसतें! ही प्रभावळहि अशीच राहू देत.प्रेमाचा प्रकाश पडल्यावर दगडाचीं फुलें बनतील; मग आभासमय सुखदुःखांची काय कथा! प्रेमा! मी कीर्ति, मान, धन ऐहिक सुखें यांच्यासाठीं धडपडतों;पण मला ठाऊक आहे चिरविश्रामा! तूंच माझें घर आहेस;माझी निवाऱ्याची गुहा—माझ्या आत्म्याचें लेणें—माझ्या जीवाचें सर्वस्व—माझ्या चकोराची चंद्रकला, पवित्र प्रेमा तूंच आहेस! आम्हीं तुला विसरतों. खऱ्या सुखाचें स्थान जें तूं त्या तुला सोडून हवें तेथें भटकतों या बा रागावूं नकोस. तूं आहेस म्हणून आशा आहे, जीवित आहे, आम्हीं आहों, हें आम्हांला कळत नाहीं.

उसासे टाकतेंस, आम्हीं त्यांकडे दुर्लक्ष करितों, तूं आम्हांला बोलावतेंस; आम्हीं तुजपासून दूरदूर पळतों. पक्ष्यांचा कलरव व पानांच्या मर्मर शब्दांतून तरंगिणीच्या कल्लोलांत वसुंधरेच्या खोल हृदयांतून आणि वरच्या विस्तीर्ण नभोमंडलांतून तूं आम्हांला बोलावतेंस ! पण आमची दृष्टि बदलली आहे. या अस्थिर संसाराच्या लाटांवर आपल्या जीविताची होडी टाकून वर खालीं जाण्यांतच आम्ही सुख मानतों. सुखाचेंही सुख, अमृताचेंही अमृत, आनंदाचाही आनंद तूंच आहेस. तुझ्या स्वाधीन हें जीवित केलें. तुझ्या सदानंदमय गंगेंत आतां हवें तेथें याला फिरव. रात्र येवो काळोख होवो कीं प्रलयकाल ओढवो, मी आपली मान तुझ्या हृदयावर टाकून खुशाल निजेन. कालाची गति कुंठित होईल, नक्षत्रांना विराम मिळेल, सूर्य शांत होईल, सर्वांचें मधुर संमेलन होऊन त्या अद्वैतांत मी यापुढें स्वप्न पाहीन. मला कांहींच काम नाहीं. जग चालवण्याला तू समर्थ आहेस. तूं सर्वशक्तिमान् आहेस. मी मात्र तुझ्याकडे पाहत राहीन. तुझीं गाणीं गाईन. तुझी सेवा करीन. तूं माझा धनी जगन्नियंता असल्यावर मी कुणावर बरें रागवावें ? मला सर्व भावानें तुझ्याकडे ओढून घे ! आजपर्यंत स्वतःसाठीं च वेडेपणानें स्वतःचा धिक्कार करीत आलों पण यापुढें आतां तूंच मला विकत घेतलें. मी सर्वस्वी तुझा झालों. मी मोठें ओटाळ गुरूं आहें. पण तूं मला चांगला धनी मि-

कालास. गरूड पक्ष्याप्रमाणें माझी दृष्टि तीक्ष्ण झाली आहे. प्रत्येक पदार्थांत केवळ तुझेंच वास्तव्य मला दिसत आहे. माझें हृदय पाण्यापेक्षांहि पातळ, वाऱ्याच्या मोटेपेक्षांही हलकें, व चैतन्याप्रमाणें सर्व-व्यापी झालें. किंबहुना माझें अस्तित्वच आतां तूं नाहींसें करून टाकलेंस.

त्र्यंबक

---

श्री

पत्ता } क्लिफ् महाबळेश्वर २४।४।१४
पंडित । पत्र पाठवा

पत्र ७ वें

प्रियबंधु

पत्र पावलें. किती आनंद झाला हें लिहिणेंच कठीण आहे. कसें हि असलें तरी पत्र व्यवहार पाहिजेच पाहिजे. मी पत्र लिहिण्यांत आळशी खरा; तरी पण आपल्या दोघांचा पत्रव्यवहार पाहिजेच अशी माझी फार इच्छा असते.

आपल्या सर्वच इच्छा पूर्ण झाल्या असत्या तर चिंध्यांचे मंदील आणि झोंपड्यांचे राजवाडे झाले असते. दिवाळींत मीं भेटीचे शक्य ते प्रयत्न केले. आतां तर बोलून चालून अशक्यच. कारण मी येथें भाषा-शिक्षण शाळेंत पंडिताचें काम करीत आहें. योगायोग नाहीं असेंच म्हणावें लागतें. लग्न निर्विघ्नपणानें आणि आनंदानें पार पडो असें मी इच्छितों.

चिंता नाहीं. पुढें मागें भेटी होतील. आनंद करो. मेच्या अखेर येथून सुटल्यावर मी तुमच्या भेटीस येण्याचा पुन्हां एकदां प्रयत्न करीन. यंदा येथें प्लेग आहे. सहा तास काम, खाण्यापिण्याचे हाल, असा कांहीं आनंद आहे. कवितांचें नांव नाहीं! कवितेला काखोटीशीं घेऊन पुन्हां व्यवहाराशीं झगडत बसणें म्हणजे दोघांचे हि हाल! 'धर्मवीर' ही कविता कशी काय वाटली?

आपला आज्ञा०
त्र्यंबक

---

क्षेम श्री

अहमदनगर
१४।११।१०

## पत्र ८ वें

प्रिय बंधु. मला खात्रीनें वाटतें, तुम्हांला माझें पत्र आलें नाहीं म्हणून अत्यंत वाईट वाटलें असेल; पण काय करूं. एरंडोलहून तुमचीं पत्रें इकडे आजच आलीं. येतांबरोबर उत्तर लिहावयास बसलों. काय असेल तें असो. अंतःकरणांत जें कांहीं होतें आहे त्याचें वर्णन करतां येत नाहीं. इथें अगदीं करमत नव्हतें व अलीकडे प्रकृतीहि चांगली नाहीं त्यामुळें मी उदास असे.

पण आतां तुमचीं दोन्हीं पत्रें आलीं–नव्हे माझा आनंद परत आला. इतके दिवस निराशेच्या काळ्या कुट्ट काळोखानंतर इतका गोड अरुणोदय–काव्यमय अरुणोदय—झाला आहे. आतां मीही गाईन. उदासीनपणामध्यें माझें गाणें थांबतें त्याप्रमाणें तें या दोन महिन्यांत सर्वस्वी बंदच झालें आहे. पग आतां सुरूं होणार. पुढच्या पत्रीं तुमच्याकडे एक कविता पाठवीन. तुम्हांला फार वाईट वाटलें असेल नाहीं पत्र फार उशिरा आलें म्हणून? पण माझा काय इलाज? आतां इकडे पत्र पाठवीत जा. म्हणजे मी ताबडतोब उत्तर लिहीत जाईन. मला "गुरुस्थानीं" हा शब्द कसासाच वाटतो. अभिन्न होणें हेंच प्रेम-सर्वस्व आहे. त्याला उच्चनीच भाव फार घातक आहेत. आमचीं मनें अभिन्न असूं द्या. कुजक्या उच्च नीच भावाला पार झुगारून द्या. मग आपण जगाच्या अंतापर्यंत अभिन्नपणानें असेच नाचत राहूं.

अश्रुमाला व शांति दोन्ही हि कविता पोहोंचल्या. प्रेमगीत मनोरंजनाकडे पाठविलें आहे. सध्यां श्री. मित्र आजारी आहेत. एक महिन्यांत त्यांचें मला पत्र नाहीं. शांति आणि अश्रुमाला दोन्ही कविता त्यांचे कडेच पाठवितों. अभिनव-काव्य-मालेसाठीं कांहीं कविता पाठवा. आतां आपल्या नितांत सुंदर कृतींची स्तुति मी करित नाहीं. जगालाच ती करूं देत! खूप

पत्र लीहीन असें वाटत होतें पण आतां कांहीं आठवत नाहीं. पुन्हां पत्र पाठवावें.

आपला आज्ञाधारक
त्र्यंबक

माझा पत्ता:—
त्र्यं. बा. ठोंबरे
फर्ग्युसन गेट
अहमदनगर

मी प्लेग टोंचून घेतला आहे व येथील प्लेगहि संपत झाला आहे. काळजी नसावी. मात्र प्रकृति अत्यंत क्षीण झाली आहे. औषध घेतों आहे.

आपला
त्र्यंबक

---

श्री

अहमदनगर
२९।३।१२

## पत्र ९ वें

प्रेमपूर्वक सा. न. वि. मी अहमदनगर येथें असलेली नोकरी सोडली. आतां वर्धा येथें एक सुमति या नांवाचें प्रागतिक पत्र नुकतेंच सुरू झालें आहे. सध्यां हें पत्र द. भि. रणदिवे चालवित आहेत. पण त्यांना एक नवें मासिक काढावयाचें आहे. असो. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत मी तेथें येईन. पण तेथें मला जास्त दिवस राहतां येणार नाहीं. मानवी

आशा, कल्पना, ध्येयें यांची सत्यता जर जगांत नेहमीं अनुभवाला आली असती तर आम्ही स्वर्ग एका क्षणांत—या मर्त्य जगांत सुद्धां—निर्माण केला असता. पण वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे ! या जगांत एकादीच कल्पना अथवा आशा खरी ठरली म्हणजेच आम्ही धन्यता मानून घेतों. असो.

आ. आ.

त्र्यंबक बा. ठोंबरे

---

श्री

क्षेम

सातभाई गल्ली

अहमदनगर २२।जा.।१३

## पत्र १० वें

प्रियबंधु:—मागच्या पत्रानें आपणांस बरेंच घोटाळ्यांत पाडलें असेल. त्यांत मी सोबत 'निर्झर' ही कविता पाठविली आहे असें लिहिलें. पण चुकून ती कविता माझ्या वडील बंधूच्या पत्रांत गेली असा आज त्यांच्या पत्रावरून उलगडा झाला ! खरोखर मी किति तरी हलगर्जी, निष्काळजी आहे ! कळतात पण वळत नाहींत अशा कित्येक गोष्टी असतात. त्यांतलीच ही माझी संवय होऊन गेली आहे. ज्या दिवशीं विसर व निष्काळजीपणा हे दोन मोठाले दुर्गुण माझ्यांतून जातील—पण पुरे ! प्रकृति साधारण बरी आहे; निर्झर पुन्हां लिहून पाठवतों.

आपला आ०

त्र्यंबक ठोंबरे

श्री

अहमदनगर
१।९।१२

## पत्र ११ वें

प्रियबंधु—काय असेल तें असो, तुम्हांला पत्र लिहितांना मनाला फारच आनंद वाटत असतो. क्षण-भर सर्व दुःखांचा—सर्व चिंतांचा विसर पडतो. व ' आंतरःकोपि हेतुः ' प्रबळ होऊन एक तऱ्हेची शांति वाटते.

अलीकडे माझ्या वृत्तींत बराच फरक पडत चालला आहे. मी कधींहि निराश-पूर्वींप्रमाणें निराश-नसतों. कृष्ण मेघांचा स्तंभ फोडून प्रगट होणारा भगवान् नृसिंहरूपी सूर्यनारायण मला असें सांगतों कीं, कस-ल्याहि परिस्थितीपेक्षां तूं फार श्रेष्ठ आहेस ! तुझ्या दृष्टीचें तेज पसरतांच कृतांताच्या काल-दाढासुद्धां गुलाबाच्या फुलांप्रमाणें फुलतील. मोठमोठाले पर्वत-सुद्धां तुझ्या दृष्टीच्या प्रतापानें बाष्पमय होऊन वातावरणांत विरून जातील. तुला मोडेल असा एकहि कांटा जगांत नाहीं. तुला भीति दाखविणारा सैतान-सैतान म्हणून कांहींच नाहीं.

माझा प्राण तुमचा आहे, तो सर्व महाराष्ट्राचा आहे ! अहाहा ! तूं देवच आहेस ! मीं आपल्या नसत्या अहंकाराचा त्याग केला नाहीं, म्हणून तूं मला प्रेरणा केलीस. खरोखर ! मी पापी आहें. बंधु, तुला

वाटतें तसा पवित्र मी कधीं होईन ? मी निष्प्रेम आहें; दांभिक आहें. माझें किडकें हृदय माझ्या राष्ट्राला–माझ्या जगाला–माझ्या देवाला आवडेल का ? विश्वात्मका, मीं तुझा व्हावें अशी तुझी इच्छा आहे ना ? घे ! मला आपल्याकडे ओढून घे ! प्रेमा ! मला प्रेम शिकव. माझें अंतःकरण तुला पाहिजे ? तें तुझेंच आहे. तूंच मला निमित्ताला धनी केलें आहेस. मी नाहींच. तूंच आहेस. घे माझे–छे ! हें तुझेंच सारें आहे. त्याला मी अज्ञानानें माझें म्हणत होतों. तुझें तुला घे !

बंधु. भडकल्या डोक्यांतून आतां काय निघेल, नेमच नाहीं. आतां पुरें करतों. आमच्या शाळेंतील परीक्षा १५ दिवसांनीं आटपेल. पुढें परीक्षेची सुटी मिळाली म्हणजे मी आपणाकडे येईन. तोंपर्यंत तुम्ही माझ्या हृदयांत व मी तुमच्या हृदयांत आहेंच !

सर्वस्वीं आपलाच
त्र्यंबक बापूजी ठोंबरे.

कविता वाचली ठीक ! चालूं द्या मीहि कांहीं कविता आपणांकडे पाठवीन.

माझा पत्ताः—

सातभाईगल्ली.
अहमदनगर.

श्री

सातभाई गल्ली
अहमदनगर १४।१।१६

## पत्र १२ वें

प्रियबंधुः—मुंबईहून आल्यापासून आजारी होतों त्यामुळें कांहींच करतां आलें नाहीं. आतां लवकरच आपल्या दोन कविता व 'निर्झर' मनोरंजनकडे पाठवून देतों. अद्याप प्रकृति ताळ्यावर येत नाहीं. असो.

'निर्झर' या कवितेंत लिहितां लिहितां फिरून फारच फरक झाला आहे व पहिल्या व दुसऱ्या निर्झरांपैकीं कोणता चांगला हें माझें मलाच कळून येत नाहीं. पहिला आपण ऐकला आहेच. आतां सोबत दुसरा म्हणजे बराच बदल होऊन बनलेला निर्झर आपणांकडे पत्रासोबत पाठवीत आहें. जर त्या पहिल्यापेक्षां आपणांस ह पसंत असेल, तर परभारें मनोरंजनाकडे पाठवा. नाहीं तर मला पत्र लिहा. मी मूळचा जशाचा तसाच लिहून पाठवितों. पत्रोत्तर लवकर येईल अशी खात्री आहेच. मजकडून पत्र पाठविण्यास उशीर होतो याबाा मी क्षमा मागतों.

आ. आज्ञा.
त्र्यं. ठोंबरे

लवकरच दुसरें एक काव्य रजपूत सरदाराचें (नांव काय द्यावें हें समजत नाहीं) पुरें करून आपणाकडे पाठवितों.

'सिद्धशबरी, प्रकृति बरी होतांच लिहावयास घेतों.

श्री

महाबळेश्वर, घ. नं. २२२

१८-४-१३

पत्र १३ वें

प्रेमपूर्वक सा. न. वि. आपणांस पुष्कळ दिवसांत पत्र पाठविलें नाहीं, याचीं पुष्कळशीं कारणें आहेत. पण तीं देत बसण्यांत काय हंशील आहे ? आतां कसल्याहि प्रकारचा विचार न करतां नुसती मौज करण्यासाठीं म्हणून महाबळेश्वरीं आलों आहें. खरो-खरच मनाला फारच बरें वाटतें. मध्यंतरीं मला जें वेड्यासारखें होत असे, त्याचा आतां पत्ता नाहीं. निसर्ग—जननीच्या या उदात्त आणि गंभीर दर्शनानें मला काय वाटतें, तें लवकरच मी कवितारूपानें आपणांस कळवीन. विशाल गिरिशिखरें, गर्द अरण्यें, भयाण खोरीं, अजस्र प्रपात या सर्वांचें दर्शन, अहाहा ! मला किती तरी आनंददायक वाटतें याची प्रियबंधु तूंच कल्पना कर. त्याकडे पाहतां पाहतां एक गोड वेड माझ्या डोक्यांत उसळतें. कल्पना—साम्राज्यांतील मधुर स्वप्नसृष्टीशीं मन संलग्न होतें; विचारांचा विल-क्षण प्रवाह सुरू होतो, ज्या विश्वजननीचें मी मूल आहें तिचाच सगळा हा अवाढव्य विस्तार–ती किती तरी विशाल असेल–पण असे ना का ! ती माझी प्रेमळ आई आहे. तिला लहान मोठें ठाऊकच नाहीं.

त्र्यंबक

श्री

अहमदनगर

६।६।१३

प्रियमित्राचे सेवेसी—

## पत्र १४ वें

प्रेमपूर्वक सा न. वि. मीं आपणांस किती पत्रें लिहिलीं, तें सांगण्यापेक्षां सोबत पाठविलीं आहेत तींच वाचा म्हणजे झालें. तीं पोस्टांत माझ्या हलगर्जीपणामुळें व कित्येक दुसऱ्या कारणामुळें टाकलीं गेलीं नाहींत. असो.

तुमचें सध्यांचें पत्र मी प्रवासांत असल्यामुळें कित्येक ठिकाणीं प्रवास करून आज मला येऊन मिळत आहे. आतां सुटी संपण्यास सारे ४ दिवस उरले आहेत. तेवढ्या वेळांत येणार काय व जाणार काय ? पण तुम्हांला भेटण्याची मात्र अत्युत्कट इच्छा आहे. पुष्कळ पुष्कळ बोलावयाचें आहे. तुम्हांला चार दिवस कां होईना, वेळ मिळाल्यास वेळांत वेळ काढून कृपा करून मला भेटा. जगांत माझीं हृदयें उकलावयाचीं फारच थोडीं ठिकाणें आहेत; त्यांत मी प्रमुखत्वानें आपली गणना करतों. महाबळेश्वर एथें असतां मला आपली आठवण किती वेळां आली, याची साक्ष रे. टिळक यांचे चिरंजीव दत्तोपंत हेच देतील. अशा किती एक गोष्टी आहेत कीं, त्या आपण एकमेकांस भेटल्यावांचून बोलतां येणें शक्यच नाहीं.

मनोरंजनानें 'निर्झर' प्रसिद्ध केला. पण अजून पैसे पाठविले नाहींत. या अशा गोष्टीमुळें खरोखर वीट येतो. चित्रमयजगत्नें माझी एक अत्युत्तम कविता हरवून टाकली. विस्ताराकडे पाठविलेली कविता अजून प्रसिद्ध झाली नाहीं. पण लवकर होईल असें वाटतें. कृपाकरून वेळ होईल तेव्हां मात्र वेळ काढून एकदां एथें या.

आपला आज्ञाधारक बंधु

त्र्यंबक

---

श्री

## पत्र १५ वें

माळीवाडा—अहमदनगर

२०।१०।१३.

प्रेमपूर्वक सा. न. वि. सोबतच भाऊचें पत्र पाठविलें आहे. त्यावरून मीं येण्याचें रहित केलें, तरी पण भेटण्याची अत्यंत इच्छा आहे. पत्राशिवाय अगर भेटीशिवाय प्रेम तसेंच्या तसेंच अनंत काल-पर्यंत राहूं शकेल यांत शंका नाहीं. पण या तत्त्वापेक्षां प्रत्यक्ष भेटच मला अधिक वाटते, व म्हणून मी तुम्हांला विनंती करितों कीं, कशीहि सवड काढून—शक्य असेल तसें करून एकदां मला भेटा. दिवाळींत ऑफिसें बंद होतील, आपलें कामहि बुडणार नाहीं; व मलाहि शाळेची दगदग नसल्यामुळें आपण नग-

रजा आल्यास ' प्रेमाचा सुकाळ ' होऊन दिवाळीला खरें दिवाळीपण येईल. नुसत्या आऊच्या पत्रावरूनच मी कळशांवीं येत नाहीं असें नव्हे, तर एथें मला एक युरोपियन बाईची शिकवणी आहे, तिनें दिवाळींतसुद्धां मला रजा देण्याचें नाकारलें दुसरें आमचा पगार सुटीनंतर आम्हांस मिळणार.अशीं अनेक कारणें झाल्यामुळें मला निराश—नेहमींच्या माझ्या जगांतल्या अनुभवाप्रमाणें पुन्हा याहि प्रसंगीं मला निराश व्हावें लागलें. कोणत्याहि गोष्टीसंबंधीं विचार करतांना मला कांहीं बंधनें आहेत, हें मी अगदींच विसरतों—न कळत मला त्यांचा विसर पडतो. आणि प्रत्यक्ष सृष्टींत माझे विचार येऊं लागले म्हणजे हीं बंधनेंहि प्रत्यक्ष पुढें येऊन कल्पनासृष्टींत निजलेल्या माझ्या जीवाला जागे करितात; आणि मला मग जें काय वाटतें तें वाटतें. तें पत्र तुम्हांला पाठविलें त्यावेळीं मला कांहींच कसल्याहि अडचणींची कल्पना नव्हती. आतां त्यांची मालिका डोळ्यांसमोर उभी आहे. असो. हा जगांत पावलों पावलीं येणारा माझा अनुभव आहे. त्याच्यासाठीं वाईट वाटून घेण्यांत हंशील नाहीं. तुम्ही एथें या. शारीरिक दिवाळीचें जरी एथें फारसें पडप (?) नाहीं,तरी आपल्या आत्म्यांची जीवांची दिवाळी एथें फारच चांगली होणार; हें मला व तुम्हांला हि पूर्णपणें माहीत आहे. मात्र जर खरोखर कांहीं तशीं कामें असलीं तर माझ्या उतावळ्या मनःसाम्राज्याला भुलून तीं सोडून नुकसान करून

येऊं नका. येणें न येणें आतां आपणांवर सोंपवितों. आतां पत्र लिहीत आहें, तेव्हां भेटावेसें विशेष वाटतें, पण कांहीं वेळानें मन शांत होईल व वेळ निघून गेल्यावर भेट झाली नाहीं, यांतच मजा आहे असें म्हणावें लागेल. नैराश्यांत मोठें सुख आहे, यांत शंका नाहीं. असो. एकंदर विचार करून काय ठरविणार तें कळवा.


आपला बंधु

त्र्यं. बा. ठोंबरे

आपणास सवड असेल तर आपण एथें आल्यासच जास्त ठीक होईल. पण नसेल तर मला कळवा. म्हणजे मी व्यवस्था करीन. आपल्या पत्राची वाट पाहीन.

नुकतीच मला मिस् जॉन्सन्‌कडून पैसे व रजा दिल्याबद्दल चिठी आली आहे. मी येण्याचा प्रयत्न करतों.

नाना



REFBK-0002333

REFBK-0002333